# द्वितीय वर्ष कला

## सत्र - IV (CBCS)

## अभ्यासपत्रिका – २

## राजकीय सिध्दांत

# राजकीय मूल्ये आणि विचारप्रणाली

## विषय कोड : UAPOL401

© UNIVERSITY OF MUMBAI

**डॉ. सुहास पेडणेकर**
कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक रविन्द्र कुलकर्णी**
प्रभारी कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**प्राध्यापक प्रकाश महानवर**
संचालक
दूर व मुक्त अध्ययन संस्था
मुंबई विद्यापीठ, मुंबई

**कार्यक्रम समन्वयक** : **प्रा. अनिल आर बनकर**
**सहयोगी प्राध्यापक**
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**संपादक व अभ्यास समन्वयक** : **दत्तात्रय म. तोंडे**
सहायक प्राध्यापक
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**लेखक** : **डॉ. हर्षद भोसले**
किर्ती कॉलेज, दादर, मुंबई.

**डॉ. शंकर वेल्हाळ**
गोगटे वाळके कॉलेज
पनवेल बांदा.

: **डॉ. बाबासाहेब त्रिबंक मोत्ताळे**
स्व. अण्णासाहेब आर डी. देवरे कला व विज्ञान महाविद्यालय,
महासडी साक्री. जि. धुळे.

: **डॉ. बिजयसिंग कर्तासिंग भाबरदोडे**
स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय,
अंबाजोगाई.

**जून २०२२, मुद्रण - १**

**प्रकाशक**
**संचालक, दूर आणि मुक्त अध्ययन संस्था.**
मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, मुंबई- ४०० ०९८.

**अक्षर जुळणी आणि मुद्रण**
**मुंबई विद्यापीठ मुद्रणालय**
विद्यानगरी, मुंबई

# अनुक्रमणिका


| अध्याय क्र. | नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| | **मॉड्यूल १** | |
| **१** | **हक्क** १ | |
| | १.१ हक्काचे स्वरूप आणि अर्थ | १ |
| | १.२ हक्काचे सिध्दांत | ३ |
| | १.३ हक्काचे वर्गीकरण | ८ |
| | **मॉड्यूल २** | |
| **२** | **मूलभूत राजकीय मूल्ये** | |
| | २.१ स्वातंत्र्य | १० |
| | २.२ समानता | २२ |
| | २.३ न्याय | २९ |
| | **मॉड्यूल ३** | |
| **३** | **लोकशाही** | |
| | ३.१ लोकशाहीचे सिध्दांत | ३९ |
| | ३.२ उदारमतवादी लोकशाहीची तत्त्वे | ४६ |
| | ३.३ लोकशाहीच्या यशस्वी कार्यासाठी अटी | ५३ |
| | **मॉड्यूल ४** | |
| **४** | **राजकीय विचारप्रणाली** | |
| | ४.१ मार्क्सवाद | ५८ |
| | ४.२ फॅसिझम | ६७ |
| | ४.३ स्त्रीवाद | ७८ |

बी. ए. द्वितीय वर्ष

सत्र - IV (CBCS)

अभ्यासपत्रिका – ३

# राजकीय सिध्दांत

# राजकीय मूल्ये आणि विचारप्रणाली

अभ्यासक्रम

## SEMESTER IV- POLITICAL VALUES AND IDEOLOGIES

**Module1 – Rights** **[ 10 Lectures ]**

1.1 Meaning and Nature of Rights
1.2 Theories of Rights
1.3 Classification of Rights

**Module 2 – Basic Political Values** **[12 Lectures]**

2.1 Liberty
2.2 Equality
2.3 Justice

**Module 3 – Democracy** **[11 Lectures]**

3.1 Theories of Democracy
3.2 Principles of Liberal Democracy
3.3 Conditions for the Successful Working of Democracy

**Module 4 – Political Ideologies** **[12 Lectures ]**

4.1 Marxism
4.2 Fascism
4.3 Feminism

## REFERENCES


Abbas, Hoveyda and Ranjay Kumar, *Political Theory,* Pearson, 2012

Bhargava, Rajeev and Ashok Acharya (eds), *Political Theory: An Introduction,* Pearson Longman, 2008

Bhargava, Rajeev and Helmut Reifeld (eds), *Civil Society, Public Sphere, and Citizenship: Dialogues and Perception,* Sage Publications, New Delhi, 2005

Chandhoke, Neera, *State and Civil Society*: *Explanations in Political Theory,* Sage Publications, New Delhi, 1995

Gauba, O.P., *An Introduction to Political Theory,* Macmillan Publishers India Ltd., 2011

Heywood, Andrew, *Politics,* Palgrave Foundations, New York, 2002

Hoffman, John and Paul Graham, *Introduction to Political Ideology,* Pearson, 2006

Marsh David and Gerry Stoker (ed), *Theory and Methods in Political Science,* Macmillan Press Ltd, 1995

Mckinnon, Catriona (ed), *Issues in Political Theory,* New York Oxford University Press, 2008

Verma, S.P., *Modern Political Theory,* MacMillan, New Delhi, 2003.


**Online reference**


cornell.edu/cphp

journal.sagepub.com/home/ptx


**Reference Books in Marathi**


1. Translation of O.P. Gauba's Book, An introduction to Political Theory in Marathi by Jadhav T, *Rajaneetishastra Parichay*, K. Sagar Publications, Pune, 2015.
2. Bhargav Rajeev and Acharya Ashok (eds), Rajakiya Siddhanth Parichay, Pearson, New Delhi, 2008.
3. Tijare, Peshwe, *Adhunik Rajakiya Siddhanth*, Shri Mangesh Prakashan, Nagpur, 1998.
4. Phad, S.B.*, Uchhatar Adhunik Rajakiya Siddhanth*, Vidya Books Publishers, Aurangabad, 2014.
5. Deshpande, Shrikant., *Rajakiya Siddhanth*, Shri Mangesh Prakashan, Nagpur, 2003.
6. Chopade, K., *Rajakiya Siddhanthachi Tatve*, Vidya Books Publishers, Aurangabad, 2002.

# १

# हक्क

**घटक रचना**

**१.१ हक्क : अर्थ व स्वरूप**

हक्कांचा अर्थ व व्याख्या; सकारात्मक आणि नकारात्मक हक्क

**१.२ हक्कां संदार्भातील विविध सिद्धांत**

ऐतिहासिक सिद्धांत; वैधानिक सिद्धांत ; आदर्शवादी सिद्धांत

**१.३ हक्कांचे वर्गीकरण**

नागरी, राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व समूहांचे हक्क

**प्रस्तावना :-** विशिष्ट पद्धतीने वागविणे किंवा विशिष्ट पद्धतीने कृती करणे हा अर्थ प्राथमिकतः हक्क ह्या संकल्पने संदर्भात उदधृत करता येतो. हक्क हि संकल्पना न्य्याय राज्यपद्धती निर्माण करण्याच्या प्रक्रियेतील सर्वात अग्रणी तत्व आहे असे आपल्याला सांगता येईल. अनेक राजकीय तत्ववेत्त्यांनी हक्क ह्या संकल्पाने संदर्भात वेग वेगळ्या पद्धतीने आपले विचार मांडले आहेत. स्वातंत्र्य व न्याय ह्या संकल्पनांपेक्षा हक्क हि संकल्पना राजकीय दृष्ट्या कमी वादग्रस्त आहे. पण असे असूनही हक्क ह्या संकल्पनेच्या व्याखे संदर्भात विचारवंतांमध्ये सह वाक्यात नाही किंवा सहमती नाही. हक्कांचे आधार नेमके कोणते आहेत, कोणाला किती हक्क द्यावे व कोणी किती हक्क इतरांना द्यावेत या संदर्भात अभ्यासकांमध्ये कमालीचे मतभेद आहेत. हक्क ह्या संकल्पनेचा अर्थ पुढील प्रमाणे सांगता येईल.

## १.१ हक्क : अर्थ व स्वरूप

हक्का चे वर्णन ढोबळ मानाने, सर्वसाधारण व्यक्तींनी, समूहांनी, किंवा वर्गाने समाजाकडे वा राज्याकडे केलेल्या विविध मागण्या किंवा दावे असा करता येईल. समाजाने किंवा राज्याने व्यक्तीच्या मान्य केलेल्या विविध मागण्या किंवा दावे म्हणे हक्क होय. व्यक्ती किंवा समूहाने केलेल्या विशिष्ट प्रकारच्या मागण्या आणि दावे साधारणपणे समाज किंवा समूह जेव्हा अभिस्विकृत करतो व त्याला राज्यसंस्था देखील जेव्हा मान्यता देते तेव्हा त्या मागण्यांना हक्क असे म्हणतात. हक्कांचे सर्वात महत्वाचे व प्रचलित निहीतार्थ म्हणजे स्वातंत्र्य व व्यक्ती व्यक्ती मधील सकारात्मक क्षमता वृद्धिंगत करण्यासाठी चे बाह्य वातावरण हक्क हि संकल्पना तयार करते. उदा. अभिव्यक्ती स्वातंत्र्य प्रत्येक व्यक्तीला स्वतःचे विचार, भावना, आणि दृष्टीकोन मांडण्याचा हक्क प्रदान करते. पण अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा उपभोग घेण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला व्यक्तिस्वातंत्र्याचे एक भक्कम सुरक्षा कवच लागते आणि ते सुरक्षा कवच हक्क पुरविते. त्यामुळे प्रख्यात विचारवंत हॅरल्ड लास्की, असे म्हणतो कि हक्कान शिवाय स्वातंत्र्याची रुजवत होवू शकत नाही, त्यामुळे प्रत्येक राज्याची ओळख त्याने कितपत हक्कांची तरतूद केली आहे यावरून ठरते.

***हक्कांचा मुलभूत अर्थ तीन पद्धतींनी समाजाला जाऊ शकतो***

१) ***व्यक्तींच्या मागण्या ( Individual Claims) :-*** हक्क म्हणजे व्यक्तींनी वेळो वेळी केलेल्या वेग वेगळ्या मागण्या होय. पण ह्या सर्व मागण्या हक्क म्हणून लगेच सर्वश्रुतपणे स्वीकारल्या जात नाही. ह्या सर्व मागण्या निःस्वार्थी स्वरूपाच्या असल्या पाहिजेत व त्याचे मुलभूत गुणधर्म हे वैश्विक असले पाहेजीत. थोडक्यात मागण्या ह्या निस्वार्थी: व निर्लोभी इच्छा असाव्यात व सार्वत्रिक सेवा आणि विवेकाच्या कसोटीवर टिकायला पाहिजेत. व्यक्तीच्या वैयक्तिक मागण्या ज्यामध्ये स्वार्थी हेतू असतो त्यांना सामाजिक पातळीवर स्वीकृती कधीच मिळत नाही म्हणून त्यांचे परिवर्तन हक्कांमध्ये कधीच होवू शकत नाही.

***२) सामाजिक पातळीवरील अधिकृत मान्यता:-*** मागण्यांचे हक्कांमध्ये रुपांतर होण्यासाठी सामाजिक पातळीवरील स्वीकृती अत्यंत महत्वाची असते. उदा. एका व्यक्तीने जर अशी मागणी केली असेल कि कोणालाही कोणाचा जीव घेवू शकत नाही, तर अशा मागण्यांना लगेच समाज मान्यता मिळते कारण सर्वांनाच आपला जीव प्यारा असतो. त्यामुळे अश्या मागण्यामधून जीविताच्या हक्काची मुहूर्तमेढ रोवली जाते. थोडक्यात सर्व समाजाने एकाच प्रकारच्या मागण्या केल्यावर त्याला लवकर समाज मान्यता मिळते व हक्कांची निर्मिती होते.

***३) राजकीय मान्यता :-*** मागण्यांना सामाजिक पातळीवर जर मान्यता व स्वीकृती मिळाली तर त्या फक्त अमूर्त स्वरूपाच्याच मागण्या म्हणून ओळखल्या जातात. राज्यसंस्थेने त्या सामाजिक पातळीवरील सर्व मागण्या मान्य केल्यावरच त्याला वैधानिक स्वरूप प्राप्त होते. राजकीय स्वीकृतीनंतरच मागण्यांचे लौकिक अर्थाने हक्कात रुपांतर होते.

### १.१.२ हक्काच्या विविध व्याख्या

I) **ऑक्सफर्ड विद्यापीठ :-** निश्चित अशा क्षेत्रातील अनुमती दिलेली व निषिद्ध मानलेल्या कृतीचे यथोचित असे मानक म्हणजे हक्क होय.

II) **बर्नड बसॉन्के:-** हक्क म्हणजे समाजाला मान्य असलेली व राज्याने कायद्याद्वारे आमलात आणलेली मागणी होय.

III) **मेरीमियम वेबस्टर शब्दकोश :-** हक्क म्हणजे असे काहीतरी ज्यावरती एखाद्याचा न्याय्य दावा असतो, उदा. सत्ता, किंवा विशेषाधिकार

IV) **हॅरल्ड, लास्की:-** ज्या परिस्थितीच्या घटकांशिवाय व्यक्तीला आपली सर्वांगीण प्रगती साध्य करता येत नाही, त्या परिस्थितीच्या घटकांना हक्क असे म्हणतात.

V) **टी. एच. ग्रीन :-** व्यक्तीच्या आंतरिक विकासासाठी आवश्यक असणारी बाह्य परिस्थिती म्हणजे हक्क होय.

VI) **अर्नेस्ट बर्केर:-** हक्क म्हणजे अशी बाह्य परिस्थिती जी, व्यक्तिमत्वाच्या क्षमतांच्या अधिकतम विकास साधण्यासाठी अत्यावश्यक असते.

## १.२ हक्कां संदार्भातील विविध सिद्धांत:-

हक्कांसंदर्भात वेग वेगळ्या विचारवंतांनी आपल्या पद्धतीने विविध दृष्टीकोन मांडले आहेत व ह्या विविधांगी दृष्टीकोनातून विविध सिद्धांत आपल्याला सांगता येतील. हे सिद्धांत पुढील प्रमाणे.

### १.२.१ नैसर्गिक हक्कांचा सिद्धांत

काही सिद्धांत असे मानतात की ह्या जगात काही हक्क हे व्यक्तिगत आयुष्यासाठी अत्यंत पायाभूत व आवश्यक असे असतात व म्हणून त्यांना नैसर्गिक हक्क असे म्हणता येऊ शकेल. व्यक्तिगत हक्कांच्या मागण्यांना मुलभूत आधार सर्वप्रथम नैसर्गिक हक्क ह्या सिद्धांत पासूनच आला. नैसर्गिक हक्क हे महत्वपूर्ण स्वरूपाच्या खरेतर मागण्या आहेत कारण त्या निसर्गातूनच तयार झाल्या आहेत आणि म्हणून त्या नैसर्गिक कायद्याचाच भाग आहे. त्यामुळे हा सिद्धांत असे मानतो कि नैसर्गिक हक्क हे नैसर्गिक कायद्याचाच एक भाग आहे. नैसर्गिक हक्कांची उत्पत्ती प्राचीन रोम कालखंडात झालेली आहे. रोम महील सर्व लोक व रोम साम्राज्याखालील सर्व प्रदेशाना समान जीविताचे नियम लागू आहेत. रोमन यांनी सर्व व्यक्तींना लागू असलेल्या समान तत्वाच्या संस्थाना नैसर्गिक कायदा असे म्हटले आहे.

i) **सामाजिक करार आणि नैसर्गिक हक्क -** सामाजिक करारवाद्यांनी नैसर्गिक हक्कांच्या सिद्धांताच्या विकासामध्ये अत्यंत महत्वाचे योगदान दिले आहे. होब्ज, लॉक व रुसो हे तीन विचारवंत सामाजिक करारवादी विचारवंत म्हणून ओळखले जातात. त्यांनी काल्पनिक निसर्गावास्थेचे वर्णन केले आहे व त्यामध्ये हक्कांचे अस्तित्व कसे होते याचे विवेचन करताना नैसर्गिक हक्क हि संकल्पना प्रतिपादित केली आहे. सामाजिक करारवादी असे मानतात कि व्यक्ती ला निसर्गदत्त स्वरूपाचे हक्क होते व ते सर्व हक्क राज्यसंस्थेच्या उत्क्रांतीआधी पासूनच मानवाला प्राप्त झालेले आहेत. हे हक्क निसर्गावस्थे मध्ये प्रत्येकाला प्राप्त झाले होते. पुढे नागरी समाजामध्ये राज्यकर्ता व सामान्य शासित जनता यामध्ये करार झाला व हे सर्व हक्क जसेच्या तसे सामान्य लोकांसाठी अग्रेषित झाले. सामाजिक करारवादी ह्या हक्कांचे वर्णन अदेय व अविभाज्य असे करतात व पुढे असे सांगतात कि हे सर्व हक्क कोणत्याही व्यक्तीकडून राज्यसंस्था हिरावून घेवू शकत नाही. सामाजिक करारवाद्यांच्या मते हे सर्व हक्क अवर्णनीय स्वरूपाचे आहेत व ते कोणत्याही सबबीवर सार्वभौम अधिसात्तेने विहित केलेले नाहीत.

ii) **नैसार्गीत हक्कांचे उद्धेश्यवादी किंवा हेतुदर्शक (**teleological ) **अवलोकन** :- हेतुदर्शक दृष्टीकोन म्हणजे कोणत्याही घटनेचे वर्णन वा विवेचन करावाचे झाल्यास त्यामुळे कोणते परिणाम घडून येतील हे सांगण्यासाठी त्या विवेचनाचा नेमका हेतू किंवा उद्धेश कोणता आहे याचे स्पष्टीकरण म्हणजे उद्धेश्यवादी किंवा हेतुदर्शक अवलोकन. सामाजिक करारवादी नैसर्गिक हक्कांचे ह्याच परिप्रेक्ष्यातून अवलोकन व विवेचन करतात. ह्या दृष्टीकोनाच्या मदतीने सामाजिक करारवादी व्यक्तिगत हक्क व

मानवी आयुष्याचे अंतिम ध्येय्य काय आहे याची सांगड घालतात. हे हक्क कोणत्याही संस्थात्मक रचनेवर अवलंबून नाहीत तर ते मानवाच्या नैसर्गिक स्वभावातून उत्क्रांत होतात व मानवी जीवनाच्या उद्धीष्ट्यांची पूर्तता करतात. उदा. प्रख्यात अमेरिकन तत्ववेत्ता थोमास पेन याने आपल्या **rights of man** ह्या पुस्तकात नैसर्गिक हक्कांचा सिद्धांत हेतुदर्शक दृष्टीकोनातून मांडला.

iii) **मनुष्याच्या प्रत्येक कृतीक्षेत्रावर निसर्गाचे नियमन असते:-** हे सिद्धांत निसर्गालाच देव मानतो व म्हणून मानवाच्या प्रत्येक कृतीवर निसर्गाचा अंमल असतो. परिणामतः व्यक्तीच्या विवेकाचे देखील नियमन निसर्गारच करतो. ह्या सिद्धांताने राजाला देवाची प्रतिमा मानले आहे व राजाच देवचा खरा प्रतिनिधी आहे व त्याने तयार केलेले कायदे हे देखील ईश्वरदत्तच आहेत असे आणि म्हणून त्यांचे सर्वांनी पालन केले पाहिजे असे हा सिद्धांत मानतो. पण नंतर मात्र ह्या सिद्धांताला अनेक विचारवंतांनी आव्हान दिले व टीकाही केली.

iv) **विवेक आणि न्याय्य-वाजविपणावर आधारित :-** कोणत्याही प्रकारचा पक्षपात किंवा भेदभाव न करता समाजात निष्पक्ष आणि न्याय्य स्वरुपाचे वर्तन व आचरण म्हणजे नैसर्गिक न्याय असे हा सिद्धांत मानतो. परस्पर सामंजस्याने व्यक्ती व्यक्ती एकत्र येवून राजकीय समाज स्थापन करतात व स्वतःच आपले शासन तयार करतात. ह्या प्रकारच्या सहकार्यातून समान नियम व निर्बंध स्वतः भोवती आपल्या प्रतीनिद्धीन मार्फत घालून आपले व आपल्या सहकाराचे जीवन सुकर करतात.

v) **हक्कांच्या अविच्छेद्य व अदेय स्वरूपावर गाढा विश्वास :**थोमास थॉमस हॉब्स व जॉन लॉक यांनी अदेय स्वरूपांच्या हक्कांची चर्चा केली आहे. निसर्गावस्थे मध्ये जे हक्क असतात त्याच्या आधारावर **नैसर्गिक हक्कांच्या अदेय स्वरुपाची पाठराखण केली आहे.** थॉमस पेन व टी. एच. ग्रीन यांनी व्यक्ती मध्ये उपजतच असलेल्या नैतिक मागण्यांच्या आधारावर नैसर्गिक हक्कांच्या सिद्धांताचे विश्लेषण केले आहे. जीविताचा व सुरक्षिततेचा हक्क, स्वातंत्र्याचा, मालमत्तेचा, व अन्न्याला प्रतिकार करण्याच्या हक्कांचे त्यांनी समर्थन केले.

vi) **नैसर्गिक हक्कांसंबंधी प्रचलित विचार -:**प्रख्यात अमेरिकन तत्वज्ञ जॉन रॉल्स व रॉबर्ट नोझीक ह्या समकालीन विचारवंतानी नैसर्गिक हक्कांसंदर्भात मूलगामी तात्विक विवेचन केले आहेसामाजिक करा रवाद्यांवर टीका करून रॉल्स त्यांच्याच वैचारिक चौकटीचा वापर करून सामाताधीष्ठीत सामाजिक व्यवस्था कशी निर्माण होऊ शकेल याचे विवेचन त्याच्या **A theory of justice** ह्या १९७१ मध्ये लिहिलेल्या पुस्तकात केले आहे .सामाजिक स्वरूपाच्या करारातून हक्कांची निर्मिती झाल्यावर सामाताधीष्ठीत सामाजिक व्यवस्था निर्माण होऊ शकते असे त्याने सांगितले आहे. रॉबर्ट नोझीक ह्या समकालीन विचारवंतानी नैसर्गिक हक्कांसंदर्भात मूलगामी तात्विक विवेचन केले आहे. सामाजिक करारवाद्यांवर टीका करून, त्यांच्याच तात्विक चौकटीचा वापर रॉल्स ने केला आहे. रॉल्स त्यांच्याच वैचारिक चौकटीचा वापर करून सामाताधीष्ठीत सामाजिक व्यवस्था कशी निर्माण होऊ शकेल याचे विवेचन त्याच्या **A theory of justice** ह्या १९७१ मध्ये लिहिलेल्या पुस्तकात केले आहे.

सामाजिक स्वरूपाच्या करारातून हक्कांची निर्मिती झाल्यावर सामाताधीष्ठीत सामाजिक व्यवस्था निर्माण होऊ शकते असे त्याने सांगितले आहे. रॉबर्ट नोझीक याने देखील १९७५ साली **Anarchy, state and utopia** हे अत्यंत गाजेलेले पुस्तक लिहिले आहे. ह्या पुस्तकातून त्याने नैसर्गिक व धनसंपत्तीच्या मानवाच्या नैसर्गिक हक्कांसंदर्भात चर्चा केली आहे. नोझिक याने प्रेरणा जॉन जॉन लॉक पासूनच घेतली व मालमत्तेच्या हक्कानं त्याने अनतिक्रमणीय व अनुल्लंघनीय स्वरूपाचे मनले आहे. त्याने असे मत मांडले आहे कि मानवाचे मालमत्तेचे हक्क हेच सर्वात प्रधान हक्क असतात व समानतेच्या तत्वांपेक्षाहि ते महत्वपूर्ण असतात. ह्याच सिद्धांताच्या आधारावर त्याने लोकांच्या नैसर्गिक संपत्ती (people's natural assets) संदर्भात हक्कांचा सिद्धांत म्हणजेच "entitlement theory" मांडली.

## १.२.२ नैसर्गिक हक्कांचा सिद्धांत

हा सिद्धांत असे मानतो कि हक्कांची निर्मिती हि इतिहासातून झाली आहे. इतिहासाच्या पाऊलखुणा नेहमीच मानवी इतिहासाला मार्गदर्शन करत असतात. ह्या सिद्धांत प्रमाणे प्राचीन व ऐतिहासिक कालखंडातील रूढी व परंपार यामधून हक्कांची निर्मिती झाली आहे. प्राचीन रूढी व परंपरांमध्ये व्यावहारिक उपयुक्तता दिसून येते व एका पिढी कडून ती दुसऱ्या पिढीकडे जाते व सरतेशेवटी अशी वेळ येते कि ह्या सर्व परंपरा व चाली रुढींचे परिवर्तन उपजतच असलेया मानवी मागण्यांमध्ये होते व त्या लोकाभिमुख असल्यामुळे त्यांची स्वीकृती होते व हक्क सरतेशेवटी निर्माण होतात.

i) **हक्क व कायदा यांची निर्मिती परंपरांतून झाली आहे :-** ऐतिहासिक हक्कांचा सिद्धांत असे मानतो कि हक्क आणि कायदा यांची निर्मिती प्राचीन आणि ऐतिहासिक परंपरा व वेगवेगळ्या प्रथांपासून झाली आहे. त्यामुळे हक्कान मागची खरी संस्वीकृति (sanction) हि परंपरा व संस्कृती आहे असे हा सिद्धांत मानतो. त्याचबरोबर कायद्याने देखील आपले मूळ रूप प्राचीन परंपरा व रूढी यांच्या अनुषंगानेच धारण केले आहे व यांची वैधानिक मंजुरी मिळाल्यानंतरच राज्या संस्था आपल्या सर्वंकष बळाचा वापर करते. सामाजिक व राजकीय रचनांची क्रांतिकारी पुनर्रचनेच्या पद्धतीने हक्कांची निर्मिती करता येते ह्या जहाल विचारसरणीला हा सिद्धांत छेद देतो. एडमंड बर्क, हेन्री मैन, मॅकीव्हर, बर्जेस, यांसारख्या तत्वावेत्त्यानी हक्कांच्या ऐतिहासिक सिद्धांताची पाठराखण करताना त्याचा जोरदार पुरस्कार देखील केला.

**ii)** **दीर्घकाळ वाहिवाटीमुळे मान्य झालेल्या संस्थांना अधिक महत्व :-** प्रख्यात तत्वज्ञ एडमंड बर्क हा ऐतिहासिक हक्कांच्या सिद्धांताचा सर्वात मोठा पुरस्कर्ता म्हणून ओळखला जातो. त्याची सुप्रसिद्ध कायदा प्रणीत संस्थानांची तत्वप्रणाली हक्कांच्या ऐतिहासिक सिद्धान्तांचीच साक्ष देते. त्यच्या मते सर्व प्रकारच्या राजकीय संस्था ह्या एक प्रकारच्या दीर्घकाळ वाहिवाटीमुळे मान्य झालेल्या संस्थांना असतात व त्याचा पाया पारंपारिक रुढि मध्ये असतो. त्याच्या विवेचनाच्या पुष्ट्यर्थ बर्क याने फ्रेंच राज्यक्रांतीचे उदाहरण दिले आहे. ह्या राज्यक्रांतीवर त्याने खरमरून टीका केली आहे. स्वातंत्र्य, समता व बंधुता प्राप्त करण्यासाठी फ्रेंच लोकांनी जो क्रांतीचा मार्ग

अवलंबविला होता तो अत्यंत असामंजस्य स्वरूपाचा होता. या उलट बर्क याने इंग्लंड माहे झालेली रक्तविरहित क्रांतीला पसंती दिली आहे. ह्या गौरवशाली क्रांतीने घटनात्मक तरतुदींची तर रुजवत तर केलीच पण इंग्लंड मधील वैभवशाली परंपरा देखील अबाधित ठेवली.

iii) **ऐतिहासिक सिद्धांताचे मूल्यमापन:** थोडक्यात सांगायचे झाल्यास ऐतिहासिक हक्कांचा सिद्धांत आदिम मानवी संस्कृती व प्रथा या मध्ये हक्कांची उत्क्रांती शोधतो. पण वस्तुनिष्ठतेचा निकष लावल्यावर असे दिसते कि सर्वच हक्कांची निर्मिती हि प्राचीन व आदिम काळात होणे व्यवहार्य नाही. म्हणून ह्या सिद्धांतामध्ये काही प्रमाणात मर्यादा देखील येतात. असे असते तर प्राचीन कालखंडातील अत्यंत अन्यायकारी, जुलमी व दमनकारी कायदे आज सुद्धा प्रचलित असते. पण तसे झाले नाही, कारण आधुनिक लोकशाहीची कस धरणारे सर्वरच दडपशाही विरोधी भूमिका घेतात.

### १.२.३ हक्कांसंदर्भातील वैधानिक सिद्धांत

हक्का संदर्भातील वैधानिक सिद्धांत हा हक्कांची निर्मिती कशी झाली हे सांगताना, विधिसंमत व विधीपरायणतेवर आधारित युक्तिवाद करतो. ज्या कायदा वर्धित हक्कांच्या मुळाशी अधिसत्तेचा भरभक्कम आधार असतो त्या कायद्यातून हक्कांची निर्मिती होते. हा सिद्धांत असे मानतो कि हक्कांचे स्वरूप हे निरंकुश अथवा किंवा दैवी शक्तीने नेमून दिलेल्या तत्वांवर आधारलेले नसते, तर ते राज्याने तयार केलेले असतात. ह्या सिद्धांताप्रमाणे जर सर्वप्रकारच्या हक्कांची उत्क्रांती हि राज्यसंस्थेमधून झाली असेल तर, राज्यविरहित किंवा राज्याच्या परीपेक्ष्या बाहेर कोणतेच हक्क असू शकत नाही. त्याचबरोबर राज्याविरोधातही कोणतेच हक्क कोणाला मिळू शकत नाही. यावरून एका अर्थाने असे सांगता येईल कि हा सिद्धांत राज्याविरुद्ध बंडाचे समर्थन करत नाही. हक्क हे देश विधीच्या प्रक्रियेशी संबंधित असल्यामुळे तो कालखंडानुरूप बदलत जातो.

i) **राज्याच्या कायद्यातून हक्कांची निर्मिती :** ह्या सिद्धांताप्रमाणे हक्कांची निर्मिती दैवी सिद्धान्तामधून झालेली नाही किंवा नैसर्गिक पद्धतीने सुद्धा हक्कांची निर्मिती झालेली नाही. त्यामुळे हक्कांचे स्वरूप हे सर्वंकाश किंवा निरंकुश नसते. हक्कांची निर्मिती हि राज्यामार्फत झालेली असते. त्यामुळे हक्कांच्या निर्मितीच्या केंद्रस्थानी राज्याची सकारात्मक भूमिका असते, कारण राज्यानेच हक्कांची वास्तविक स्वरुपात निर्मिती केलेली असते. राज्यसंस्था सामान्य नागरिकाच्या हक्कांच्या संरक्षणार्थ आवश्यक असलेले सर्व प्रकारचे बाह्य वातावरण तयार करते. हक्कांचे अस्तित्व असल्यामुळेच मानवी अस्तित्वाला आवश्यक असलेल्या राजकीय समूहाची निर्मिती देखील करण्यास राज्याला सहज जमते. हक्कांशिवाय राज्य कोणत्याही परीस्तीतीत राजकीय समूह निर्माण करू शकत नाही.

ii) **जेरेमी बेंथम यांचे योगदान:** सुप्रसिद्ध उपयुक्ततावादी विचारवंत जेरेमी बेंथम हा तत्ववेत्ता वैधानिक हक्काच्या सिद्धांताचा सर्वात मोठा पुरस्कर्ता म्हणून ओळखला जातो. बेंथम याने नैसर्गिक हक्कांवर टीका करताना नैसर्गिक हक्कांचे वर्णन "अवष्टंभावर आधारलेला अलंकारयुक्त मूर्खपणा" असे केले आहे. त्याने सांगितले आहे कि हक्कांची निर्मिती हि संघटीत समाजात व कायद्याने झाली आहे. त्यामुळे हक्क व

कायदा यांना वेगळे आपण करूच शकत नाही. वैधानिक संरचनेमध्येच हक्क हे खऱ्या अर्थाने आकाराला येतात.

iii) **वैधानिक व्यवस्थेच्या नियमावली मध्ये वैधानिक हक्कांचे अस्तित्व असते :-** वैधानिक हक्क म्हणजे असे हक्क कि जे वैधानिक व्यवस्थेच्या नियमावली मध्ये आकाराला येतात. विविध निर्णय जे वैधानिक व्यवस्थेच्या अंतर्गत येणारे असतात व जे अधिकारयुक्त अनुरूप घटक म्हणूनही ओळखले जातात. प्रत्यक्षतावाद्यांच्या मते हक्क म्हणजे असे हितसंबंध जे वैधानिक दृष्ट्या अधिग्रहित व सुरक्षित असतात. जॉन ऑस्टिन याने वैधानिक हक्क व इतर प्रकारच्या हक्कांमध्ये तुलना केली आहे उदा. नैसर्गिक वा नैतिक हक्क. त्याचा मते वैधानिक हक्क म्हणजे असे हक्क जे कायद्याने तयार केलेले असतात व इतर हक्क म्हणजे असे हक्क ज्यांना कायद्याचे संरक्षण नसते व ते न्यायालय निर्णययोग्य देखील नसतात.

iv) **न्यायाचे अधिराज्य व वैधानिक हक्क :-** प्रख्यात विचारवंत सल्मंड यांच्या मते वैधानिक हक्क म्हणजे असे 'हितसंबंध' ज्यांना मान्यता व संरक्षण न्यायाच्या अधिराज्याने दिलेले असते. हितसंबंध म्हणजे कोणतेही असे हितसंबंध ज्यांच्या प्रती आदर दर्शविणे म्हणजे कर्तव्य मानले जाते व अनादर म्हणजे गुन्हा. ह्या विधाना मध्ये दोन घटक आहेत, ते म्हणजे वैधानिक मान्यता व वैधानिक संरक्षण. हितसंबंधांचे परिवर्तन वैधानिक हक्कांमध्ये होण्यासाठी, हे दोन्ही घटक सामाकालिक व एकाचवेळी हितसंबंधांमध्ये अस्तित्वात असले पाहिजेत हे महत्वाचे असते.

v) **वैधानिक हक्कांची वैशिष्ट्ये:-** सल्मंड यांनी वैधानिक हक्कांची पाच महत्वाची वैशिष्ट्ये दिली आहेत ती पुढील प्रमाणे आहेत:-

- वैधानिक हक्क व्यक्ती व्यक्ती मध्ये विहित असतात ज्यांच्या कडे हक्कांची मालकी असते, जे त्याच्या अधीन असतात ज्यांच्या कडे त्याची मालकी असते किंवा ज्यांचा तो हक्क असतो.
- अशा व्यक्ती विरुद्ध ते असतात ज्याच्या वर कर्तव्याचे परस्परसंबंधित उत्तरदायित्व असते.
- व्यक्तीला कायद्याच्या चौकटीत राहून व्यवहार करण्याचे बंधन हक्क आखून देतो.

## १.२.४ हक्कांसंदर्भातील आदर्शवादी सिद्धांत

हक्कांसंदर्भातील आदर्शवादी सिद्धांत हा नैसर्गिक वा वैधानिक सिद्धांत पेक्षा खूप वेगळा आहे. हक्कांसंदार्भातील आदर्शवादी सिद्धांत हा व्यक्तिमत्व सिद्धांत म्हणूनही ओळखला जातो. ह्या सिद्धांताच्या पाठीराख्यानप्रमाणे, हक्क म्हणजे अशी बाह्य परिस्थिती जिचा उपयोग व्यक्तीच्या अंतर्गत विकासासाठी व वास्तविक विकासासाठी होतो. हक्क जर नसले तर कोणत्याच व्यक्तीला स्वताचे सर्वोत्तम स्वत्व प्राप्त होऊ शकत नाही.

i) **मानवी व्यक्तिमत्वाची परिपूर्णता :** सर्व प्रकारचे हक्क हे मानवी व्यक्तिमत्वाची परिपूर्णता ह्या ध्येय्याकडे झुकलेले व दिग्दर्शित झालेले असतात. व्यक्तिमत्वाचा हक्क हा मनुष्याचा सर्वात प्रधान व मुलभूत हक्क आहे व सर्व प्रकारचे हक्क हे त्यातूनच उत्पन्न झालेले असतात. उदा. जीविताचा हक्क, स्वातंत्र्याचा हक्क, मालमत्तेचा हक्क, आणि इतर अत्यंत महत्वाचे व मौलिक असलेले नागरी हक्क हे मानवाच्या व्यक्तिमत्व विकासामध्ये कसे निर्णायक राहिलेले आहेत ते सर्व हक्क. जर यापैकी कोणत्याही हक्कांचा भंग व्यक्ती कडून झाला व त्यामुळे स्व-विकासालाच बाधा निर्माण झाली तर मात्र समाज सर्व प्रकारच्या हक्कांपासून दोषींना वंचित ठेवू शकते.

ii) **भौतिक परिस्थितीचे संरक्षण :** ह्या सिद्धांताच्या पाठीराख्यांना असे वाटते कि व्यक्तीच्या आयुष्यात हक्कांचे महत्व अनन्यसाधारण आहे. हक्क म्हणजे अशी अत्यावश्यक परिस्थिती ज्याचा उपयोग मानवी व्यक्तिमत्वाच्या पुर्णावस्स्थेसाठी आवश्यक असलेली मुलभूत भौतिक परिस्थिती प्राप्त करण्यासाठी होतो. विवेकी जीवनासाठी अत्यावशक असलेल्या बाह्य परिस्थितीची अखंड सेंद्रिय रचना म्हणजे हक्क असे हा सिद्धांत मानतो.

iii) **व्यक्तीची विवेकी इच्छा:** आदर्शवादी सिद्धांत मानवाच्या विवेकबुद्धीवर विश्वास ठेवणारा सिद्धांत आहे. ह्या सिद्धांता प्रमाणे प्रत्येक मनुष्य मध्ये विवेक अंतर्भूत असतो व हि विवेकी इच्छा सर्वप्रथम समाज स्वीकारतो व नंतर राज्यामार्फत त्याचे परिवर्तन कायद्यात होते. टी.एच. ग्रीन याच्या विवेचनामध्ये ह्या प्रकारचा युक्तिवाद सविस्तरपणे येतो. त्याच्या मते मानवी चेतना नेहमी स्वत्ताच्या हिताबद्दल व मानवाच्या हिताबद्दल प्रयत्नशील असते व यातून मानाव्केंद्री हक्क निर्माण होतात.

## १.३ हक्कांचे वर्गीकरण

i) **नागरी हक्क :-** नागरी हक्क हे व्यक्तीला सामाजिक संधी आणि कायद्याचे समान संरक्षण याची हमी देतो. संधीची व कायद्या पुढील समानता बाहत करताना कोणत्याही कारणाने भेदभाव पाळला जात नाही उदा. वंश, धर्म, किंवा व्यक्तिगत वैशिष्ट्ये. न्यायालयीन खटल्या संदर्भातील हक्कांव्यतिरिक्त, शासकीय सेवांमधील हक्क, सार्वजनिक शिक्षण आणि सर्व प्रकारच्या सार्वजनिक सुविधांच्या न्याय्य वापरा संदर्भातील सर्व हक्क हे नागरी हक्कांमध्ये येतात. लोकशाही व्यवस्थे मध्ये नागरी हक्कांना सर्वात जास्त महत्व असते. राजकीय प्रक्रियेमध्ये व राजकीय समाजात जर व्यक्तींना शहभागाची समान संधी नाकारण्यात आली तर मात्र सबंध नागरी हक्कांचीच पायमल्ली होते. नागरी हक्क हे नागरी स्वातंत्र्य पेक्षा वेगळे असतात. नागरी स्वातंत्र्ये हि काही प्रमाणात नकारात्मक स्वरुपाची असतात कारण ती सर्व, शासन व राज्य संस्था यावर मर्यादा व बंधनं लादण्या संदर्भातील असतात. नागरी हक्क हि सकारात्मक स्वरुपाची असतात कारण ती सर्व शासनाच्या सकारात्मक कृतीला प्रोत्साहन देणारी असतात व त्यातून परिपूर्ण असे कायदे तयार होऊ शकतात.

ii) **राजकीय हक्क :-** राज्य व शासन संस्थेच्या सर्व राजकीय घडामोडी संदर्भातील हक्कांना राजकीय हक्क असे म्हणतात. निवडणूक लढविण्याचा हक्क, मतदानाचा हक्क, राजकीय सभा, आंदोलने, प्रचार इ मध्ये सहभाग घेण्याचा हक्क यामध्ये

समाविष्ट होतो. समाजातील राजकीय क्षेत्रा मध्ये सहभागी होण्याची समान संधीला राजकीय हक्क असे म्हणतात व असा राजकीय हक्क वापरताना कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जाणार नाही याची हमी राजकीय हक्क देतो. आपल्या रास्त मागण्यांसाठी शासन दरबारी राजकीय आवेदन देण्याचा हक्क देखील ह्यामध्ये सामाविष्ट असतो. थोडक्यात राजकीय हक्क म्हणजे अस हक्क जो प्रत्येक नागरिकाला राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्याची समान संधी देतो.

iii) **आर्थिक हक्क: -**स्वताच्या मुलभूत गरजा उदा. अन्न, वस्त्र, व निवारा यांच्या पूर्ततेसाठी प्रत्येक व्यक्तीला उदरनिर्वाहा साठी नोकरी किंवा व्यवसाय करावा लागतो. व्यक्तीच्या नोकरी आणि व्यवसाया संदर्भातील हक्काला आर्थिक हक्क असे म्हणतात. थोडक्यात आर्थिक हक्क म्हणजे असे हक्क जे प्रत्येक व्यक्तीला आर्थिक सुरक्षितता व स्थैर्य प्राप्त करून देण्यास महत्वाची भूमिका बजावतात. आर्थिक हक्क जर अबाधित असतील तरच नागरी आणि राजकीय हक्क प्राप्त होऊ शकतात. प्रत्येक नागरिकाला जर अन्न, वस्त्र, निवारा, कपडे, मुलभूत आरोग्याच्या सोई-सुविधा मिळाल्या तरच ते इतर सर्व प्रकारच्या हक्कांचा उपभोग घेवू शकतात. त्यामुळेच लोकशाहीच्या सुधृढ वाढीसाठी सर्वांना पुरेसे वेतन, आराम व विश्रांतीचा हक्क मिळालाच पाहिजे, किंबहुना त्या व्यक्तीच्या मुलभूत गरजा आहेत.

iv) **सामाजिक हक्क:-** सामाजिक सुरक्षितता, कुटुंबाचे संरक्षण, समाधानकारक राहणीमान, पुरेसे अन्न मिळण्याची तरतूद, शुद्ध पाण्याची उपलब्धता, राहण्याची उत्तम सोय, मालमत्तेचे संरक्षण, मानसिक व शारीरिक स्वास्थ्य इ. ची सहज उपलब्धता सामाजिक हक्क मध्ये अंतर्भूत असतात. जीविताचा यथोचित दर्जा राखण्या संदर्भात जी मुलभूत पायाभरणी करण्यात येते व त्यामुळे जर जर मानवी गरजा पूर्ण होत असतील तर त्या बाह्य वातावरणाला सामाजिक हक्क असे म्हणतात.

v) **संस्कृतिक हक्क:-** कला व संस्कृती किंवा दोन्हीशी निगडीत हक्कांना संस्कृतिक हक्क असे म्हणतात व हे हक्क खूप व्यापक स्वरूपाचे असतात. ह्या हक्कांचा उद्देश फार विस्तृत व व्यापक आहे कारण हा हक्क प्रत्येक व्यक्तीला संस्कृतिक दृष्ट्या सामाच्या मुख्य संस्कृतिक प्रवाहात समायोजित व सामावून घेतो. संस्कृतिक हक्क हे एक प्रकारचे मानवी हक्कच असतात जे प्रत्येकाला आपल्या संस्कृतीच्या विविध पैलूचा आनंद घेण्यास मदत करतात व समानता, मानवी प्रतिष्ठा, भेदभाव विरहित सामाजिक जीवण यांची रुजवत करतो. भाषा, संस्कृती व शैक्षणिक हक्क, संस्कृतिक जीवनातील सहभाग, वारसासंस्कृतीचे जतन, बौद्धिक हक्क, व अल्पसंख्यांकांचे हक्क इ. हक्क संस्कृतिक हक्कांमध्ये येतात.

vi) **विविध समूहाचे हक्क:** गटांचे हक्क म्हणजे असे हक्क जे समूह किंवा एक गट म्हणून तर उपभोगता येतातच पण व्यक्ती म्हणून देखील ते उपभोगता येतात. उदा. विकलांग लोकांचे हक्क हे व्यक्तिगत पातळीवर व समूहा पातळीवर उपभोगता येतात कारण विकलांग हि संज्ञा समूह दर्शविते व सर्व विकलांग हे एक समूह आहे हे त्यातून प्रचलित होते

❄❄❄❄❄❄❄

# २

# स्वातंत्र्य, समता, न्याय

## (Liberty, Equality, Justice)

**घटक रचना**

२.१ स्वातंत्र्य (Liberty) - अर्थ, वैशिष्टे, नकारात्मक स्वातंत्र्य, सकारात्मक स्वातंत्र्य, स्वातंत्र्याचे प्रकार, स्वातंत्र्य रक्षणाचे मार्ग, स्वातंत्र्य आणि कायदा यांचा संबंध

२.२ समता (Equality) - अर्थ व व्याख्या, वैशिष्ट्ये, प्रकार, समतेच्या मार्गातील अडथळे, समतेचे महत्त्व, स्वातंत्र्य व समता संबंध.

२.३ न्याय (Justice) - अर्थ व व्याख्या, न्याय या संकल्पनेचे स्वरूप, न्यायाचे प्रकार, प्रक्रियात्मक वितरण वादी न्याय, न्यायाचा सिद्धांताचे महत्व, स्वातंत्र्य समता न्याय यांचा संबंध.

## २.१ स्वातंत्र्य (Liberty)

**प्रस्तावना -**

आधुनिक राज्यशास्त्रात स्वातंत्र्य या संकल्पनेच्या अभ्यासाला अत्यंत महत्वाचे स्थान आहे. व्यक्तीविकास आणि समाजविकास या दृष्टिकोनातून स्वातंत्र्य ही संकल्पना आवश्यक असते. प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्य हवे असते. आचार, विचार, उच्चार आणि कृती यादृष्टीने व्यक्तीला स्वातंत्र्य प्रिय असते.

जे. एस मिलने ‘स्वातंत्र्य म्हणजे बंधनाचा अभाव’ अशी व्याख्या केली आहे. मात्र ही व्याख्या अपूर्ण ठरते कारण प्रत्यक्ष वस्तुस्थितीचे अवलोकन केले तर समाजात राहणारी कोणतीही व्यक्ती पूर्णपणे स्वतंत्र असूच शकत नाही. ज्या समाजात कोणतेही बंधने नसतात आणि स्वैर आचरणाची मुभा असते त्या समाजात अराजकता असते. समाजातीव दुर्बल घटकांवर अन्याय होतो. त्यासाठी राज्यातील सर्व व्यक्तींना स्वातंत्र्य उपभोगता यावे या हेतूने स्वातंत्र्यावर वाजवी मर्यादा घालणे आवश्यक ठरते.

म्हणजेच व्यक्तीविकास आणि समाजविकास या दृष्टीकोनातून स्वातंत्र्यावर मर्यादा घातल्या जातात. म्हणूनच हर्बट स्पेन्सर याने ‘बंधनात राहून केलेली कृती म्हणजे स्वातंत्र्य’ असे म्हटले आहे.

स्वातंत्र्य ही संकल्पना १९व्या शतकात उदयाला आली स्वातंत्र्य लोकशाहीचा आधारस्तंभ आहे. प्रत्येक व्यक्तीला व्यक्तिमत्व विकासासाठी, प्रतिष्ठेने राहण्यासाठी स्वातंत्र्य आवश्यक असते.

### २.१.१ स्वातंत्र्याचा अर्थ व व्याख्या –

**स्वातंत्र्याचा अर्थ-**

इंग्रजीत Liberty आणि Freedom असे दोन शब्द स्वातंत्र्यासाठी असलेले दिसतात. यातील Liberty हा शब्द व्यक्ती विकासासाठी व्यक्तीच्या स्वातंत्र्यासंबंधी वापरला जातो. तर Freedom हा शब्द सामान्यता राजकीय समाजाच्या स्वातंत्र्याविषयी वापरला जातो. कोलंबिया ज्ञानकोषात Liberty या शब्दाचे वर्णन विविध प्रकारे केलेले आहे उदा. धार्मिक स्वातंत्र्य, भाषण स्वातंत्र्य, आत्मरक्षणाचा हक्क इत्यादी. थोडक्यात व्यक्तीचे राजकीय स्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्य, भाषण स्वातंत्र्य, आर्थिक स्वातंत्र्य व्यक्तीविकासाच्या दृष्टीकोनातून स्वातंत्र्य या अर्थाने Liberty हा शब्द स्विकारला जातो, Liberty हा इंग्लिश शब्द लॅटिन शब्द Liber पासून निर्मान झाला. Liber म्हणजे स्वातंत्र्य किंवा बंधनाचा अभाव होय. पूर्णतः बंधनाचा किंवा मर्यादांचा अभाव असणाऱ्या समाजात अत्याचार, अन्याय आणि अराजकता निर्माण होण्याचा धोका असतो. त्यामुळे जरी प्रत्येक व्यक्तीला व्यक्तीमत्वाचा विकास साधण्यासाठी स्वातंत्र्याची गरज असली तरी राज्याकडून कायद्याद्वारे काही बंधने, मर्यादा व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर  घातल्या जातात.  ही बंधने व्यक्तीस्वातंत्र्य तंत्राला पूरक व पोषक असतात. व्यक्तिविकास आणि समाजविकास या दृष्टीकोनातून स्वातंत्र्यावर काही मर्यादा घातलेल्या असतात.

**स्वातंत्र्याच्या व्याख्या**

१) प्रा. लास्की – “समाजातील सर्व व्यक्तींना आपला सर्वांगीण विकास करण्यासाठी आवश्यक अशी सामाजिक परिस्थिती (संधी) निर्माण करून देणे म्हणजे स्वातंत्र्य होय.”

२) हर्बट स्पेन्सर – “अन्य व्यक्तींना अपाय न पोहचविता कोणतीही गोष्ट करण्याची अनुमती असणे म्हणजे स्वातंत्र्य होय,”

३) मैकेनी – “स्वातंत्र्य म्हणजे बंधनाचा अभाव नाही तर अनुचित बंधनाऐवजी उचित बंधनाची व्यवस्था होय.”

४) प्रां. टी. एचू. ग्रीन : “स्वातंत्र्य म्हणजे करण्यास योग्य आहे असे कार्य व उपभोगण्यास योग्य असा आनंद प्राप्त करण्याची भावनात्मक शक्ति होय.”

५.) डॉ. आशीर्वादन – “एखाद्याच्या अभिव्यक्तीसाठी आणि विकासासाठी संधी असणे म्हणजे स्वातंत्र्य होय.”

६) जी.डी. एच. कोल – “स्वातंत्र्य म्हणजे की, ज्यामध्ये बाह्य अडथळ्याशिवाय व्यक्तीला आपल्या व्यक्तिमत्वाचे प्रकटीकरण करता येते.”

७) प्रा. सिली – “स्वातंत्र्य म्हणजे अतिशासनाचा विरोध होय.”

## २.१.२ स्वातंत्र्याची वैशिष्टे / लक्षणे -

१) सकारात्मक स्वरूप - व्यक्तीला आपला सर्वांगिण विकास करून घेण्याची संधी व वातावरण उपलब्ध करून देणे म्हणजे सकारात्मक स्वातंत्र्य होय. व्यक्तीच्या हिताच्या दृष्टीने, विकासाच्या दृष्टीने तिच्यावर कमीतकमी बंधने लावणे. इतरांच्या हिताचा आणि विकासाचा विचार करून तिच्यावर काही बंधने लादणे आवश्यक ठरते. व्यक्ति स्वातंत्र्याचा विचार करताना समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या हिताचा विचार करणे आवश्यक आहे.

२) नकारात्मक स्वरुप जे.एस्. मिलने व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर कोणत्याही - प्रकारची बंधने नकोत असे प्रतिपादन केले आहे. अभिव्यक्ती, बौद्धिक उपक्रम, धर्म विश्वास सृजनशीलता व्यक्तिगत आवड-निवड याचा यात समावेश होतो. या स्वातंत्र्यात राज्याचा हस्तक्षेप अजिबात नको असे मिल म्हणतो. या प्रकारच्या स्वातंत्र्यामुळे समाजात अराजकता निर्मान होते म्हणूनच समाजात राहत असतांना मनुष्याने काही बंधने पाळणे अनिवार्य आहे

३) सर्वव्यापी स्वरूप – समाजात, देशात, जनसमूहांच्या मनात स्वातंत्र्याची भावना वास करीत असते. स्वातंत्र्य हे सर्वव्यापी आहे. त्याला स्थळ, काळ परिस्थिती यांचे बंधन नसते. स्वातंत्र्य ही एक भावना असून ती सर्व मानवाच्या मानवी समूहाच्या ठिकाणी वास करीत असते. औपचारिकरित्या स्वातंत्र्य मिळविण्यासाठी सर्वच प्रयत्न करीत असतात. त्यासाठी संघर्ष करण्याची तयारी असले

४) सर्वसमावेशकता - स्वातंत्र्य हे सर्वसमावेशक आहे. व्यक्ती गरीब असो वा श्रीमंत, अशिक्षित असो वा सुशिक्षित, मागास किंवा सुधारलेली, स्वातंत्र्य हे सर्वांना प्रिय असते. बंधन कोणालाच सुखद वाटत नाही. स्वैर संचार, हवा तो आहार आणि विहार, मुक्त परस्पर संबंध हे सर्व स्वातंत्र्याच्या अविष्काराचे आहेत.

५) सर्वांगीण विकासाचा उद्देश - प्रत्येक व्यक्तीला आपला विकास करून घेण्यासाठी स्वातंत्र्य हवे असते, संधी हवी असते. म्हणूनच इतर व्यक्तींच्या स्वातंत्र्याचा विचार करून काही विवेकी बंधने स्वातंत्र्यावर लादावी लागतात. उचित विवेकी बंधने लादुन व्यक्तीला विकासाची जास्तीत जास्त संधी उपलब्ध करून देण्याचे कार्य राज्यसंस्था करीत असते.
समाजातील प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्याचा उपभोग घेता यावा अशी परिस्थिती निर्माण करण्याचे कार्य राज्याला करावे लागते. थोडक्यात व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर कमीत-कमी बंधने लादुन व्यक्तीचा सर्वांगीण विकास साधणे हा उद्देश स्वातंत्र्य या संकल्पनेमागे असतो.

६) बदलते स्वरूप - स्वातंत्र्य या संकल्पनेचे स्वरूप बदलत असते. स्वातंत्र्याचा अर्थ आणि व्याप्ती निश्चित ठरविता येणे कठीण असते. कारण परिस्थिती आणि वैचारिक प्रगती यात होणाऱ्या बदलांमुळे स्वातंत्र्य या संकल्पनेचे स्वरूपही बदलत असते.

## २.१.३ सारांश

स्वातंत्र्य ही व्यापक संकल्पना असून तिचे अविष्कारण विविध स्वरूपात होत असते. प्रत्येक व्यक्तीला आपला विकास करून घेण्यासाठी स्वातंत्र्य हवे असते. तेव्हा तेव्हा इतर व्यक्तीच्या या स्वातंत्र्याचा, विकासाचा विचार करून व्यक्तिस्वातंत्र्यावर काही विवेकी बंधने ला लादावी लागतात. निसर्गातून मिळालेल्या अनिर्बंध स्वातंत्र्यावर समाज हिताच्या दृष्टीने काही अनिवार्य बंधने येतात. ही बंधने गैरवाजवी व प्रमाणबद्ध असावीत ही अपेक्षा असते. व्यक्तिला त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करण्यासाठी स्वातंत्र्य असणे अत्यंत आवश्यक आहे.

## २.१.४ नकारात्मक आणि सकारात्मक स्वातंत्र्य (Negative and Positive Liberty)

**प्रस्तावना -**

बर्लिन या विचारवंताने 20 व्या शतकाच्या उत्तरार्धात स्वातंत्र्य या संकल्पनेबाबत व्यापक विचार मांडले आहेत. त्यांच्या मतानुसार राजकीय व सामाजिक हस्तक्षेपाचा अभाव म्हणजे नकारात्मक स्वातंत्र्य होय. आत्मलक्षी, आत्म निर्देशित, स्वयं निर्णय स्वयं कार्य करण्याची स्वतंत्रता म्हणजे सकारात्मक स्वातंत्र्य. बर्लिन यांनी आपल्या 'स्वातंत्र्याच्या दोन संकल्पना' या ग्रंथात स्वातंत्र्याच्या नकारात्मक आणि सकारात्मक स्वातंत्र्य या दोन संकल्पना मांडल्या आहेत.

नकारात्मक स्वातंत्र्य (Negative Liberty) अभिजात उदारमतवादाच्या या सिद्धांतातून स्वातंत्र्याच्या नकारात्मक स्वातंत्र्य या संकल्पनेचा उदय झाला. जॉन लॉक, डेव्हिड ह्यूम, ॲडम स्मिथ, हर्बर्ट स्पेन्सर, जे. एस. मिल यांच्या विचारातून ही संकल्पना स्पष्ट होते.

नकारात्मक स्वातंत्र्य म्हणजे बाह्य बंधनातून मुक्ती. व्यक्तीला तिच्या इच्छेविरुद्ध कृती करण्यास जी बंधने प्रवृत्त करतात त्या बाह्य बंधनांचा अभाव म्हणजे नकारात्मक स्वातंत्र्य होय. ही बंधने सामाजिक, एक आर्थिक, धार्मिक व व राजकीय स्वरूपाची. अर्थात राजकीय स्वरूपात नकारात्मक स्वातंत्र्य म्हणजे राज्याच्या मनमानी शक्तीवर बंधने व समाजातील आर्थिक व सामाजिक क्षेत्रात राज्याचा हस्तक्षेप कमी, मर्यादित राज्यसंस्थेचा पुरस्कार तसेच आर्थिक बाबतीत व्यक्तीला पूर्ण स्वातंत्र्य स्वयम् नियंत्रीत अर्थकारण या सर्व तत्त्वांचा पुरस्कार होय.

## २.१.५ नकारात्मक स्वातंत्र्याची वैशिष्ट्ये -

१) **तात्विक विचार -** नकारात्मक स्वातंत्र्याची संकल्पना प्रथमत: उदारमतवादाच्या व्यक्ती, समाज, राज्याच्या प्रति महत्त्वाच्या व तात्विक विचारावर आधारित आहे. ही संकल्पना व्यक्तीच्या व्यक्तिगत इच्छा, बौद्धिकता, हित यावर विश्वास ठेवते. इथे प्रत्येक व्यक्तीला आपले हित माहिती असून ते प्राप्त करण्याचे मार्ग ही माहीत आहेत. परंतु त्यासाठी तो बाह्य बंधनापासून मुक्तीची अपेक्षा करतो.

२) **बाह्य बंधनांपासून मुक्ती -** नकारात्मक स्वातंत्र्याचा अर्थ बाह्य बंधनांपासून मुक्ती असा आहे. परंतु स्वातंत्र्य कशापासुन? हा प्रश्न जितका महत्त्वाचा आहे तितकाच स्वातंत्र्य कशासाठी? हा प्रश्नही महत्त्वाचा असतो. याविषयी हॉब्ज ने स्वातंत्र्याला कायद्याचा अभाव मानले आहे. तर काही विचारवंत स्वातंत्र्य म्हणजे सामाजिक कायद्यात्मक बंधनापासून मुक्ती असे मानतात. नॉझिकच्या मते आत्म अस्तित्वाचा नैतिक अविष्कार म्हणजे स्वातंत्र्य होय.

३) **बंधनाचा अभाव -** नकारात्मक स्वातंत्र्य या संकल्पनेत बंधनाच्या अभावाची संकल्पना अधिक व्यापक आहे. ही बंधने राजकीय, आर्थिक, कायदेशीर, धार्मिक, सामाजिक इत्यादी स्वरूपाची असू शकतात. राजकीय संदर्भ भात याचा अर्थ राज्याला अतिरिक्त शक्तींवर मर्यादा असणे होय. आर्थिक संदर्भात व्यापार, ऐच्छिक भांडवलवाद, अर्थव्यवस्थेचा व संपत्तीचा अमर्याद अधिकार, नागरिकांच्या संदर्भात विचार, भाषण, अभिव्यक्ति स्वातंत्र्य तसेच व्यक्तिगत पातळीवर व्यक्तीला आपल्या जीवनासंबंधीचे निर्णय राज्य व समाजाच्या दबावाशिवाय घेता आले पाहिजेत किंवा घेण्याचे स्वातंत्र्य मिळणे आवश्यक असते.

४) **कायद्यावर नियंत्रण -** राज्याचे कायदे ते स्वातंत्र्याचा संकोच करू शकणार नाहीत, परंतु तू सामाजिक व्यवस्थेसाठी नियंत्रित करू शकतात. कारण स्वातंत्र्य हे मुख्यता राज्यापासून चे स्वातंत्र्य आहे. स्वातंत्र्य व कायदे हे परस्पर पूरक असले तरी कायद्यामुळे व्यक्तीवर नियंत्रण वाढते व स्वातंत्र्य कमी होते. म्हणून जेवढे कायदे कमी तेवढे स्वातंत्र्य जास्त असे नकारात्मक स्वातंत्र्याचे स्वरूप आहे.

५) **समानता व लोकशाही यात संतुलन-** स्वातंत्र्याचा लोकशाही संपत्ती, मालमत्ता यांच्याशी संबंध आहे. परंतु हे स्वातंत्र्यासाठी आवश्यक नाहीत. समानता व लोकशाही हे स्वातंत्र्यासाठी आवश्यक तसेच घातकही आहेत.

### २.१.६ नकारात्मक स्वातंत्र्यावरील टीका-

नकारात्मक स्वातंत्र्यावर तत्त्वज्ञानात्मक, नैतिक, आर्थिक दृष्टिकोनातून टीका केली जाते ती पुढील प्रमाणे पाहता येईल.

१) **तत्त्वज्ञानात्मक आधार -** टीकाकारांच्या मते अभिजात उदारमतवादी व उपयुक्ततावादी हे व्यक्तीच्या स्वभावाला पूर्णतः समजू शकले नाही. ही व्यक्ती ही पूर्णतः हा विवेकी किंवा पूर्णतः हा स्वार्थी नाही. ज्याप्रमाणे उदारमतवादी विचारवंत म्हणतात त्याप्रमाणे व्यक्तीही एकटी नाही. व्यक्ती सतत समुदायामध्ये राहत असल्यामुळे ती एक सामाजिक प्राणी आहे तसेच व्यक्तीचे आदर्श व उद्देश हे समाजातच निश्चित होतात.

२) **नैतिक दृष्टिकोनातून टीका -** स्वातंत्र्य म्हणजे व्यक्तीला आपल्या मर्जीप्रमाणे कोणतेही कार्य करण्याची मुभा असे नव्हे, तर त्याला असे करण्याची संधी दिली पाहिजे जे कार्य नैतिक दृष्टीने महत्त्वाचे असते. ते कारण नैतिक मूल्ये ही स्वातंत्र्याच्या विरोधी नसतात तर ती ती स्वातंत्र्याच्या योग्य अंमलबजावणीची हमी देतात. स्वातंत्र्य हे नैतिक मूल्यांशिवाय अपूर्ण आहे.

३) **आर्थिक दृष्टिकोनातून टीका -** आर्थिक दृष्टीने तिने नकारात्मक स्वातंत्र्यात मुक्त स्पर्धा, स्वयम् नियंत्रीत अर्थव्यवस्थेचा पुरस्कार, संपत्तीच्या केंद्रीकरणावर भर दिला जातो. त्यामुळे अनेक वंचितांना त्यांच्या हक्कापासून मुकावे लागते. यामुळे आर्थिक लाभ प्राप्त होत नाही कारण ही अर्थव्यवस्था थोड्याच लोकांच्या विकासाला प्रोत्साहन देते. म्हणूनच मार्क्सवादी व उदारमतवादी यावर टीका करतात.

## २.१.७ सकारात्मक स्वातंत्र्य (Positive Liberty)

सकारात्मक स्वातंत्र्य ही संकल्पना स्वातंत्र्याला समाज सामाजिक व आर्थिक परिस्थिती अधिकार, समता, न्याय यांच्याशी जोडते. ही संकल्पना मार्क्सवादी आधुनिकतावादी यांच्या टीकेच्या या परिणामातून उदयाला आली.

ही संकल्पना टी एच ग्रीन, बोसांके, हॉब्ज, लॉक, लस्की, बार्कर, इ. विचारवंतांच्या विचारातून स्पष्ट होते.

### सकारात्मक स्वातंत्र्याची वैशिष्ट्ये -

१) **न्यायसंगत व व्यावहारिक स्वरूप -** सर्व बंधने योग्य नसतात. सकारात्मक स्वातंत्र्यानुसार सामाजिक आवश्यकतेसाठी साठी काही बंधने ही स्वातंत्र्याला विरोधी नसतात तर ती स्वातंत्र्याची हमी देतात. बंधनात्मक स्वातंत्र्याची संकल्पना ही न्यायसंगत व व्यावहारिक असते. लस्कीच्या मते सकारात्मक स्वातंत्र्य हे वाईट बंधने हटवून ऊन योग्य बंधनाचा पुरस्कार करते यासाठी साठी सामाजिक व कल्याणकारी कायदे योग्य आहेत.

२) **समाजहिताला अनुरूप -** सकारात्मक स्वातंत्र्याचे स्वरूप सामाजिक आहे. स्वातंत्र्याचा उद्देश मानवाचा सामाजिक शक्ती म्हणून विकास करणे हा आहे. समाजहिताच्या विरुद्ध स्वातंत्र्य दिले जात नाही.

३) **स्वातंत्र्यासाठी समानता आवश्यक -** सकारात्मक स्वातंत्र्याचा असा विश्वास आहे की, समानतेशिवाय तसेच सामाजिक व आर्थिक विकासाशिवाय स्वातंत्र्य योग्य ठरत नाही, केवळ समानताच स्वातंत्र्याला सकारात्मक रूप देते.

४) **न्याय व नैतिकतेची सांगड -** स्वातंत्र्याची आणखी एक अट अशी आहे की, अधिकाराचे अस्तित्व असले पाहिजे व स्वातंत्र्य हे न्याय व नैतिकतेशी संबंधित असले पाहिजे.

५) **राज्य हे स्वातंत्र्याच्या विकासांचे साधन -** राज्य हे स्वातंत्र्याचा शंभु नाही तर स्वातंत्र्याच्या विकासाचे साधन आहे. राज्याचे कार्य हे व्यक्तीला एकाकी न सोडता त्यांना स्वातंत्र्य जीवन जगता येईल अशा सुविधा उपलब्ध करून देणे.

६) **मुक्त अर्थव्यवस्थेच्या विरोधी -** सकारात्मक स्वातंत्र्यात सामाजिक व आर्थिक व्यवस्थेचा पुरस्कार केला आहे. यात वाचतांना त्यांचे आर्थिक फायदे मिळतील. म्हणून स्वातंत्र्य स्वयंनियांत्रित व मुक्त अर्थव्यवस्थेला विरोध करते.

(७) **लोकशाही मार्गाचा अवलंब -** सकारात्मक स्वातंत्र्य सुरक्षित ठेवण्यासाठी लोकशाही सरकार, अधिकारांचे संरक्षण, रजकीय सहभाग, राजकीय सत्तेचे विकेंद्रीकरण या मार्गाचा अवलंब केला पाहिजे.

## २.१.८ सारांश

अशाप्रकारे स्वातंत्र्य ही मानवी जीवनातील महत्वपूर्ण संकल्पना असून सकारात्मक स्वातंत्र्य व नकारात्मक स्वातंत्र्य ही या दोन्हीतील तत्वे परस्पर विरोधी आहेत. मात्र या अयोग्य निबंधांचा अभाव आणि विकासाची समान संधी या दोन्ही दृष्टीने मुक्त असलेले स्वातंत्र्य हेच खरे स्वातंत्र्य होय.

## २.१.९ स्वातंत्र्याचे प्रकार (Types of Liberty)

### प्रस्तावना

स्वातंत्र्य म्हणजे व्यक्तीला आपला सर्वांगीण विकास करून घेण्यासाठी योग्य परिस्थिती व समान संधी संधी उपलब्ध करून देणे होय. व्यक्तीला तिच्या इच्छेनुसार नुसार व इतरांच्या अधिकारावर आक्रमण होऊ न देता काम करण्याची मुभा देणे होय. स्वातंत्र्य ही व्यापक संकल्पना असून तिचे अविष्करण विविध स्वरूपात होते. त्यामुळे स्वातंत्र्याचे विविध प्रकार आढळतात.

### स्वातंत्र्याचे प्रकार

१) **नैसर्गिक स्वातंत्र्य -** समाज स्वराज्य निर्माण होण्यापूर्वी मनुष्य निसर्गावस्थेत जीवन जगत होता. या अवस्थेत व्यक्तीला नैसर्गिक स्वातंत्र्य उपभोगता येत होते. मानवी जीवन स्वतंत्र, स्वच्छंदी आणि बंधन मुक्त होते. समाज व राज्य निर्मिती झालेली नव्हती. त्यामुळे व्यक्तीवर कोणत्याही प्रकारचे बंधन नव्हते. हॉब्ज , लॉक, रुसो या विचारवंतांनी सामाजिक करार सिद्धांतात निसर्ग नियमांचे स्पष्टीकरण केले आहे. निसर्गावस्थेत प्रत्येकाला नैसर्गिक स्वातंत्र्य होते तरीही प्रबळ, सशक्त, बलशाली व्यक्ती, दुर्बळ अशक्त लोकांवर अन्याय जुलूम करीत होत्या. त्यामुळे मानवी जीवन पशुतुल्य, भयानक होते असे विचार हॉब्ज यांनी मांडले आहेत. बंधनांचा अभाव असलेले असे नैसर्गिक स्वातंत्र्य राज्य निर्मिती नंतर नष्ट झाले आणि समाजाने व राज्याने मान्य केलेले कृत्रिम मर्यादा असलेले स्वातंत्र्य अस्तित्वात आले. समाजात, राज्यात राहणाऱ्या व्यक्तीवर बंधने आली. म्हणूनच रुसो यांनी म्हटले आहे की मनुष्य जन्मतः जरी स्वतंत्र असला तरी पुढे त्याचे जीवन सामाजिक-राजकीय बंधनांनी जखडले होते. सामाजिक कराराचा पुरस्कार करणाऱ्या विचारवंतांनी नैसर्गिक स्वातंत्र्याला महत्त्वाचे स्थान दिले होते. नैसर्गिक स्वातंत्र्य हे स्वातंत्र्य नसून स्वैराचाराचे मोहक स्वरूप होते. राज्य आणि कायदे अस्तित्वात आल्याशिवाय खरे स्वातंत्र्य प्राप्त होऊ शकत नाही. त्यामुळे आधुनिक काळात नैसर्गिक स्वातंत्र्याला महत्त्व नसलेले दिसते.

**२) नागरी स्वातंत्र्य-**

व्यक्तीच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने नागरी स्वातंत्र्य अत्यंत महत्त्वाचे व आवश्यक मानले जाते. समाज व राज्य यांचा सदस्य या नात्याने व्यक्तीला जे स्वातंत्र्य प्राप्त होते त्यास नागरी स्वातंत्र्य असे म्हणतात. उदा. भाषण स्वातंत्र्य, लेखन स्वातंत्र्य, संघटना स्थापण्याचे स्वातंत्र्य, व्यवसाय स्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्य इ. स्वातंत्र्यांचा समावेश नागरी स्वातंत्र्यात केला जातो. नागरी स्वातंत्र्य व्यक्तीस राज्याकडून मिळते. तसेच या स्वातंत्र्याच्या संरक्षणाची जबाबदारी राज्यावर असते. समाजातील सर्व व्यक्तींना नागरी स्वातंत्र्य समान मिळते. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने नागरी स्वातंत्र्याचा उपभोग घेताना इतरांच्या स्वातंत्र्याचा विचार केला पाहिजे. व्यक्तीने इतरांच्या अधिकारावर आक्रमण न करता नागरी स्वातंत्र्य उपभोगले पाहिजे. थोडक्यात नागरी स्वातंत्र्याची सुरक्षितता व्यक्ती आणि राज्य या दोहोंवर आहे. नागरी स्वातंत्र्य अनिर्बंध आणि अमर्यादित असू शकत नाही कारण खरे स्वातंत्र्य म्हणजे विशिष्ट बंधना सह असणारे स्वातंत्र्य असते. ही बंधने कायदेशीर असतात. प्रत्येक देशात नागरी स्वातंत्र्याला महत्त्वाचे स्थान आहे. लोकशाही शासन पद्धतीत नागरी स्वातंत्र्य महत्त्वपूर्ण आहे.

**३) व्यक्तिगत / वैयक्तिक स्वातंत्र्य-**

व्यक्ती ही समाजाचा घटक असते. व्यक्ती व समाज परस्परावलंबी असले तरी ते पूर्णतः एकरुप नसतात. व्यक्ती व्यक्तीचा आवड-निवड त्यांचे प्राधान्यक्रम, जीवनविषयक दृष्टिकोन भिन्न असतात. समाजमान्य चौकटीच्या आत प्रत्येकास आपल्या आवडीनिवडीप्रमाणे स्वतःचे खाजगी जीवन घडविण्याचे, त्यास आकार देण्याचे स्वातंत्र्य देता येते. त्यालाच वैयक्तिक किंवा व्यक्तिगत स्वातंत्र्य म्हणतात. मात्र त्यामुळे इतरांच्या स्वातंत्र्याला धक्का पोहोचणार नाही याची काळजी घेतली पाहिजे.

**४) आर्थिक स्वातंत्र्य -**

आर्थिक स्वातंत्र्या शिवाय सर्व प्रकारच्या स्वातंत्र्याला अर्थ नाही. रोजगार, उत्पन्नाचा मार्ग, आर्थिक जबाबदाऱ्या, इत्यादी बाबतीत जी अनिश्चितता आणि, अन्न, वस्त्र, निवारा इ. नागरिकांच्या गरजा भागवल्या जात नसतील तर नागरिक आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र होऊ शकणार नाहीत. प्रा. लास्की यांनी आपल्या ' ग्रामर ऑफ पॉलिटिक्स' या ग्रंथात आर्थिक स्वातंत्र्य म्हणजे, ' एखाद्या व्यक्तीचा रोजचा उदरनिर्वाहाचा प्रश्न सोडवण्यासाठी योग्य व निश्चित अशी संधी व सुरक्षितता उपलब्ध करून देणे म्हणजे आर्थिक स्वातंत्र्य होय' व्यक्तीला केवळ राजकीय किंवा नागरी स्वातंत्र्य असून चालत नाही तर तिला आर्थिक स्वातंत्र्य ही हवे असते. आर्थिक स्वातंत्र्य साठी आर्थिक समता प्रस्थापित होणे आवश्यक असते. त्यासाठी शासनाला विविध स्वरूपाची आर्थिक कार्ये करावी लागतात. उदा. बेकारी निर्मूलन, दारिद्र्य निर्मूलन, आर्थिक विषमता कमी करणे, मजुरांचे शोषण थांबविणे, उत्पन्नाची साधने व न्याय्य वाटणी, करणे, मजुरांना उत्पादन व्यवस्थेत सहभागी करून घेणे इ. कार्ये शासनाला करावी लागतात. प्रत्येक देशाची शासन व्यवस्था आर्थिक स्थैर्य प्रस्थापित

करण्याचा नेहमी प्रयत्न करत असते. आर्थिक स्थैर्य याशिवाय आर्थिक स्वातंत्र्य प्रकट होत नाही. व्यक्ती विकास व समाज विकासासाठी आर्थिक स्वातंत्र्य महत्त्वाचे ठरते.

### ५) राजकीय स्वातंत्र्य

देशाच्या राज्यकारभारात सहभागी होण्याचा हक्क म्हणजे राजकीय स्वातंत्र्य होय. राजकीय स्वातंत्र्य प्रस्थापित होण्यासाठी महत्त्वाचे राजकीय अधिकार मान्य करावे लागतात. उदा. मतदानाचा अधिकार, निवडणूक लढविण्याचा अधिकार इ. लोकशाही राज्यव्यवस्थेतच नागरिक खऱ्या अर्थाने राजकीय अधिकार उपभोगत असतात. शासकीय निर्णय घेण्यासाठी व त्यांची कार्यवाही करण्यासाठी राजकीय स्वातंत्र्य आवश्यक असते. प्रा. बार्कर यांच्या मते, लोकांना आपले विचार कृतीत उतरवण्यासाठी राजकीय पक्षात सहभागी व्हावे लागते. पक्षीय राजकारण हे आजच्या राजकीय व्यवस्थेचे वैशिष्ट्य बनलेले दिसते. तसेच देशात निर्भीड, स्वतंत्र व नि:पक्षपाती वृत्तीची वृत्तपत्रे असतील तर राजकीय स्वातंत्र्य उपभोगता येते. वृत्तपत्र माध्यमांद्वारे नागरिकांना राजकारणात अप्रत्यक्षपणे सहभागी होता येते. शिक्षणामुळे लोकांना राजकीय अधिकार समजू शकतात. सुशिक्षित सुसंस्कृत नागरिकच राजकीय अधिकार उपभोगू शकतात. म्हणून राजकीय स्वातंत्र्य महत्त्वाचे ठरते.

### ६) राष्ट्रीय स्वातंत्र्य-

राष्ट्रीय स्वातंत्र्य म्हणजे कोणतेही राज्य परकीय सत्तेच्या वर्चस्वाखाली न राहता स्वतःच्या तंत्राने, इच्छेने चालत असते. स्वातंत्र्याचा विचार ज्याप्रमाणे व्यक्तीच्या संदर्भात केला जातो त्याप्रमाणे राष्ट्राच्या ही स्वातंत्र्याचा विचार केला पाहिजे. राज्याला सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने राष्ट्रीय स्वातंत्र्य आवश्यक असते. राज्य जेव्हा स्वतंत्र सार्वभौम असते, ते इतरांच्या नियंत्रणाखाली किंवा दडपणाखाली नसते तेव्हा राष्ट्रीय स्वातंत्र्य असते. स्वतंत्र राष्ट्र आपले अंतर्गत व बाह्य प्रश्न स्वतःच्या इच्छेनुसार सोडवीत असते. स्वयम् निर्णयाचे तत्व हे राष्ट्रीय स्वातंत्र्याची आधारभूत तत्त्व आहे. आज प्रत्येक राष्ट्र आंतरराष्ट्रीय क्षेत्रात आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवून आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेकडून राष्ट्रीय स्वातंत्र्य सुरक्षित ठेवले जाते. राष्ट्र स्वतंत्र असेल तरच नागरिकांना स्वातंत्र्य मिळते. त्यामुळेच नागरिकांचा सर्वांगीण विकास होतो.

## २.१.१० सारांश

स्वातंत्र्य ही एक व्यापक संकल्पना आहे. व्यक्ती विकासासाठी व समाज विकासासाठी स्वातंत्र्याची आवश्यकता असते. नागरिकांना वरील सहा प्रकारची स्वातंत्र्ये मिळणे महत्त्वाचे ठरते. व्यक्तीने आपले स्वातंत्र्य उपभोगीत असताना इतरांच्या स्वातंत्र्यावर आक्रमण होणार नाही याचीही दक्षता घेतली पाहिजे.

## २.१.११ स्वातंत्र्य रक्षणाचे मार्ग (Safeguards of Liberty)

स्वातंत्र्या शिवाय व्यक्ती संपूर्ण व अर्थपूर्ण जीवन जगू शकत नाही. प्रत्येक व्यक्तीसाठी स्वातंत्र्य हे मूलभूत मूल्य आहे. त्यासाठी त्यांच्या संरक्षणासाठी राज्याने प्रभावी पावले उचलली पाहिजेत. व्यक्तीला स्वातंत्र्य उपभोगण्यास योग्य परिस्थिती निर्माण करणे ही राज्याची जबाबदारी असते. व्यक्तिस्वातंत्र्याला संरक्षण देऊन राज्य ही जबाबदारी पार पाडते. राज्यातील खालील घटकांद्वारे स्वातंत्र्याचे संरक्षण होत असते.

१) **स्वातंत्र्यावर प्रेम -** जेव्हा लोकांना त्यांच्या स्वातंत्र्यावर अतिशय प्रेम असेल तेव्हा स्वातंत्र्य सुरक्षित राहू शकते. स्वातंत्र्यासाठी लोकांनी सतत आणि निरंतर प्रयत्न करणे आवश्यक असते.

२) **अनन्य दक्षता -** स्वातंत्र्याबाबत लोकांनी नेहमी दक्ष असले पाहिजे. आपण आपल्या स्वातंत्र्याच्या बाबतीत दक्ष राहिल्यास स्वातंत्र्याची हमी मिळू शकते. तसेच स्वातंत्र्यासाठी लोकांनी लोकशाही विचारांप्रती बांधील असले पाहिजे. शिवाय आपल्या स्वातंत्र्यावर कोणी आक्रमण केल्यास त्याच्या रक्षणासाठी दक्ष असणे आवश्यक आहे.

३) **लोकशाही व्यवस्था -** लोकशाही स्वरूपाच्या शासन व्यवस्थेतच लोकांच्या स्वातंत्र्याची जपणूक होत असते. लोकशाही आणि स्वातंत्र्य एकमेकांना पूरक आहेत. सर्व प्रकारचे अधिकार व स्वातंत्र्ये लोकशाहीच मिळतात. नागरी, आर्थिक, राजकीय, वैयक्तिक स्वरूपाची स्वातंत्र्य नसतील तर आपण लोकशाहीची कल्पनाच करू शकत नाही. ही स्वातंत्र्य अभावी लोकशाही अस्तित्वात राहू शकत नाही.

४) **सर्वांना समान अधिकार -** स्वातंत्र्य सुरक्षित राहण्यासाठी समाजात कोणत्याही व्यक्तीला किंवा समूहाला विशेषाधिकार मिळू नयेत. जेव्हा सर्वांना समान अधिकार प्रदान केले जातात आणि भेदभाव न करता प्रत्येकाला या अधिकारांची हमी दिली जाते तेव्हा स्वातंत्र्य अस्तित्वात राहू शकते. समाजातील काही वंचित मागास घटकांच्या विकासासाठी व त्यांना इतरांच्या बरोबरीने आणण्यासाठी विशेषाधिकार व सवलती देऊन न्याय व समता प्रस्थापित केली जाते.

४) **सत्ता विभाजन आणि नियंत्रण -** स्वातंत्र्याचे संरक्षण करण्यासाठी सत्तेचे विकेंद्रीकरण करणे आवश्यक आहे. सरकारचा अधिकार विशेषता त्याची अधिकारी शाखा अनेक संघटनांमध्ये विभागली गेली पाहिजे. शासनाची सत्ता कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ व न्याय मंडळ या तीन शाखात विभागलेले असते. त्यामुळे सत्तेचे केंद्रीकरण होत नाही व सत्तेचा दुरुपयोग होऊ शकत नाही नागरिकांच्या स्वातंत्र्यामध्ये राज्यकर्ते सहजासहजी हस्तक्षेप करू शकत नाहीत.

५) **राज्यघटनेत मूलभूत हक्कांची नोंद -** राज्यघटनेतील मूलभूत हक्कांची नोंद असल्यामुळे लोकांना त्यांच्या स्वातंत्र्याची हमी मिळते. शासन करते लोकांच्या स्वातंत्र्याला बाधा येईल असे वर्तन करू शकत नाहीत. स्वातंत्र्याला बाधा आली तर लोक न्यायालयाकडे दाद मागू शकतात. राज्यघटनेत त तूद असल्यामुळे लोकांना आपले हक्क, त्यांची व्याप्ती व त्यावर मर्यादा कोणत्या इ. ची कल्पना येते.

६) **कायद्याचे राज्य -** जी राज्य कायद्याप्रमाणे चालते, कार्यकर्ते अशा राज्यातच नागरिकांच्या स्वातंत्र्याचे संरक्षण होते. कायद्याचे राज्य म्हणजे शासन कारभार घटनेतील तरतुदीप्रमाणे चालतो. प्रत्येकाला घटनेतील नियमाप्रमाणे वागावे लागते.

कायद्याच्या राज्यात मुळे नागरिकांना समान संरक्षण, कायद्यापुढे समान वागणूक व समान संधी मिळते. कोणीही व्यक्तिस्वातंत्र्याचे उल्लंघन करू शकत नाही. कायद्याच्या राज्यात व्यक्तिस्वातंत्र्याचा संकोच झाल्यास व्यक्ती न्यायालयाकडे दाद मागू शकते.

७) **स्वतंत्र न्याय व्यवस्था -** स्वतंत्र व नि:पक्षपाती न्याय व्यवस्था असेल तरच व्यक्ती स्वातंत्र्य सुरक्षित राहू शकते. लोकांच्या हक्क, स्वातंत्र्याची पायमल्ली झाल्यास लोक न्यायालयाकडे दाद मागतात. स्वतंत्र न्याय व्यवस्था असल्याने न्यायाधीश लोकांना नि:पक्षपातीपणे न्याय देऊन त्यांच्या स्वातंत्र्याचे रक्षण करतात. कार्यकारी मंडळ व कायदे मंडळ यांच्या दबावापासून मुक्त न्यायव्यवस्था म्हणजेच स्वतंत्र व नि:पक्षपाती न्याययंत्रणा होय.

८) **स्वतंत्र वृत्तपत्र -** वृत्तपत्र, दूरदर्शन, रेडिओ इ. प्रसारमाध्यमे लोकांच्या स्वातंत्र्याची रक्षक म्हणून कार्य करतात. स्वातंत्र्याचा भंग, गळचेपी, शासनाची दडपशाही इ. वाचा फोडून लोकमत जागृत करण्याचे कार्य प्रसार माध्यमे करतात. यासाठी स्वतंत्र बाण्याची व निर्भीड वृत्तीची वृत्तपत्रे आवश्यक आहेत.

९) **समता -** स्वातंत्र्याची दुसरी बाजू म्हणजे समता होय. राज्यात जात, धर्म, वंश, लिंग इ. आधारावर कोणताही भेदभाव असता कामा नये. सर्व नागरिकांना समान वागणूक, समान संधी, समान कायदा असेल तरच प्रत्येक व्यक्तीचे स्वातंत्र्य सुरक्षित राहते व प्रत्येकाला स्वातंत्र्याचा उपभोग घेता येतो.

१०) **आर्थिक विवंचनांपासून मुक्तता-** भूक, दारिद्र्य, बेकारी, आर्थिक विषमता इत्यादी प्रकारच्या आर्थिक विवंचनेतून नागरिक मुक्त असतील तरच ते स्वातंत्र्याचा उपभोग घेऊ शकतात. यासाठी आवश्यक परिस्थिती निर्माण करणे हे शासनाचे काम आहे.

११) **घटनात्मक उपायांचा अधिकार-** व्यक्तीच्या स्वातंत्र्यावर शासनाने, संस्थेने किंवा अन्य व्यक्तीने आक्रमण केल्यास त्याविरुद्ध दाद मागण्याचा हक्क व्यक्तीला असणे आवश्यक आहे. त्यासाठी राज्यघटनेत तरतूद केलेली असते. या तरतुदींची मदत घेऊन व्यक्ती न्यायालयाकडे दाद मागू शकते. न्यायालय हक्कभंग करणाऱ्या विरुद्ध आदेश देऊन व्यक्तिस्वातंत्र्याचे रक्षण होण्यास मदत करते. भारतीय राज्यघटनेच्या कलम ३२ मध्ये घटनात्मक उपाययोजनेच्या या अधिकाराची तरतूद करण्यात आली आहे.

### २.१.१२ सारांश -

प्रत्येक व्यक्तीला स्वातंत्र्य प्रिय आहे आणि ते कायम अबाधित राहावे यासाठी प्रत्येकाचे प्रयत्न चालू असतात. लोकशाही राजकीय व्यवस्थेत लोकांचे स्वातंत्र्य टिकून राहवे व त्याची संरक्षण व्हावे ही त्या देशातील शासनाची व लोकांचे महत्त्वाचे कार्य आहे. राज्याने

केलेल्या तरतुदींमुळे व वर नमूद केलेल्या सर्व घटकांमुळे लोकांचे स्वातंत्र्य सुरक्षित राहण्यास मदत होते.

### २.१.१३ स्वातंत्र्य आणि कायदा- संबंध

कायदा आणि स्वातंत्र्य हे परस्परपूरक आहेत किंवा नाहीत असा प्रश्न नेहमीच उद्भवतो. कायद्यामुळे स्वातंत्र्याचा संकोच होतो असे व्यक्ती स्वातंत्र्यवादी म्हणतात. कायदा आणि शासन दोन्ही नष्ट करावेत असे अराजकवादी म्हणतात. स्वातंत्र्याचा उपभोग कायद्याच्या अभावातच घेता येतो असे म्हणणारे ही स्वातंत्र्यवादी आहेत. याउलट कायद्यामुळे व्यक्तीचे स्वातंत्र्य टिकते, कायदे स्वातंत्र्याला पूरक आहेत, कायदे शिवाय सार्वभौमत्वाचा आविष्कार घडत नसतो, कायदे शिवाय स्वातंत्र्य म्हणजे स्वैराचार असेही काही शास्त्रज्ञ म्हणतात.

आपणास असे स्पष्ट करून सांगता येईल की, राज्यनिर्मितीच्या अगोदर व्यक्तीला स्वातंत्र्य नव्हते. तो एक प्रकारचा स्वैराचार होता. त्यावेळी सामर्थ्यवान लोक दुर्बलांचे अपहरण करीत होते. कायद्याच्या निर्मितीमुळे असेच स्वैराचारी व अत्याचारी स्वातंत्र्य नष्ट होते पण त्यामुळे समाजातील सर्व व्यक्तींना न्याय मिळतो ही गोष्ट नाकारता येत नाही. कायद्यामुळे वाईट प्रवृत्ती व स्वैराचार नष्ट होऊन समाज हिताचे रक्षण होते. उदा. बाल विवाह पद्धती, गुलामगिरी, अस्पृश्यता वाद, वेठ बिगारी इ. कायद्याने नष्ट केल्या. त्यामुळे स्वातंत्र्याचा संकोच झाला नाही उलट स्वातंत्र्याचा उपभोग घेण्यास सर्वांना समान संधी मिळाली. कायदे पालन केल्याने स्वातंत्र्याचा उपभोग घेता येतो. कायदे पालन हेच खरे स्वातंत्र्य आहे असे रुसो म्हणतो. कारण कायदा केवळ आज्ञा करीत नाही ही तर कायदा व्यक्तीला योग्य मार्गदर्शन करतो. थोडक्यात असे म्हणता येईल की कायदा हाच खऱ्या अर्थाने स्वातंत्र्याचा निर्माता तसेच संरक्षण कर्ता आहे.

परंतु याचा अर्थ बहुमताच्या जोरावर वाटेल तसा कायदा करणे म्हणजे स्वातंत्र्याची संरक्षण करणे नव्हे. सुवर्ण नियंत्रण कायद्याने भारतीय लोकांच्या स्वातंत्र्याचा निश्चित संकोच झाला. ज्यावेळी सरकार जबाबदारीने वागते, विरोधी पक्ष प्रबळ असतो, शासनाविषयी लोक जागरूक असतात, त्यावेळी नागरिकांना सरकारवर टीका करण्याचा पूर्णपणे अधिकार मिळतो. ज्यावेळी वृत्तपत्र स्वातंत्र्य नियंत्रित नसते, न्यायालय निरपेक्ष व स्वतंत्रपणे काम करतात त्यावेळी स्वातंत्र्य आणि कायदा हे परस्पर पूरक असतात.

सारांश रूपाने असे दर्शविता येईल की आपण स्वतःच्या दृष्टिकोनातून कायद्याचा विचार करतो तेव्हा त्याला स्वातंत्र्य असे म्हणतात व दुसऱ्याच्या वर्तणुकीचा विचार करतो तेव्हा त्याला कायदा असे म्हणतात. जास्त स्वातंत्र्य अराजकता निर्माण करते तसेच जास्त कायदे हुकूमशाही निर्माण करतात. म्हणून कायद्याचा व स्वातंत्र्याचा अतिरेक हा अराजकतेला आव्हान करतो.

कायद्या शिवाय स्वातंत्र्याला अर्थ नाही नाही व स्वातंत्र्याचा उपभोग कायद्या शिवाय शक्य नाही. व्यक्तीचे स्वातंत्र्य कोणते आणि तेच का ह्याची निश्चिती कायद्याद्वारेच होते. तसेच कोणते कायदे योग्य व अयोग्य हे व्यक्तीला दिलेल्या स्वातंत्र्यावरच अवलंबून आहे. एकूण कायदा आणि स्वातंत्र्य हे परस्पर विरोधी नाहीत त्या परस्पर पुरक अशा संज्ञा आहेत.

## २.२ समता (Equality)

**प्रस्तावना**

मध्ययुगीन काळात स्वातंत्र्य आणि समता या दोन्ही संकल्पनांचा अभाव होता. त्यावेळी राजेशाहीचे निरंकुश शासन होते. जन्मत:च काही लोक श्रेष्ठ समजले जात होते आणि जन्म श्रेष्ठत्वा मुळेच त्यांना विशेषाधिकार मिळत होते. परंतु १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीने स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या तीन तत्त्वांना जन्म दिला. १९१७ साली रशियन राज्यक्रांती झाली व आर्थिक विषमतेचा अंत झाला. राजकीय व सामाजिक क्षेत्रात समता प्रस्थापित करण्यात आली. १७७६ या अमेरिकन स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यात ' सर्व लोक समान आहेत' या तत्त्वाचा पुरस्कार करण्यात आला. भारतीय राज्यघटनेच्या सरनाम्यात 'समता' या तत्त्वाचा पुरस्कार करण्यात आला आहे. आज समता या तत्त्वाचा पुरस्कार एक राजकीय ध्येय म्हणून होऊ लागला आहे.

**समतेची व्याख्या**

" समता म्हणजे मानव निर्मित विषमता आणि भेदाभेद नष्ट करून सर्वांना समान संधी आणि वागणूक देणे होय."

### २.२.१ समतेचा अर्थ-

सर्वसाधारणपणे समता म्हणजे सारखेपणा किंवा समान वागणूक असा अर्थ दैनंदिन जीवनात घेतला जातो. परंतु असा मर्यादित अर्थ घेऊन चालणार नाही. कारण प्रत्यक्ष परिस्थितीचा विचार केला तर असे दिसून येते की मानवी समाज जीवनात नैसर्गिक समतेपेक्षा विषमताच जास्त आढळून येते. उंची, वर्ण, बौद्धिक पातळी इत्यादी बाबतीत व्यक्ती व्यक्तीत विषमताच जास्त आढळते. मूलभूत स्वरूपाची नैसर्गिक विषमता दिसून येत असली तरी अनेक बाबतीत सामाजिक, आर्थिक, राजकीय स्वरूपाची मानव निर्मित विषमता अधिक आहे. अशी विषमता नष्ट व्हावी या दृष्टीने कायदे करण्यात आले, रूढी विरुद्ध चळवळी करण्यात आल्या. सर्व नागरिक समान आहेत या तत्त्वाचा पुरस्कार करण्यात आला.

समता म्हणजे मानव निर्मित विषमता नष्ट करणे होय. राजकीय सामाजिक, आर्थिक अशा विविध क्षेत्रातील विषमता कष्ट करून सर्वांना समान वागणूक देणे, विकासाची संधी देणे म्हणजे समता होय. समता प्रस्थापित करण्याकरिता प्रथमतः सर्व प्रकारच्या विशेष सवलती नष्ट कराव्या लागतात. सामाजिक आणि राजकीय विषमतेचे निर्बंध कोणालाही जाचक होऊ नयेत अशा दृष्टीने जन्म, संपत्ती, जात धर्म, वर्ण या बाबी लक्षात न घेता सर्वांना समान संधी मिळणे यालाच समता म्हणता येईल.

### २.२.२ समते विषयी प्रा. लास्की यांचा दृष्टिकोन-

प्रा. लास्की यांच्या मते समता ही मुलत: समतलन प्रक्रिया आहे. समता म्हणजे सर्वांना समान पातळीवर आणण्याची प्रक्रिया आहे. समाजात जोपर्यंत व्यक्तीला विशेष अधिकार मिळत राहतील तोपर्यंत समता प्रस्थापित होणार नाही. यासाठी जन्म,, जात, भाषा, संपत्ती, वर्ण, वंश यांच्या आधारे समाजातील व्यक्तीला विशेषाधिकार दिले जातात ते नष्ट करणे

आवश्यक आहे म्हणजे समाजातील व्यक्तींना विषम पणे न वागवता समतेने वागवणे म्हणजे समता होय.

### २.२.३ समतेचे स्वरूप / वैशिष्ट्ये

१) **सकारात्मक स्वरूप -** मानवी जीवन उत्तम रीतीने जगण्यासाठी ज्या गोष्टी आवश्यक असतात, ज्यांच्या शिवाय व्यक्ती आपल्या अंगी असलेल्या सुप्त, नैसर्गिक पात्रतांचा विकास करून घेऊ शकत नाही अशा सर्व गोष्टी समतेच्या तत्त्वावर सर्वांना प्राप्त झाल्या पाहिजेत. यासाठी सर्वांना समान संधी प्राप्त झाली पाहिजे. उदा. आपल्या नैतिक, अध्यात्मिक व बौध्दिक विकासासाठी सर्वांना समान संधी असावी.

२) **नकारात्मक स्वरूप -** कोणावरही अवास्तव आणि गैरवाजवी बंधने नसणे म्हणजेच धर्म, जात, वंश, वर्ण, भाषा, लिंग, निवासस्थान इत्यादींच्या आधारावर कोणावर बंधने नसणे व सर्वांना समान संधी, समान स्वातंत्र्य आणि अधिकार असणे ही समतेचे नकारात्मक स्वरूप आहे. माणसा माणसात स्त्री-पुरुषात अवास्तव भेदभाव करून संधी हिरावून घेऊ नये. यासाठी राज्य घटनेतून संरक्षण दिले जाते. उदा. भारतातील आरक्षणाची तरतूद, अमेरिकेतील उपचारात्मक भेदभावाची कल्पना.

३) **अमूर्त कल्पना-** समता ही अमूर्त स्वरूपाची संकल्पना मानली जाते. वास्तविक दृष्ट्या संपूर्ण समता प्रस्थापित करणे अशक्यच मानले जाते. नैसर्गिक दृष्टिकोनातून पाहिले तर मानवा मानवात विषमता आढळते. परंतु काही प्रमाणात ही मूलभूत स्वरूपात नैसर्गिक विषमता असली तरी अनेक बाबतीत ही मानव निर्मित असते. समता म्हणजे सर्वच बाबतीत सारखेपणा निर्माण करणे नव्हे तर मानव निर्मित विषमता नष्ट करणे होय.

४) **विशेषाधिकारांचा अभाव -** प्रा. लस्कींच्या मते समाजात जोपर्यंत विशेषाधिकार मिळत राहतील तोपर्यंत समता प्रस्थापित होणार नाही. समता प्रस्थापित होण्यासाठी विशेषाधिकार नष्ट करणे आवश्यक ठरते. यासाठी सर्व प्रकारच्या विशेष सवलती नष्ट कराव्या लागतात. जन्म, जात, वंश इ. कारणांवरून भेदाभेद होत असेल तर तो रद्द करून सर्वांना समान हक्काची प्राप्ती करून द्यावी लागते. गुण व पात्रता यानुसार दर्जा व अधिकार मिळाला पाहिजे. सामाजिक व राजकीय विषमतेचे निर्बंध कोणालाही जाचक होऊ नयेत अशा दृष्टीने जन्म, संपत्ती, जात, धर्म, वर्ण हे लक्षात न घेता सर्वांना समान संधी मिळणे यालाच समता म्हणता येईल. थोडक्यात समता म्हणजे विशेषाधिकारांचा अभाव होय.

५) **व्यक्तिगत विकासासाठी आवश्यक -** समते मुळे प्रत्येक नागरिकाला आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास करण्याची समान संधी प्राप्त होते. मानव निर्मित भेदाभेद नष्ट होतात. कोणालाही विशेषाधिकार मिळत नाहीत. कायद्यासमोर प्रत्येक व्यक्तीला समान मानले जाते. सर्व नागरिकांसाठी एकच कायदा असतो. त्यामुळेच खऱ्या

अर्थाने समता प्रस्थापित होते. राज्यातील सर्व नागरिकांना विकासाची समान संधी उपलब्ध होईल अशी परिस्थिती राज्याला निर्माण करावी लागते.

## २.२.४ **सारांश**

अशाप्रकारे समतेचा अर्थ व स्वरूप स्पष्ट करता येईल. व्यक्ती विकासाच्या दृष्टीने समतेचा अधिकार महत्त्वाचा ठरतो. समाजातील सर्व नागरिक समान असून त्यांना समान वागणूक व समान उत्पन्न मिळण्याचा हक्क आहे. समता म्हणजे विशेषाधिकारांचा अभाव होय. समता म्हणजे सारखेपणा नसून मानवनिर्मित विषमता नष्ट करणे होय. राज्यात समता प्रस्थापित झाल्याशिवाय नागरिकांना स्वातंत्र्य उपभोगता येत नाही. यासाठी राज्यातील प्रत्येक नागरिकाला विकास साधण्याची समान संधी मिळाली पाहिजे .

## **२.२.५ समतेचे आयाम**

### **१) औपचारिक समता -**

औपचारिक समता ही कायद्यासमोर समानता या तत्त्वातून उदयास आली. ही अतिशय प्राथमिक स्वरूपाची संकल्पना आहे. भेदभावाचा अभाव म्हणजे समता होय. ही समता मूलभूत समता तत्व लागू करण्यावर विश्वास ठेवते. यानुसार सर्व व्यक्ती कायद्यानुसार समान आहेत. सर्व व्यक्तींना एक मताचा अधिकार असतो. प्रत्येकाची समान दखल घेतली जाते व विशिष्ट समूहाला स्वायत्ततेला, विशेष सवलती ना ही समता मान्यता देत नाही. या समतेनुसार कोणालाही पूर्णपणे वगळले जात नाही. का समतेच्या पुरस्कर्त्यांच्या मते समतेचा अर्थ जर भेदभावाचे निराकरण असेल तर समतेच्या नावाखाली भूतकाळातील भेद भावांच्या आधारे विशिष्ट समूहाला विशेष अधिकार देणे हे तर्कसंगत आहे की नाही हा प्रश्न उभा राहतो.

अभिजात उदारमतवादी हे या समतेचे समर्थक होते. या समते ची मागणी मुख्यतः व्यापारी, भांडवलदार वर्गाकडून केली जाते. त्यांच्या मते एका व्यक्तीला अन्य व्यक्तींसाठी त्या करायला लावणे किंवा कर भरावा लागणे हे समता तत्त्वाच्या विरोधी आहे. तसेच औपचारिक समतेची समर्थक सकारात्मक कारवाईला विरोध करतात. त्यांच्यामध्ये समतेचा सिद्धांत केवळ संधीची समानता या स्तरावर लागू होऊ शकतो. परंतु सकारात्मक कृतीद्वारे समाजात समता प्रस्थापित करण्याचा उद्देश हा विनाशकारी आहे. तसेच सकारात्मक कारवाई ही सामाजिक स्थिरता व प्रगतीचे मूळ असणाऱ्या मानवी प्रतिष्ठा, अधिसत्ता, योग्यता, उत्कृष्टता यांना तत्वतः विरोध करणारी आहे. सकारात्मक कृती करणे हे प्रक्रियात्मक अन्यायाच्या विरुद्ध आहे व ही कृती व्यक्तीच्या तुलनेच्या तर्कसंगत आधाराला विरोध करते. म्हणजे अस्पृश्य जातींवर जुन्या पिढीकडून जे अन्याय अत्याचार झाले त्याची शिक्षा वर्तमान कालीन सवर्ण जातीना देणे अन्यायकारक आहे.

औपचारिक समतेच्या पुरस्कार्त्यांच्या मते प्रत्येक व्यक्तीला आरक्षण किंवा सवलत दिली जाते ती व्यक्तिगत आधारावर नव्हे तर भूतकाळात शोषण झालेल्या एक वंचित समूह म्हणून त्यांना सवलत दिली जाते. परंतु अस्पृश्य वर्गातील एखादा व्यक्ती हा

अनुकूल परिस्थितीत जीवन जगत असेल व श्रीमंत असेल तरी त्याला सवलत दिली जाते. समूहाच्या आधारावर त्या व्यक्तीला आहे आरक्षण मिळते. त्यामुळे आरक्षणाचा फायदा वंचित समूहाला मिळत नाही तर त्या समाजातील पुढारलेल्या व्यक्तींना होतो असा आक्षेप यावर घेतला जातो.

**२) सारलक्षी समता -**

याचा अर्थ असा होतो की व्यक्तीला उत्तम प्रकारे जगण्यासाठी तसेच स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्यासाठी जावे गोष्टींची आवश्यकता असते त्या सर्वांना समान प्रमाणात प्राप्त झाल्या पाहिजेत. यामध्ये समस्या अशी आहे की की ज्यांना जात, वंश, लिंग याआधारे भेदभावाची वागणूक दिलेली असते त्यांना आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास साध्य करायचा आहे तर त्यांना विशेष संधी प्राप्त करून दिली पाहिजे.

समानांना समान व असमानांनाही समान वागणूक देणे म्हणजे समता होय. या आधार सकारात्मक भेदभावाचे तत्व हे समानतेच्या तत्त्वाला धरून असते. यामुळे वंचितांना ही संधी दिली पाहिजे यावर विश्वास ठेवता येतो.

सार लक्षी समतेच्या समर्थकांच्या मध्ये भूतकाळात अस्पृश्य जातींना व स्त्रियांना जी अन्यायकारक वागणूक दिली त्याची भरपाई म्हणून त्यांना संधी व सर्व क्षेत्रात आरक्षण दिले पाहिजे. यातून समता प्रस्थापित होण्यास मदत पाहिजे. भेदभाव विवेकाधिष्टीत असावा व त्याचे फायदे व वंचित समूहाला मिळाले पाहिजेत.

### २.२.६ समतेचे प्रकार (Types of Equality)

**प्रस्तावना**

समता म्हणजे मानवनिर्मित विषमता नष्ट करणे होय. राजकीय, आर्थिक, सामाजिक अशा विविध क्षेत्रातील विषमता नष्ट करून सर्वांना समान वागणूक देणे, विकासाची सर्वांना समान संधी देणे म्हणजे समता होय. व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी मानव निर्मिती व विषमता कमी करून व्यक्तीला समान संधी देण्याची आवश्यकता असते.

**समतेचे प्रकार**

**१) नागरी समता**

नागरी समतेला वैधानिक समता असेही म्हणतात. कायद्यासमोर सर्व व्यक्तींना समान मानणे म्हणजे वैधानिक समता होय. सर्व व्यक्तींना समान हक्क आणि स्वातंत्र्य मिळाले पाहिजे, सर्व व्यक्तींचा कायद्याच्या दृष्टीने दर्जा एकच असला पाहिजे. सर्वांसाठी एकच कायदा आणि शासन व्यवस्थेकडून समान संरक्षण मिळाले पाहिजे म्हणजे नागरी समता प्रस्थापित होऊ शकते. कायद्याद्वारे मानव निर्मिती विषमता नष्ट करून नागरी समता प्रस्थापित करता येते. राज्यात शांतता सुव्यवस्था व स्थैर्य निर्माण करण्यासाठी नागरी समता प्रस्थापित करणे आवश्यक असते. श्रीमंत-गरीब, भूमी धारक- भूमिहीन, स्त्री-पुरुष, साक्षर निरक्षर या कोणत्याही

आधारे नागरिकात भेदभाव न करता सर्वांना समान राजकीय अधिकार देणे हे नागरी समाजाचे लक्षण आहे. लोकशाही स्वातंत्र्य आणि समता या दोन्ही अत्यावश्यक असतात. नागरी स्वातंत्र्य प्राप्त झाली तरच समता प्रस्थापित करणे शक्य होते.

### २) नैसर्गिक समता

समाजातील सर्व व्यक्ती निसर्गत:च समान आहेत असे समजणे म्हणजेच नैसर्गिक समता होय. नैसर्गिक समते बाबत विचार मांडणाऱ्या विचारवंतांच्या मते मानवी समाजात निसर्गतःच असमानता असते. याउलट जॉब्स, लॉक, रुसो या सामाजिक करार सिद्धांत वाद्यानी मानव निसर्गत:च समान आहे असे स्पष्ट केले आहे. जॉन लॉक यांनी नैसर्गिक समतेचा पुरस्कार केला. लॉकच्या मते निसर्गत:च लोक समान असतात परंतु मानवनिर्मित भेदभावांमुळे विषमता निर्माण होते. धर्म, वर्ण, भाषा, जातीव्यवस्था यामुळे समाजात भेद निर्माण झाले. तेव्हा समाजात निर्माण झालेली कृत्रिम विषमता नष्ट करून नैसर्गिक समता प्रस्थापित करणे महत्त्वाचे आहे.

### ३) सामाजिक समता-

सामाजिक समता म्हणजे समाजातील सर्व व्यक्तींना समान दर्जा, समान प्रतिष्ठा देणे होय. समाजातील सर्व व्यक्तींचा दर्जा समान असावा, केवळ जन्मावरून उच्च नीच असा भेदभाव केला जाऊ नये म्हणजे सामाजिक समता साध्य होऊ शकते. धर्म, जात, वंश, लिंग, पंथ, वास्तव्य यावरून व्यक्ती व्यक्ती मध्ये भेदभाव न करता सर्वांना विकासाची समान संधी देणे, समान दर्जा देणे म्हणजे सामाजिक समता होय. आज २० व्या शतकात सर्वच देशात सामाजिक विषमता कमी करून समता प्रस्थापित करण्याच्या दिशेने प्रयत्न सुरू आहेत. अमेरिकेत वर्णद्वेष व गुलामगिरी नष्ट करणे, भारतातील अस्पृश्यता निर्मूलनाचे कार्य ही सामाजिक समतेसाठी आहेत. सामाजिक समतेमुळे राष्ट्रीय ऐक्य दृढ होते. सामाजिक समता निर्माण करण्यासाठी कायद्याबरोबरच समाजाचे मानसिक परिवर्तन आवश्यक आहे. समाजातील व्यक्तींनी परस्परांचा दर्जा जोपासला तरच समता प्रस्थापित होऊ शकेल.

### ४) आर्थिक समता-

आर्थिक विषमतेमुळे समाजात परस्पर हित विरोधी वर्ग निर्माण होऊन अशांतता माजते. यासाठी आर्थिक समता असली पाहिजे. समाजातील प्रत्येक व्यक्तीला आपल्या जीवनावश्यक गरजा भागवण्यासाठी समान संधी व योग्य परिस्थिती उपलब्ध करून देणे म्हणजे आर्थिक समता होय. प्रा. लस्कीं च्या मते सर्व व्यक्तींना त्यांच्या जीवनावश्यक प्राथमिक गरजा पूर्ण होईपर्यंत आर्थिक समता असणे आवश्यक आहे. व्यक्तीला आपल्या कर्तृत्वावर अधिक वेतन मिळविण्याचा अधिकार आहे पण त्याचे हे वेतन त्याच्या कार्याच्या सामाजिक उपयुक्ततेवर अवलंबून राहील. आर्थिक विषमतेमुळे आर्थिक शोषण होऊन समाजाचा समतोल बिघडतो. संपत्तीचे केंद्रीकरण मूठभर श्रीमंत भांडवलदार वर्गांकडे होऊन समाजाचा समतोल बिघडतो. मार्क्सच्या मते समाजात सामान्य मजुरांच्या किमान प्राथमिक

गरजा भागत नसतील तर त्यांना राजकीय व सामाजिक स्वातंत्र्य देऊन उपयोग होणार नाही हे स्पष्ट केले. संपत्तीच्या केंद्रीकरणाला आळा व आर्थिक शोषण थांबवून प्रत्येक व्यक्तीला प्राथमिक किमान गरजांची पूर्तता करता यावी अशी परिस्थिती व संधी उपलब्ध करून देणे म्हणजे आर्थिक समता होय.

**५) राजकीय समता-**

राजकीय समता म्हणजे देशातील प्रत्येक नागरिकाला राज्यकारभारात सहभागी होण्याची समान संधी उपलब्ध करून देणे होय. देवा सर्व नागरिकांना समान राजकीय हक्क व राज्य व्यवस्थेत भाग घेण्याची समान संधी मिळते तेव्हा अशी समता प्रस्थापित होते. आधुनिक लोकशाही राजकीय स्वातंत्र्यावर आधारलेली आहे. मतदानाचा हक्क, निवडणूक लढविण्याचा हक्क, शासकीय धोरणावर कार्यावर टीका करण्याचा हक्क असे राजकीय हक्क नागरिकांना उपभोक्ता यावेत म्हणून त्यांना समान दर्जा व समान संधी देणे आवश्यक असते. राजकीय समता प्रस्थापित करण्यासाठी समतेची वागणूक देणे आवश्यक असते. उदा. नागरिकांना मतदानाचा अधिकार देत असताना धर्म,, जात वंश, वर्ण, व्यवसाय, वास्तव्य असा कोणताही भेद विचारात घेऊ नये. ब्रिटिश राजवटीत भारतीयांना अत्यंत मर्यादित स्वरूपाचे राजकीय हक्क होते. म्हणून तेव्हा राजकीय समता नव्हती. आज भारतीय संविधानाने सर्व नागरिकांना समतेची हमी दिलेली आहे. अठरा वर्ष पूर्ण असलेल्या प्रोड नागरिकांना मतदानाचा व इतर अधिकार दिले आहेत. आज बहुतेक लोकशाही राष्ट्रात नागरिकांना प्रौढ मताधिकार दिला आहे.

**६) कायदेशीर समता**

कायदेशीर समता म्हणजे कायद्याअंतर्गत प्रत्येक व्यक्तीला समान वागणूक दिली जाते. प्रत्येक व्यक्तीला त्याची जात, धर्म, लिंग व इतर कोणत्याही बाबतीत भेदभाव न करता कायद्याअंतर्गत समान संरक्षण प्रदान केले जाते. कायद्यापुढे प्रत्येक व्यक्तीला तिच्या अधिकार व स्वातंत्र्याचे संरक्षण मिळते. कायदेशीर समतेचा अंमल वेगवेगळ्या देशात भिन्न स्वरूपाचा आहे. काही देशात प्राचीन परंपरांमुळे तर काही देशात असहिष्णूते मुळे कायदेशीर समतेला विरोध होत आला आहे.

### २.२.७ सारांश

वरील प्रमाणे समतेचे महत्त्वाचे प्रकार स्पष्ट करता येतात. समते मुळे प्रत्येक नागरिकाला आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास करण्याची समान संधी मिळते. तिला कोणत्याही एका प्रकारची समता नाकारली तरी त्याचा परिणाम इतर प्रकारच्या समतेवर होत असतो. त्यामुळे शासन संस्था व्यक्तीच्या सर्व प्रकारची समता निर्माण करून विकास घडवून आणण्याचे कार्य करते.

### २.२.८ स्वातंत्र्य आणि समता संबंध

स्वातंत्र्य आणि समता हे लोकशाहीचे दोन्हीही आधारभूत घटक आहेत. व्यक्ती विकासासाठी ही दोन्ही मुल्ये आवश्यक ठरतात. स्वातंत्र्य आणि समता यातील संबंध अभ्यासताना दोन प्रकारचे दृष्टिकोन विचारात घेणे आवश्यक ठरते. स्वातंत्र्य आणि समता

या दोन्ही परस्परपूरक तसेच परस्पर विरोधी संकल्पना आहेत असा प्रश्न उद्भवतो. हे दोन्ही दृष्टिकोन विचारात घेऊन आपण स्वातंत्र्य आणि समता यातील विचारात घेऊ.

स्वातंत्र्य आणि समता परस्पर विरोधी - लॉर्ड ॲक्टन आणि दी टॉकव्हील या विचारवंतांनी स्वातंत्र्य आणि समता या संकल्पना परस्परविरोधी आहेत असे म्हटले आहे. त्यांच्या मते ' समता निर्माण केली तर स्वातंत्र्याचा संकोच होतो, समतेची इच्छा धरली असता स्वातंत्र्याची आशा फोल ठरते. स्वातंत्र्याची अपेक्षा करून स्वातंत्र्य सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न केला तर समता संपुष्टात येते आणि समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला त्या स्वातंत्र्यावर मर्यादा येतात. त्यामुळे स्वातंत्र्य व समता आहे या दोन्ही गोष्टी परस्परविरोधी वाटतात. लॉर्ड ॲक्टन आणि दी टॉकव्हील यांनी मांडलेला निष्कर्ष फारसा अर्थपूर्ण वाटत नाही कारण स्वातंत्र्य आणि समता यातून ही अमूर्त आहेत. त्या प्रत्यक्षात येण्यासाठी राज्याने प्रयत्न करणे आवश्यक आहेत. व्यक्ती आणि राज्य यांचा परस्पर संबंधातून आणि सहकार्यातून स्वातंत्र्य आणि समता यांची निर्मिती होते.

### २.२.९ स्वातंत्र्य व समता परस्परपूरक

व्यक्ती स्वातंत्र्य आणि समता या दोन्ही गोष्टी परस्पर पूरक आहेत. व्यक्तीला स्वातंत्र्य उपभोगण्यासाठी समतेची गरज असते. समाजातील प्रत्येक व्यक्तीला जेव्हा समानतेची वागणूक मिळते आणि विकासाची समान संधी मिळते तेव्हा त्या समाजात समता आणि स्वातंत्र्य परस्परांना पूरक ठरलेली दिसतात. स्वातंत्र्यामुळे समता प्रस्थापित होते आणि समते मुळे व्यक्तीला स्वातंत्र्य उपभोगता येते. स्वातंत्र्य आणि समता या दोन्ही गोष्टीत एक प्रकारचे संतुलन असते. समतेला जास्त महत्त्व दिले तर स्वातंत्र्याचा संकोच होतो तसेच स्वातंत्र्य मर्यादित दिले तर समता संपुष्टात येते. तेव्हा स्वातंत्र्य आणि समता यात योग्य प्रकारे संतुलन असणे आवश्यक आहे. स्वातंत्र्य आणि समता या परस्पर पूरक असतील तरच व्यक्तिविकास आणि समाज विकास घडून येतो.

समतेमुळे स्वातंत्र्य कधीही नष्ट होत नाही. उलट स्वातंत्र्य सुरक्षित ठेवण्यासाठी समता उपयुक्त ठरते. विषमता नष्ट करून समता प्रस्थापित केली तर स्वातंत्र्य टिकून राहते. समते शिवाय स्वातंत्र्य निरर्थक बनते. उदा. आर्थिक समतेमुळे आर्थिक स्वातंत्र्य सुरक्षित बनते परंतु आर्थिक विषमता असेल तर नागरिकांना विकासाची संधी मिळत नाही. आर्थिक विषमता असेल तर राजकीय व सामाजिक समता याना काही अर्थ उरत नाही. लोकशाही राज्यात राजकीय आणि सामाजिक समतेचे बरोबर आर्थिक समता प्रस्थापित करावी लागते. आर्थिक समते शिवाय लोकशाही स्थिर व यशस्वी होऊ शकत नाही.

### २.२.१० सारांश

एकंदरीत समता आणि स्वातंत्र्य या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत असे म्हटले तर वावगे ठरणार. नाही समता असेल तरच स्वातंत्र्य सुरक्षित राहते. स्वातंत्र्य सुरक्षित असेल तरच समता प्रस्थापित होते. समता आणि स्वातंत्र्य या दोहोंमुळेच व्यक्ती विकास शक्य होतो. थोडक्यात स्वातंत्र्य आणि समता या दोन्ही संकल्पना परस्परविरोधी नसून परस्पर पूरक आहेत. या दोन्हींचा हेतू एकच आहे तो म्हणजे व्यक्ती विकास हा होय. स्वातंत्र्य आणि समता या दोन संकल्पना भिन्न असल्या तरी त्या परस्परपूरक व परस्परावलंबी आहेत आणि या दोहोत संतुलन साधले असता व्यक्ती विकास घडून येतो.

## २.३ न्याय - (Justice)

**प्रस्तावना-**

आधुनिक राज्यशास्त्राच्या अभ्यासात न्याय या संकल्पनेला विशेष महत्व असलेले दिसते. स्वातंत्र्य, समता, बंधुता या सामाजिक मूल्याप्रमाणेच न्याय हे सामाजिक मूल्य महत्त्वाचे मानले जाते. न्याय या शब्दाचे विविध आयाम आतापर्यंत दर्शविण्यात आली असून त्याचा समकालीन सामाजिक संदर्भानुसार अर्थ काढण्यात आलेला दिसतो. राज्यात मानवी संबंधाची योग्य व्यवस्था करण्यासाठी ' न्याय' तत्व आवश्यक असते. समाजाचे जीवन सुरळीत चालण्यासाठी विविध व्यक्तींच्या हीच संबंधांमध्ये समन्वय साधण्यासाठी तसेच विसंगत विचार, वागणूक यांचा मेळ घालून सुसंगती निर्माण करणे म्हणजे न्याय होय. प्रस्थापित समाजात प्रत्येक व्यवस्थेला आपल्या न्याय्य वाटा मिळावा आणि व्यक्ती व्यक्ती मधील हितसंबंध सुरक्षित राहावेत या दृष्टीने न्यायाला महत्त्व आहे.

### २.३.१ न्यायाची व्याख्या -

१) प्रा. अर्नेस्ट बार्कर -"आपापल्या कार्यक्षेत्रातील कर्तव्या वरच लक्ष केंद्रित करणे आणि इतरांच्या कार्यक्षेत्रात हस्तक्षेप न करणे म्हणजे न्याय होय."

२) प्रा. सॅबाईन - " व्यक्ती आणि राज्य यांच्या कार्यपद्धतीत सुयोग्य परस्पर संबंध प्रस्थापित करणे म्हणजे न्याय होय."

३) सिफॉलरन - "प्रत्येकाने आपला शब्द पाळणे म्हणजे न्याय होय."

४) प्लेटो - " समाजातील प्रत्येक वर्गाने आपापले कार्य करणे आणि इतरांच्या कार्यात हस्तक्षेप न करणे म्हणजे न्याय होय."

५) अरिस्टॉटल - समाजजीवनातील सर्व फायदे आणि तोटे समाजातील सर्व लोकांमध्ये त्यांच्या क्षमता आणि पात्रतेनुसार विभाजित करणे म्हणजे न्याय होय."

### २.३.२ न्याय संकल्पनेचा अर्थ :-

न्याय या शब्दाला इंग्रजीत Justice हा शब्द वापरला जातो जो Jus (जस) किंवा Jungere (जंगेर) या लॅटिन शब्दापासून निर्माण झालेला आहे. त्याचा अर्थ जोडणे, परस्पर संबंध किंवा समन्वय साधने असा होतो. समाजातील मानवी संबंध आणि मुल्ये यांच्यात समन्वय साधणे म्हणजे न्याय होय. मानवी सुख आणि कल्याण यासाठी मानवा मानवा मध्ये संबंध जोडावे लागतात. मानवाची हितसंबंध सुरक्षित ठेवावे लागतात. स्वातंत्र्य, समता, बंधुता, सहकार्य या मूल्यांच्या आधारे त्यांच्या संबंधांचा मेळ घालून सुसंघटीत व्यवस्था निर्माण करावी लागते. लोकांच्या विकासासाठी जे योग्य व आवश्यक वाटते ती देणे म्हणजे न्याय.

### २.३.३ विविध विचारवंतांचे न्याया संबंधी दृष्टीकोण:-

न्याय या संकल्पनेचा अर्थ मांडत असताना विविध विचारवंतांमध्ये एकमत असलेले दिसत नाही. न्यायाविषयी अनेक विचारवंतांनी विचार मांडलेले आहेत व त्याचे स्वरूप स्पष्ट केलेले आहे. न्यायाबाबत विविध विचारवंतांनी मांडलेले दृष्टिकोन -

**१) प्लेटो-**

प्लेटो या विचारवंतांनी आपल्या Republic या ग्रंथाला Concerning Justice असे नाव दिले आहे. प्लेटो ची न्यायाची कल्पना नैतिकतेवर आधारलेली आहे. त्याच्या मते आदर्श राज्यातच न्याय प्रस्थापित होतो. न्यायासाठी राज्यात चारित्र्याची आणि सद्गुणांची वाढ होणे आवश्यक असते. प्लेटो ला सामाजिक न्यायाची कल्पना अभिप्रेत होती. प्रत्येक व्यक्तीने समाजात राहून आपले नेमून दिलेले काम प्रामाणिकपणे आणि आवडीने पूर्ण केले तर संपूर्ण समाजाचे कल्याण होऊन समाजात न्यायाची निर्मिती होईल. प्लेटोचा न्याय विषयक सिद्धांत नैतिक, काल्पनिक व तात्विक स्वरूपाचा वाटतो.

**२) ॲरिस्टॉटल -**

ॲरिस्टॉटलने वितरक न्याय व सुधारणात्मक न्याय असे न्यायाचे दोन प्रकार पाडले. वितरक न्याय म्हणजे व्यक्तीला द्यावयाचे फायदे हे त्याला योग्यतेप्रमाणे द्यावेत आणि सुधारक न्याय म्हणजे समाजात समानता आणि साम्य आणण्यासाठी व्यक्ती ज्या गोष्टींना अपात्र आहे त्या गोष्टी तिच्या जवळ न ठेवणे होय. ॲरिस्टॉटलच्या मते जे गुणाने समान असतील त्यांना समान व जे असमान असतील त्यांना असमानतेने वागवणे म्हणजे न्याय होय. ॲरिस्टॉटलच्या मते, राज्यघटनेवरील निष्ठा, न्यायदानाची पात्रता व न्यायावरील निष्ठा या तीन निकषांवर न्यायाधीशांची नेमणूक केली असता न्यायदानाचे कार्य नि:पक्षपातीपणे व स्वतंत्रपणे होईल.

**३) रॉस्को पाउंड -**

अमेरिकन न्याय पंडित रॉस्को पाउंड यांच्या मते समाजाच्या विविध गटांच्या मागण्यांमध्ये समन्वय व संतुलन साधणे हे न्यायाचे प्रमुख उद्दिष्ट असते. म्हणून सामाजिक गरजांना व्यक्तिगत गरजांच्या जागी स्थान देणे आवश्यक असते.

**४) डेव्हिड मिलर -**

डेव्हिड मिलर यांनी न्याय आणि मानवतावाद यात फरक मानून सामाजिक धोरण सामाजिक न्यायाचे समर्थन केले आहे. मिलरने परोपकाराच्या भावनेपेक्षा कर्तव्यावर अधिक भर दिलेला आहे. सामाजिक न्याय प्रस्थापित करणे हे राज्याचे प्रमुख कर्तव्य असते. राज्यातील बहुसंख्य लोकांचे स्वातंत्र्य सुरक्षित ठेवण्यासाठी आणि त्यांचे कल्याण साधण्यासाठी गरजांची न्याय्य विभागणी करणे हे सामाजिक न्यायाचे प्रमुख उद्दिष्ट असते.

**५) थॉमस ॲक्विनाल -**

थॉमस ॲक्विनाल यांच्या मते, धार्मिक नियमानुसार व्यक्तीने समाजात वागणे, व्यवहार करणे म्हणजे न्याय होय. राज्याचे कायदे धार्मिक नियमांच्या आधारे निर्माण करून राज्यात न्याय प्रस्थापित करता येतो.

**६) अर्नेस्ट बार्कर**

अर्नेस्ट बार्कर त्यामध्ये राजकीय व्यवस्था सामाजिक संघटन आणि कायदा निर्मिती यांच्याशी न्यायाचा नेहमी संबंध येत असतो. राज्यात मानवी संबंधाची योग्य व्यवस्था करण्यासाठी न्याय तत्व आवश्यक असते.

**७) थॉमस हॉब्ज -**

थॉमस हॉब्ज यांनी न्याय हा सामाजिक तसेच वैधानिक स्वरूपाचा आहे असे मत मांडले आहे. समाज हिताच्या दृष्टीने जेव्हा चांगली समाज व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो तेव्हा सामाजिक कायदेशीर न्याय प्रस्थापित होऊ शकतो. सामाजिक न्याय हे अंतिम तत्त्व असून ते व्यक्तिस्वातंत्र्य, व्यक्ती विकास, समता, सहकार्य, एकता या मूल्याशी निगडीत असते. सामाजिक न्यायाचे तत्त्व हे कायद्याच्या माध्यमातून प्रकट होत असले तरी हे तत्व सामाजिक, आर्थिक आणि राजकीय व्यवस्थेतच मूर्त स्वरूप धारण करू शकते म्हणजेच न्याय समाजाने निर्माण केलेला असतो.

**८) कार्ल मार्क्स -**

कार्ल मार्क्स यांनी आर्थिक न्यायाची संकल्पना मांडली आहे. आर्थिक शोषन आणि आर्थिक विषमता या गोष्टी नष्ट करून आर्थिक समता प्रस्थापित करणे या हेतूने साधनसामग्रीची उपलब्धता सर्वांना करून देण्यासाठी राज्यसंस्थेने मालमत्ता आणि उत्पन्न यांचे न्याय्य व योग्य वाटप केले पाहिजे म्हणजे आर्थिक न्याय प्रस्थापित होऊ शकेल. सामाजिक व आर्थिक न्याय प्रस्थापित झाल्याशिवाय राज्यात खऱ्या अर्थाने राजकीय स्वातंत्र्य प्रकट होऊ शकत नाही.

### २.३.४ न्याय या संकल्पनेचे स्वरूप-

न्याय एक व्यापक संकल्पना आहे. विविध विचारवंतानी अनेक दृष्टिकोनातून न्यायाचा अर्थ स्पष्ट केलेला आहे. यावरून न्यायचे स्वरूप पुढीलप्रमाणे मांडता येईल.

**१) गतिमान व बदलणारी संकल्पना -**

न्याय ही एक गतिमान व बदलणारी संकल्पना आहे. समाजात स्वातंत्र्य, समता, बंधुता, अधिकार, विधिनियम अशा आदर्शाचा आणि मूल्यांचा मेळ घालने यास न्याय म्हणतात. बदलती परिस्थिती आणि मुल्ये यांचा मेळ घालताना न्यायाची संकल्पना बदलत राहते. उदा. समाजवाद्यांना न्याय समतेवर आधारलेला हवा असतो तर स्वातंत्र्य वाद्यांना स्वातंत्र्यावर मर्यादा न आणणारा न्याय हवा असतो. एकंदरीत न्याय ही एक गतिमान बदलणारी संकल्पना आहे असे म्हणता येईल.

**२) सुसंघटित समाजव्यवस्थेतील प्रमुख घटक-**

न्याय प्रमुख मूल्य आहे कारण मानवाचे संबंध आणि मूल्य यांचे समायोजन करण्यासाठी न्याय आवश्यक आहे. न्यायाच्या आधारे स्वातंत्र्य, समता, सहकार्य अशा तत्त्वांची तडजोड साधली जाते. समाजातील विविध घटकांना एकत्र आणून

त्यांच्यात समन्वय साधून सुसंघटीत समाजव्यवस्था निर्माण केली जाते. कायदा व सुव्यवस्थेसाठी न्याय हे मूल्य आवश्यक असते.

**३) नैतिकतेचा दृष्टीकोन -**

नैतिकतेच्या दृष्टीकोनातून न्यायाची संकल्पना स्पष्ट करतांना नीती-अनीतीचा विचार केला जातो. जेव्हा एखादी अनैतिक गोष्ट घडते तेव्हा अन्याय झाला असे समजण्यात येते. नैतिक गोष्टींचे आचरण करून जेव्हा मानवी जीवन सुखी, कल्याणकारी करण्याचा प्रयत्न होतो तेव्हा नैतिक स्वरुपाचा न्याय प्रगट होऊ शकतो. आपल्या हक्कांचा उपभोग घेताना व्यक्तीला काही कर्तव्य पार पाडावी लागतात. नैतिक दृष्ट्या कर्तव्य पार पाडली असता समाजव्यवस्थेला नैतिकतेचे अधिष्ठान प्राप्त होते.

**४) काल परिस्थिती सापेक्ष -**

न्यायाची संकल्पना कालमानानुसार आणि परिस्थितीनुसार बदलत असते. न्याय ही संकल्पना गतिमान आणि विकास पावणारी संकल्पना आहे. काही वेळेस ज्या व्यक्तीवर अन्याय होतो, त्या व्यक्तीला स्वतःवर अन्याय झाला याची जाणीव नसते. अन्यायाची जाणीव नसल्याने अन्यायाचे प्रमाण वाढत राहते काही वेळेला व्यक्तीला स्वत:वर होणारा अन्याय कळत असतो पण परिस्थितीमुळे ती व्यक्ती अन्यायाचे निवारण करू शकत नाही.

**५) समता तत्वाशी निगडीत**

न्यायाची संकल्पना समता तत्वाशी निगडित असते. समाजात न्याय प्रस्थापित होण्यासाठी आर्थिक राजकीय आणि सामाजिक क्षेत्रात समानतेचे तत्व स्वीकारले जाते. कायद्यासमोर सर्वांना समान मानून संरक्षण दिले जाते. तसेच विकासासाठी समान संधी उपलब्ध करून दिली जाते. समाजात विषमता असेल तर विकासाची समान संधी मिळू शकत नाही. अशावेळी ज्यांना विकासाची संघी हवी आहे ती त्यांना मिळवून देण्यासाठी समता आवश्यक असते. समते शिवाय न्याय प्रस्थापित होऊ शकत नाही. समता नसेल तर राज्यात अराजकता व अस्थिरता निर्माण होते. समाजव्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी क्षमता हे तत्व आवश्यक असते. स्थिर व सुसंघटित समाजात न्याय निर्माण होतो.

**सारांश -**

अशाप्रकारे न्याय या संकल्पनेचा अर्थ स्वरूप स्पष्ट करता येईल. न्याय ही व्यापक संकल्पना आहे. विविध विचारवंतानी अनेकविध दृष्टिकोनातून न्यायाचा अर्थ स्पष्ट केलेला आहे. समाजजीवन सुरळीत चालण्यासाठी न्यायाची आवश्यकता असते. समाजातील हितसंबंध सुरक्षित राहण्यासाठी न्यायाची भूमिका महत्वपूर्ण ठरते.

## २.३.५ न्यायाचे प्रकार - (Types of Justice)

न्याय म्हणजे समाजाचे मानवी मूल्यामध्ये परिवर्तन करणारी महत्वाची संकल्पना आहे. पारंपारिक न्यायाची जागा आज सामाजिक न्यायाने घेतली आहे. व्यक्तीचा सर्वांगीण विकास घडून येण्यासाठी आणि कल्याणकारी राज्याची निर्मिती करण्यासाठी न्याय प्रस्थापित होने आवश्यक असते. राजकीय, सामाजिक आर्थिक क्षेत्रात व्यक्तीला न्यायाची वागणूक मिळाली तरच तिचा विकास होऊ शकतो. न्याय ही संकल्पना आपण कोणत्या दृष्टिकोनातून अभ्यासतो यावरून तिचा प्रकार मानावा लागतो. साधारण पणे न्यायाचे पुढील प्रकार सांगता येतील.

### १) विधी मय न्याय (Legal Justice)

विधिमय न्याय म्हणजे न्यायोचित व विवेकी कायद्याचे अस्तित्व असले पाहिजे आणि त्याचे निष्ठेने पालन केले पाहिजे. यांचा समावेश विधिमय न्याया मध्ये होतो. राज्यसंस्थेची न्याय्य इच्छा अशा सकारात्मक कायद्यातून व्यक्त होते. त्याला घटनात्मक स्वरूप देऊन हे कायदे अमलात आणले जातात तेव्हा विधीमय न्यायाची प्रस्थापना होत असते. थोडक्यात राज्यसंस्थेने केलेली कायद्याची संहिता, लोकांनी त्यांचे निष्ठेने केलेले पालन यातूनच समाजात न्याय प्रस्थापित होत असतो. कायद्याशी समाजातील सर्व व्यक्ती बांधील असतात आणि त्या कायद्याचे संरक्षण त्यांना मिळत असते. कायदा सर्वांना लागू होतो आणि कायद्याच्या संरक्षणाखाली समान न्याय मिळतो. विधिमय न्याय म्हणजे कायद्यासमोर सर्व समान आणि कायद्याचे सर्वांना समान संरक्षण होय. अर्थात वरिल उद्दिष्ट साध्य करायचे असेल तर कायदे निर्मान करणारी यंत्रणा म्हणजे कायदेमंडळे ही न्याय्य व विवेकपूर्ण रचनेवर आधारित असावीत. ह्याचबरोबर न्यायमंडळही स्वतंत्र व नि:पक्षपाती असले पाहिजे.

### २) राजकीय न्याय (Political Justice)

राजकीय न्याय प्रस्थापित करणे म्हणजे सर्वांना समान राजकीय अधिकार देणे व राजकीय सहभागाची समान संधी प्रदान करणे होय. राजकीय न्यायाचा संबंध राज्याची धोयधोरणे व न्याय निश्चित करणाऱ्या राजकीय प्रक्रियांशी येतो. राजकीय न्यायाची मुळे राज्य संस्थेची सत्ता आणि व्यक्ती यांचे परस्पर संबंध कसे आहेत यातून शोधता येतात. राजकीय समतेतून राजकीय न्यायाची निर्मिती होत असते. प्रौढ मताधिकार व लोकशाही प्रक्रियेच्या अंमलबजावणीतून अशी समता निर्माण होत असते. लोकशाही पद्धतीची राज्यघटना राज्यात राबविली जाते तेंव्हा खऱ्या अर्थाने राजकीय न्यायाची निर्मिती होत असते.

### ३) आर्थिक न्याय- (Economical Justice)

समाजात जेव्हा आर्थिक समता निर्माण होते तेंव्हाच आर्थिक न्याय निर्माण होत असतो. यामध्ये सर्वांच्या मूलभूत गरजा भागविल्या जाणे महत्वपूर्ण असते. श्रीमती आणि गरिबी यांतील अंतर जेवढे कमी असते तेवढे आर्थिक न्याय प्रस्थापित होण्याची शक्यता जास्त असते. आर्थिक न्यायाशिवाय इतर कोणत्याही न्यायाची अपेक्षा करता

येत नाही. नागरिकांच्या मूलभूत गरजा भागविल्या जातील असे वातावरण निर्माण करणे हे राज्याचे कर्तव्य आहे. यासाठी आज ज्याने आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांना साहाय्य केले पाहिजे तसेच आर्थिक दृष्ट्या सबल घटकांवर मार्यादा घातल्या पाहिजेत. आर्थिक प्रगतीची समान संधी उपलब्ध करून देणे हे यामध्ये अंतर्भूत असते. समाजातील उपलब्ध साधनसामुग्रीचा सुयोग्य वाटपात आर्थिक न्यायाचा अंतर्भाव होतो.

**४) सामाजिक न्याय (Social Justice )**

समाजातील प्रत्येक व्यक्तीची समाजाचा घटक म्हणून प्रतिष्ठा राखणे यासाठी आवश्यक ती सामाजिक समता निर्माण करणे सामाजिक न्यायामध्ये समाविष्ट असते. कोणालाही विशेषाधिकार न देता स्वतःच्या व्यक्तिमत्व विकासाची संधी प्राप्त करून देणे सामाजिक न्यायामध्ये महत्वपूर्ण आहे. जाती,धर्म ,रंग, वंश व भाषा या इत्यादींच्या आधारावर कुणाचेही श्रेष्ठ-कनिष्ठ असे स्थान निर्मान होता कामा नये. दक्षिण आफ्रिकेतील वर्णभेद, भारतातील जातीव्यवस्था अशा सारख्या उच्च नीचतेच्या सामाजिक विषमता या सामाजिक न्यायाच्या मार्गातील मोठे अडसर आहेत. यामुळे समाजातील समतोल नष्ट होते व सामाजिक अन्याय निर्माण होतो.

### २.३.६ सारांश

अशाप्रकारे न्यायाच्या विविध प्रकारांचे विवेचन देता येते. न्यायाचे मुख्यता राजकीय, सामाजिक, आर्थिक व कायदेशीर असे प्रकार सांगता येतील. व्यक्तिविकासासाठी समाजात न्यायाची आवश्यकता असते त्यामुळे न्याय ही संकल्पना महत्वाची व आवश्यक ठरते.

### २.३.७ न्यायाच्या बाजू - (Dimensions of Justice )

न्याय या संकल्पनेचा प्रामुख्याने विविध दृष्टिकोनातून विचार केला जातो. न्याय ही विविध बाजू असलेली संकल्पना आहे. न्यायाच्या मुख बाजू पुढील प्रमाणे आहेत.

**१) प्रक्रियात्मक न्याय (Procedural Justice)**

प्रक्रियात्मक न्यायाचा सिद्धांत न्याय आणि न्यायाची मागणी पूर्ण करणाऱ्या प्रक्रियेवर आधारित आहे. या सिद्धांतानुसार निर्णयापेक्षा प्रक्रिया अधिक महत्वाच्या आहेत, अशा न्यायाला नियमांचे अत्यंत सावधगिरीने पालन करावे लागते. न्यायाची प्रक्रियात्मक समजूत वैयक्तिक वर्तणुकीवर अवलंबून असते. समाजाशी त्याचा काहीही संबंध नसतो. प्रक्रियात्मक न्यायाची कल्पना प्रथम रोबर्ट नौझिक यांनी मांडली. निर्णय कसे घेतले जातात आणि धोरणे कशी स्थापित केली जातात यातून प्रक्रियात्मक न्याय प्रभावित होतो. सर्व दृष्टीकोनाना आणि मुद्द्यांना विचारात घेणाऱ्या धोरणांची आखणी आणि प्रक्रियांची निर्मिती यांच्याशी हा न्याय संबंधित आहे. जेव्हा एखादा प्रश्न सोडविता येत नसेल तेव्हा नेता किंवा व्यवस्थापनाची आवश्यकता भासते. प्रक्रियात्मक न्याय असे सुचविते की निर्णय हे तटस्थ पाहिजेत जे तथ्यांवरआधारित असतील व कृतीयोग्य असतील.

जेव्हा कर्मचाऱ्यांना असा विश्वास असतो की समस्या न्याय आणि प्रामाणिकपणे सोडविल्या जातील तेव्हा त्यांना निर्णयामधे अधिक विश्वास असतो. यामुळे

प्रक्रियात्मक न्याय दाखवणाऱ्या प्रक्रिया आणि धोरणे तयार करणाऱ्या कंपन्यावर भार पडतो. प्रक्रियात्मक त्याच प्रकारे पोलिस याणि इतर कायदेशीर अधिकारी जनतेशी संवाद साधतात आणि आप्रकारे हे संवाद पोलिसां बद्दल लोकांची मते निर्माण करतात. कायदयाचे पालन करण्याची त्यांची इच्छा आणि वास्तव गुन्हयांचे दर यावर लक्ष केंद्रित करतो. प्रक्रियात्मक न्याय चार तत्वावर आधारित आहे. लोकांना आदराने आणि मानाने वागविणे नागरिकांना आवाज उठविण्याचा अधिकार देणे, निर्णय घेण्यात तटस्थ राहणे आणि विश्वासाहार्य उद्दिष्टांचा संदेश देणे. संशोधनातून असे दिसून आले आहे की ही तत्वे अधिकारी आणि समाज यातील संबंधांमध्ये योगदान करतात की ज्यात अ) समाजाचा पोलिसांवर विश्वास असतो की, ते प्रामाणिक निःपक्षपाती उदार आणि कायदेशीर आहेत. ब) समाजाला कायद्याचे पालन करणे बंधनकारक होते क) समाजाला असे वाटले की त्यांची आणि पोलिसांची मुल्ये व उद्वेश समान आहेत.

**२) वितरणवादी न्याय -(Distributive Justice )**

वितरणात्मक किंवा वितरणवादी न्याय हा आज आधुनिक दृष्टीकोन म्हणून अभ्यासला जात असला तरी याचा अभ्यास प्राचीन काळापासून होत आलेला दिसतो. ॲरिस्टॉटलने न्यायाचे जे तीन प्रकार सांगितले त्यात वितरणात्मक न्याय दोष निवारक किंवा उपचारात्मक न्याय आणि परिवर्तक न्याय असे तीन प्रकार सांगितलेले आढळतात. नंतरच्या काळात उदारमतवादी आणि उपयोगितावादी विचारांनी वितरणात्मक न्यायाचा पुरस्कार केलेला आहे. वितरणात्मक न्यायाचा मुख्य आशय असा आहे की व्यक्तीला मिळणारे उत्पन्न हे केवळ तिचे स्वतःचे नसून संपूर्ण समाजाचे आहे. त्यामुळे तिने त्यातले किती उत्पन्न स्वतःजवळ ठेवावे हे ठरविण्याचा अधिकार समाजाला असायला पाहिजे.

**३) भरपाईकरणारा न्याय - (Restorative Justice)**

नुकसान झालेल्या गोष्टींची भरपाई करून किंवा मोबदला देऊन न्याय आणणे होय. वर्षानुवर्षे ज्या लोकांचे शोषण झाले, ज्यांना हक्क, स्वातंत्र्य न्याय मिळाला नाही अशा वर्गांना सवलत देणे म्हणजे भरपाई करणारा न्याय प्रस्थापित करणे होय.

**४) Restributive Justice** -

खूनाचा बदला खुनाने घेणे म्हणजे रेस्ट्रीब्युटिव्ह न्याय होय. डोळ्यास डोळा फोडणे.

उदा. एखाद्या खुन्याला ज्याचा खून झाला असेल त्या कुटुंबाने ठार मारणे म्हणजे रेस्ट्रीब्युटिव्ह न्याय होय. सुसंस्कृत समाजात असा न्याय क्रूर अयोग्य समजण्यात येतो.

### २.३.८ न्यायाचे महत्व

**१) सर्वांगिन विकासासाठी आवश्यक.**

व्यक्तीचा सर्वांगिन विकास घडून येण्यासाठी आणि कल्याणकारी राज्याची निर्मिती करण्यासाठी न्याय प्रस्थापित होणे आवश्यक आहे. राजकीय सामाजिक आणि

आर्थिक क्षेत्रात व्यक्तीला न्यायाची समान वागणूक मिळाली तरच तिचा सर्वागिण विकास होऊ शकतो. त्यामुळे व्यक्तीच्या सर्वतोपरी विकासासाठी हा महत्वपूर्ण मानला जातो.

**२) परस्पर हितसंबंधांचे संतुलन साधण्यासाठी**

समाजाचे जीवन सुरळीत चालण्यासाठी विविध व्यक्तींच्या हितसंबंधांना मध्ये समन्वय साधणे, विसंगत विचार, वागणूक यांचा मेळ घालून एक सुसंगती निर्माण करणे म्हणजे न्याय होय. परस्पर विरोधी हितसंबंधांमध्ये संतुलन साधणे आणि व्यवस्थेला स्थिरता आणणे हे न्यायाचे प्रमुख उद्दिष्ट असते. थोडक्यात परस्पर हितसंबंधांचे संतुलन साधून समाज जीवन सुरळीतपणे चालण्यासाठी न्यायाची भूमिका महत्वपूर्ण ठरते.

**३) सामाजिक विषमता दूर करण्यासाठी**

नैसर्गिक दृष्ट्या मानवी समाजात विभिन्न भेद आढळतात. सर्व व्यक्ती सारख्याच पात्रतेच्या नसतात. त्यामुळे समानता राहत नाही. राजकीय स्वातंत्र्याच्या अभावामुळे राजकीय सत्ता विशिष्ट लोकांच्या, वर्गाच्या हातात जाते. आर्थिक विषमतेमुळे मूठभर श्रीमंत लोकांच्या हातात संपत्तीचे आणि सत्तेचे केंद्रीकरण होते. सामाजिक विषमतेमुळे व्यक्तीला सामाजिक प्रतिष्ठा व दर्जा राहत नाही. एकंदरित समते ची, न्याय्य वागणूक मिळत नसेल तर व्यक्तीचा सर्वांगीण विकास होऊ शकत नाही. न्यायाशिवाय समाज असूच शकत नाही. न्याय नसेल तर समाजात अराजकता माजते. व्यक्ती- व्यक्तींचे संबंध दुरावतात. आर्थिक शोषण पिळवणूक सुरू होते, सामाजिक अन्याय, सामाजिक विषमता निर्माण होऊन समाजाचे संपूर्ण स्वास्थ्य बिघडते. ऑकिनांस यांनी या बाबतील असे म्हटले आहे की न्यायाशिवाय राज्य म्हणजे लुटारुंची टोळी होय. म्हणजेच सामाजिक विषमता दूर करून प्रत्येक व्यक्तीला विकासाची समान संधी देण्यासाठी न्यायाची आवश्यकता असते.

**४) लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी -**

लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी न्याय आवश्यक आहे. न्यायाचे महत्व सांगतांना डॉ आंबेडकर यांनी म्हटले आहे की, आपल्याला लोकशाही समाजव्यवस्था यशस्वी करावयाची असेल तर राजकीय स्वातंत्र्य प्राप्त करून भागणार नाही. त्यासाठी राजकीय आर्थिक आणि सामाजिक स्वातंत्र्य प्रस्थापित करणे गरजेचे आहे. आर्थिक व सामाजिक समता प्रस्थापित केल्याशिवाय आपली राजकीय व्यवस्था स्थिर व यशस्वी होऊ शकणार नाही. थोडक्यात व्यक्तीचा सर्वांगिन विकास घडून येण्यासाठी आणि कल्याणकारी राज्याच्या निर्मितीसाठी आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रात समता प्रस्थापित होणे व व्यक्तीला समतेची न्यायाची वागणूक मिळणे गरजेचे आहे.

**सारांश**

अशाप्रकारे न्याय या मुल्याचे महत्व आहे. भारतीय संविधानाने बहाल केलेल्या न्याय स्वातंत्र्य, समता या मूल्यांपैकी न्याय या मूल्याचे महत्व अधोरेखित होते. व्यक्तीचा

सर्वांगीण विकास करण्यासाठी सामाजिक विषमता दूर करण्यासाठी परस्पर हितसंबंधांचे संतुलन राखण्यासाठी आणि लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी न्यायाचे महत्व अनन्यसाधारण आहे.

### २.३.९ स्वातंत्र्य समता व न्याय यांचा संबंध

स्वातंत्र्य, समता व न्याय या तत्वाना राजकीय मूल्ये असे संबोधतात. या मूल्यांची स्थापना करणे हे प्रत्येक राज्याचे उद्दिष्ट असते. ही उद्दिष्टये साध्य करण्यासाठी प्रत्येक राज्य योग्य विचारधारा आणि साधने यांचा वापर करीत असते.

स्वातंत्र्य, समता व न्याय या तत्वांचा परस्परांशी घनिष्ट संबंध आहे. यामधील एकाशिवाय दूसरे मुल्य अपूर्ण राहते. अतिस्वातंत्र्य समता आणि न्यायाच्या मार्गातील अडथळा आहे. तसेच अति समतेचा पुरस्कार केल्यास स्वातंत्र्य धोक्यात येते. समता आणि स्वातंत्र्याचा समतोल ज्यावेळी साधना जातो त्यावेळी राज्यात न्याय प्रस्थापित होतो.

समता म्हणजे मानवनिर्मित भेदाभेद नष्ट करणे. जात, धर्म, वंश, लिंग या आधारावर भेदभाव न करता प्रत्येक नागरिकाला समान नागरी, राजकीय सामाजिक, आर्थिक हक्क स्वातंत्र्याची प्राप्ती झाल्यास व्यक्तिविकासाची संधी मिळते. समाजहित साध्य होते व राज्यात न्याय प्रस्थापित होतों.

समते अभावी एक वर्ग विशेषाधिकार उपभोगतो आणि दुसऱ्या वर्गाची शोषण होते उदा. भारतात स्पृश्यास्पृश्य भेदाभेद जातीच्या आधारावर करण्यात येत असे. स्पृश्याना हक्क, स्वातंत्र्य होते तर अस्पृश्याना ते नाकारण्यात आले होते. भारतात स्वातंत्र्य मिळाल्यानंतर न्याय प्रस्थापित व्हावा यासाठी राज्यघटनेत नागरिकांना समतेचा, शोषणाविरुद्धचा सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क देण्यात आले.

प्राचीन ग्रीसमध्ये गुलामगिरीची प्रथा होती, अमेरिकेत निग्रो ना हक्क नाकारण्यात आले होते. पहिल्या महायुद्धापूर्वी इंग्लंडमध्ये स्त्री-पुरुष भेदभाव करण्यात येत असे व स्त्रियांना राजकीय अधिकार नाकारण्यात आले होते. परंतु आता बहुतेक सर्व देशांमध्ये भेदभाव नष्ट करण्यात आला असून समान हक्क व स्वातंत्र्याची तरतूद करण्यात आली आहे. थोडक्यात प्रत्येक राज्याचा आहे हेतू न्याय प्रस्थापित करणे हा आहे.

❄❄❄❄❄❄❄

# ३

# लोकशाही

## (Democracy)

**घटक रचना**

३.० उद्दिष्टे
३.१ लोकशाहीचे सिद्धांत
३.१.१ लोकशाहीचा अभिजनवादी/ श्रेष्ठिजनवादी सिद्धांत
३.१.१.१ अभिजनवादी लोकशाहीची ठळक वैशिष्ट्ये
३.१.२ लोकशाहीचा मार्क्सवादी सिद्धांत
३.२ उदारमतवादी लोकशाहीची तत्वे
३.३ लोकशाहीच्या यशस्वी कार्यासाठी अटी/आवश्यक परिस्थिती

## ३.० उद्दिष्टे (Objectives):-

१) लोकशाहीच्या सिद्धांताची ओळख करून देणे.

२) उदारमतवादी लोकशाहीची आधारभूत तत्त्वे समजावून देणे.

३) लोकशाहीच्या यशस्वी कार्यासाठी आवश्यक असणाऱ्या आवश्यक परिस्थिती/अटी स्पष्ट करणे.

४) सुदृढ व निकोप लोकशाहीच्या निर्मितीसाठी विद्यार्थ्यांमध्ये जाणिव निर्माण करणे.

५) विद्यार्थ्यांमध्ये लोकशाहीशी सुसंगत मानसिकता निर्माण करणे.

**प्रस्तावना (Introduction):-**

आधुनिक युग हे लोकशाहीचे युग मानले जाते. कारण जगातील बहुसंख्य राष्ट्रांनी लोकशाही शासनप्रकाराचा स्विकार केलेला आहे, तसेच आधुनिक काळात लोकशाही हा शासनप्रकार सर्वात लोकप्रिय शासनप्रकार आहे. स्थळ, काळ आणि परिस्थितीनुसार लोकशाही विकसित झालेली आहे. त्याबरोबरच लोकशाहीमध्ये विविध परिवर्तनेदेखील झालेली आहेत, म्हणून लोकशाही ही एक गतिमान स्वरूपाची संकल्पना आहे. त्यामुळे लोकशाहीविषयी विविध दृष्टिकोन किंवा मतमतांतरे निर्माण झालेली आहेत. प्रत्येक विचारसरणीने स्वतःला अनुसरून लोकशाहीचे स्पष्टीकरण केलेले आहे. त्यामुळे उदारमतवादी विचारप्रणाली, मार्क्सवादी विचारप्रणाली यांच्या लोकशाहीसंबंधीच्या संकल्पना भिन्न-भिन्न स्वरूपाच्या आहेत. लोकशाहीची संकल्पना ही केवळ राजकीय व्यवस्थेशी संबंधित नसून सामाजिक आणि आर्थिक व्यवस्थेचादेखील त्यामध्ये समावेश करण्यात आलेला आहे. म्हणूनच लास्की या विचारवंताने म्हटलेले आहे की," आर्थिक क्षेत्रात लोकशाही नसेल तर राजकीय लोकशाहीला

काहीच अर्थ उरत नाही." म्हणून समाजामध्ये आर्थिक आणि सामाजिक क्षेत्रात जोपर्यंत विषमता कायम आहे, तोपर्यंत लोकशाही व्यवस्था भक्कम होऊ शकणार नाही.

आधुनिक काळात कल्याणकारी राज्याच्या स्वरूपामुळे लोकशाहीला अधिकच महत्त्व प्राप्त झालेले आहे. त्याचप्रमाणे लोकशाही प्रक्रियेच्या माध्यमातून राष्ट्रीय स्तरावरील तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रश्न किंवा समस्यांचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न केला जाणे, हे लोकशाहीच्या यशाचे गमक असल्याचे सिद्ध होते. लोकशाही एक राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि नैतिक व्यवस्था असल्याचे स्पष्ट होते. लोकशाहीच्या विविध अर्थावरून आधुनिक काळात लोकशाहीचे वेगवेगळे प्रकार दिसून येतात, परंतु असे असले तरी लोकशाहीच्या विविध स्वरूप वा प्रकारांमध्ये व्यक्तिवाद आणि उदारमतवाद यावर आधारित असणारी अभिजन लोकशाही ही सर्वमान्य झालेली असून तो एक सुयोग्य शासनप्रकार म्हणून त्याकडे पाहिले जाते. प्रस्तुत घटकांमध्ये लोकशाहीविषयीचे सिद्धांत, त्याचप्रमाणे उदारमतवादी लोकशाही ज्या तत्त्वांवर आधारित आहे, अशी तत्वे आणि लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी आवश्यक असणाऱ्या अटी किंवा आवश्यक परिस्थितीचा आढावा घेण्यात आलेला आहे.

## ३.१ लोकशाहीचे सिद्धांत (Theory's of Democracy):-

राज्यशास्त्र विषयामध्ये लोकशाही या शासनप्रकाराला आधुनिक काळात महत्त्व प्राप्त झालेले आहे. लोकशाहीचे पुढील सिद्धांत आहेत;

१ ) लोकशाहीचा अभिजनवादी/ श्रेष्ठिजनवादी सिद्धांत

२) लोकशाहीचा मार्क्सवादी सिद्धांत

### ३.१.१ लोकशाहीचा अभिजनवादी/ श्रेष्ठिजनवादी सिद्धांत (Elite Theory of Democracy):-

राज्यशास्त्रामध्ये 'श्रेष्ठिजन' किंवा 'अभिजन' ही संकल्पना समाजशास्त्रामधून स्विकारण्यात आलेली आहे. समाजशास्त्रामध्ये समाजाचा अभ्यास करत असताना काही निवडक घटकांना 'श्रेष्ठिजन' म्हटले जाते. समाजशास्त्रामध्ये विल्फ्रेड पॅरेटो, रॉबर्ट मिचेल्स, बर्नहॅम आणि गेटानो मोस्का या समाजशास्त्रीय विचारवंतांनी श्रेष्ठिजन दृष्टिकोन मांडून कोणत्याही समाजात किंवा शासनप्रकारामध्ये अल्पसंख्य असणाऱ्या श्रेष्ठिजनांच्या हाती संपूर्ण सत्ता आणि सत्तेच्या नियंत्रणाची साधने असतात, हे स्पष्ट केलेले आहे. राज्यशास्त्रामध्ये आधुनिक काळात 'श्रेष्ठीजन' हा दृष्टिकोन महत्त्वाचा मानला जातो.

जोसेफ शुम्पीटरने लोकशाहीचा अभिजनवादी किंवा श्रेष्ठिजनवादी सिद्धांत प्रतिपादन केलेला आहे. जोसेफ यांनी श्रेष्ठीजन किंवा अभिजन या समाजशास्त्रीय संकल्पनेच्या माध्यमातून लोकशाहीच्या अभिजनवादी किंवा श्रेष्ठिजनवादी सिद्धांताची मांडणी केली. लोकशाहीच्या या सिद्धांतानुसार लोकशाहीत सामान्य नागरिकांनी विशिष्ट कालावधीनंतर आपले प्रतिनिधी निवडून देणे अपेक्षित आहे. सामान्य नागरिकांची भूमिका ही फक्त आपले प्रतिनिधी निवडून देण्यापुरतीच मर्यादित असणे, हे जोसेफ यांच्या लोकशाहीच्या अभिजनवादी सिद्धांतात अपेक्षित आहे. थोडक्यात लोकशाहीच्या या सिद्धांतानुसार सामान्य जनतेची भूमिका ही

प्रतिनिधी निवडून देण्याव्यतिरिक्त अधिक सक्रिय नसावी, असे मत जोसेफ शुम्पीटर यांनी मांडलेले आहे. सामान्य जनतेने आपले प्रतिनिधी मतदानाद्वारे निवडून दिल्यानंतर अधिक सक्रिय न राहता राज्यकारभार चालविण्याचे आणि राज्याचे धोरण ठरविण्याचे कार्य निवडून दिलेल्या श्रेष्ठिजणांवर सोपवून द्यावे, हे लोकशाहीच्या या सिद्धांतात अपेक्षित आहे. जोसेफ शुम्पीटर यांच्या मते, लोकशाहीतील राज्यकारभार चालविण्यात तसेच शासनाचे ध्येयधोरण ठरविण्यात श्रेष्ठिजन पात्र असतात, म्हणून सामान्य नागरिकांनी त्यांच्यावर हे काम सोपवले पाहिजे. कारण लोकशाही हे केवळ एक मूल्य नसून शासन चालविण्याची ही एक पद्धत आहे, त्यामुळे ही पद्धत सामान्य नागरिकांना झेपणार नाही, या अर्थाने लोकशाहीतील राज्यकारभाराचे नेतृत्व श्रेष्ठिजणांनी करावे. लोकशाहीच्या श्रेष्ठिजनवादी सिद्धांतानुसार सामान्य नागरिकांनी राज्यकर्ते निवडून देणे हाच लोकशाहीचा खरा अर्थ जोसेफ शुम्पीटर यांना अपेक्षित आहे. थोडक्यात लोकशाहीच्या श्रेष्ठिजनवादी सिद्धांतानुसार लोकशाहीतील सत्ता ही श्रेष्ठिजनांच्या हाती केंद्रित झालेली असते, हेच लोकशाहीच्या दृष्टीने श्रेष्ठिजनवादी सिद्धांताचे केंद्रीभूत तत्व आहे. लोकशाहीच नव्हे, तर शासनाचा कोणताही प्रकार असला तरीदेखील सत्तेची सूत्रे आणि नियंत्रण हे श्रेष्ठिजणांच्या हातीच केंद्रित झालेले असते, हे जोसेफ शुम्पीटर यांनी अधोरेखित केलेले आहे. अशाप्रकारे जोसेफ शुम्पीटर यांनी लोकशाहीचा आधुनिक काळात अस्तित्वात असणारा अभिजनवादी किंवा श्रेष्ठिजनवादी सिद्धांत स्पष्ट केलेला आहे.

लोकशाहीच्या अभिजनवादी किंवा श्रेष्ठिजनवादी सिद्धांताच्या समर्थकांनी या सिद्धांताचे समर्थन करतांना खालील मुद्दे मांडलेले आहेत;

**१ ) जनतेचा निरुत्साह:-**

लोकशाही शासनपद्धतीमध्ये सर्वसामान्य जनतेला शासनकारभारात विशेष आवड नसते तसेच शासनकारभारात सहभाग घेण्यासाठीची आवश्यक पात्रता आणि कौशल्यदेखील त्यांच्याजवळ नसतात. त्यामुळे लोकशाहीतील राज्यकारभाराचा गाडा सर्व लोक व्यवस्थित पद्धतीने चालवू शकत नाहीत, म्हणून ज्या लोकांकडे राज्यकारभार चालवण्याची पात्रता आणि कौशल्य आहे, तसेच ज्यांना राज्यकारभारात विशेष आवड आहे, अशा निवडक लोकांनीच म्हणजेच श्रेष्ठिजनांनी लोकशाहीमध्ये शासनाचे नेतृत्व करावे. कारण लोकशाही शासनप्रकारांमध्ये सर्व निर्णय सर्व लोकांनी घ्यावेत किंवा शासनाच्या सर्वच पातळ्यांवर सर्व लोकांचा सहभाग असावा, असे अपेक्षित नसते.

**२) तज्ञ लोकांची गरज:-**

आधुनिक काळात कल्याणकारी राज्याचा स्विकार करण्यात आल्यामुळे शासनव्यवस्थेच्या कार्याचा व्याप मोठ्या प्रमाणात वाढलेला आहे. त्याचप्रमाणे शासन यंत्रणेचे स्वरूप अधिक गुंतागुंतीचे बनलेले आहे. पर्यायाने लोकशाहीत शासनाचे नेतृत्व करत असताना राज्यकारभारासंदर्भात विविध प्रकारचे निर्णय घेण्यासाठी तज्ञ लोकांची गरज असते आणि असे तज्ञ लोक श्रेष्ठिजन वर्गामध्ये असतात, म्हणून लोकशाहीमध्ये श्रेष्ठिजनानी शासनाचे नेतृत्व करणे आवश्यक आहे. कारण श्रेष्ठिजणांमध्ये शासनाचे नेतृत्व करण्याची पात्रता आणि कौशल्य असतात.

### ३) राज्यकर्त्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी:-

लोकशाही किंवा शासनाच्या कोणत्याही प्रकारामध्ये राज्यकर्त्यांवर नियंत्रण ठेवणे आवश्यक असते. लोकशाहीमध्ये सर्वसामान्य जनता राज्यकर्त्यांवर प्रभावी नियंत्रण ठेवू शकत नाही, कारण सर्वसामान्य जनतेजवळ शासनावर नियंत्रण ठेवण्यासाठी वेळ तसेच कौशल्य नसते. तसेच सर्वसामान्य नागरिकांची देशातील सामाजिक, राजकीय, आर्थिक व इतर प्रश्नाविषयी प्रगल्भता नसते, त्यामुळे राज्यकर्त्यांवर ते प्रभावीपणे नियंत्रण ठेवू शकत नाहीत. पर्यायाने राज्यकर्त्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी वेळ, प्रगल्भता आणि ज्ञान असणारा श्रेष्ठिजन वर्ग आवश्यक असतो.

### ४) सामान्य जनतेची निष्क्रियता:-

सर्वसामान्य जनता ही सर्वसाधारणपणे राजकीयदृष्ट्या सक्रिय नसते. अशा निष्क्रिय जनतेकडे विशेष अशी कोणतीही भूमिका देखील नसते. लोकशाहीमधील दोन निवडणुकीच्या दरम्यानच्या काळात सर्वसामान्य जनता निष्क्रिय झालेली असते. म्हणून सामान्य जनतेमधील निष्क्रियतेच्या पार्श्वभूमीवर लोकशाहीमध्ये सक्रिय असणाऱ्या निवडक श्रेष्ठिजनांची भूमिका महत्त्वाची ठरते.

अशाप्रकारे लोकशाहीच्या अभिजनवादी किंवा श्रेष्ठिजनवादी सिद्धांताचे समर्थन करण्यात येते.

## ३.१.१.१ अभिजनवादी लोकशाहीची ठळक वैशिष्ट्ये:-

जोसेफ शुम्पीटर यांनी मांडलेल्या लोकशाहीच्या अभिजनवादी किंवा श्रेष्ठिजनवादी सिद्धांतानुसार या लोकशाहीची पुढील ठळक वैशिष्ट्ये दिसून येतात;

### १ ) श्रेष्ठिजणांचे नियंत्रण:-

श्रेष्ठिजनवादी लोकशाहीच्या सिद्धांतानुसार लोकशाहीमध्ये सर्व लोकांमध्ये शासनाचे नेतृत्व करण्याची पात्रता किंवा कौशल्य नसते, म्हणून ज्या लोकांकडे शासनाचे नेतृत्व करण्याची पात्रता आणि कौशल्य आहे, अशा निवडक लोकांच्या हाती शासनाचे नियंत्रण करण्याची क्षमता असते. त्यामुळे लोकशाहीच्या अभिजनवादी सिद्धांतानुसार लोकशाहीत श्रेष्ठिजनांचे नियंत्रण असते.

### २) श्रेष्ठीजणांची निवड करण्याचा जनतेला अधिकार:-

लोकशाहीच्या अभिजनवादी सिद्धांतानुसार लोकशाहीमध्ये जनतेला पात्रतेनुसार मतदानाचा अधिकार प्राप्त झालेला असतो. या अधिकारानुसार सर्वसामान्य जनतेला श्रेष्ठिजणांची निवड करण्याचा अधिकार प्राप्त झालेला आहे. कारण लोकशाहीत ठराविक कालावधीनंतर सामान्य नागरिक आपले प्रतिनिधी मतदानाद्वारे निवडून देत असतात. सामान्य नागरिकांनी मतदानाद्वारे निवडून दिलेल्या श्रेष्ठिजणांकडून लोकशाहीत नेतृत्व केले जाते.

**३) जनतेच्या सहभागाला सैद्धांतिक पातळीवर मान्यता:-**

लोकशाहीच्या अभिजनवादी सिद्धांतानुसार सर्वसामान्य जनतेच्या राजकीय सहभागाला सैद्धांतिक पातळीवर मान्यता दिलेली असते. यानुसार सर्वसामान्य जनता मतदानाद्वारे आपले प्रतिनिधी निवडून देत असते. सैद्धांतिक पातळीवर जनतेच्या राजकीय सहभागाला मान्यता देण्यात आलेली असली तरी, या अभिजनवादी लोकशाहीमध्ये मात्र व्यावहारिक पातळीवर सर्वसामान्य जनतेला राजकीय सहभाग घेण्यास फारशी संधी नसते.

### ३.१.२ लोकशाहीचा मार्क्सवादी सिद्धांत (Marxist Theory of Democracy):-

लोकशाहीच्या सिद्धांतापैकी लोकशाहीचा मार्क्सवादी सिद्धांत हा एक महत्त्वपूर्ण सिद्धांत मानला जातो. लोकशाहीच्या मार्क्सवादी सिद्धांतामध्ये लोकशाहीच्या अभिजनवादी किंवा उदारमतवादी सिद्धांतावर टीका केलेली आहे. कारण अभिजनवादी किंवा उदारमतवादी लोकशाहीतील भांडवलशाही व्यवस्था बहुसंख्य असणाऱ्या गरीब, कामगार वर्गावर नियंत्रण ठेवत असते. तसेच उदारमतवादी लोकशाहीमध्ये घेण्यात येणारे निर्णय हे सर्वसामान्य कामगारांच्या हिताचे नसतात, मात्र येथे घेण्यात येणारे निर्णय हे भांडवलदार वर्गाच्या हितासाठीच घेतले जातात. उदारमतवादी लोकशाहीमध्ये राजकीय सत्तेचा वापर सर्वसामान्य लोकांच्या हितासाठी केला जात नाही, याउलट या लोकशाहीमध्ये भांडवलदार वर्गाच्या हितासाठीच सत्तेचा वापर केला जात असल्यामुळे अशा लोकशाहीला कार्लमार्क्सने ब्रुजवा लोकशाही असे म्हटलेले आहे. म्हणूनच कालमार्क्स यांच्या मते, उदारमतवादी लोकशाहीमधील कार्यकारी मंडळ म्हणजे भांडवलदार वर्गाचे हीत जपणारी एक समिती आहे. थोडक्यात लोकशाहीच्या उदारमतवादी किंवा अभिजनवादी सिद्धांतामध्ये लोकशाहीची प्रक्रिया आणि लोकशाहीतील विविध संस्थांना प्राधान्य देऊन विश्लेषण करण्यात आलेले आहे, परंतु लोकशाहीच्या मार्क्सवादी सिद्धांतानुसार विश्लेषण करत असताना समाजातील वर्गरचना केंद्रीभूत मानण्यात आलेली आहे.

लोकशाहीच्या मार्क्सवादी सिद्धांतानुसार समाजामध्ये असणाऱ्या आर्थिक विषमतेमुळे अभिजनवादी हा शासनाचा प्रकार उपयुक्त ठरत नाही. कारण आर्थिक विषमतेमुळे केवळ श्रीमंत वर्गाच्या हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी राजकीय सत्तेचा वापर भांडवलदार वर्गाकडून केला जातो. आर्थिकदृष्ट्या संपन्न असणाऱ्या वर्गाच्या हाती राजकीय व्यवस्था आणि पूर्ण यंत्रणा कार्यरत असते. प्रचलित उदारमतवादी लोकशाहीमध्ये योग्यतेचा आणि क्षमतेचा विचार न करता राजकीय सत्ता आणि राजकीय प्रभावाचा वापर श्रेष्ठिजन नेते मंडळीकडून केला जातो, त्यामुळे सर्वसामान्यांच्या हिताचा विचार येथे केला जात नाही. आर्थिक आणि सामाजिक विषमतेमधून प्रचलित लोकशाहीमध्ये या व्यक्ती सत्ताधारी होत असतात आणि अशा सत्ताधारी बनलेल्या व्यक्ती लवकरच महत्त्वकांक्षी बनून आपल्या अनुयायांकडे म्हणजेच सामान्यांच्या हिताकडे दुर्लक्ष करण्याचा धोका असतो. म्हणून कार्लमार्क्स आणि मार्क्सवादी विचारसरणीच्या समर्थकांनी लोकशाहीच्या मार्क्सवादी सिद्धांताची मांडणी केलेली आहे. लोकशाहीच्या या मार्क्सवादी सिद्धांतानुसार सर्वसामान्यांच्या हिताचा विचार करण्यात आलेला आहे.

लोकशाहीच्या मार्क्सवादी सिद्धांताच्या समर्थकांच्या मते, लोकशाही आणि भांडवलशाही हे कधीच एकत्र राहू शकत नाहीत. कारण भांडवलशाहीमध्ये असणाऱ्या दोषांमुळे लोकशाहीची मूल्य प्रत्यक्षपणे अंमलात आणली जात नाहीत. लोकशाहीच्या मार्क्सवादी सिद्धांतात मार्क्सवादीनी लोकशाहीचे समर्थन करतांना आणि अभिजनवादी लोकशाहीवर टीका करताना खालील महत्वपूर्ण मुद्दे स्पष्ट केलेले आहेत;

**१ ) भांडवलदार वर्गाच्या हितासाठी अभिजनवादी लोकशाही:-**

मार्क्सवादी तत्वज्ञानानुसार समाजामधील श्रीमंतांचा वर्ग ज्याला कालमार्क्सने 'आहे रे' वर्ग असे म्हटलेले आहे, तर गरिबांचा जो वर्ग असतो त्याला कार्लमार्क्सने 'नाही रे' वर्ग असे म्हटलेले आहे. समाजातील श्रीमंत वर्गाकडे अधिकाधिक संपत्ती आणि उत्पादनाची साधने एकवटलेली असतात. याउलट गरिबांकडे उत्पादनाची साधने नसल्यामुळे त्यांना आपल्या उपजीविकेसाठी 'आहे रे' वर्गावर अवलंबून राहावे लागते. आपल्याकडील आर्थिक ताकदीमुळे 'आहे रे' वर्ग संख्येने अल्पसंख्यांक असला तरीदेखील समाजातील बहुसंख्यांकावर आपली सत्ता गाजवत असतो. थोडक्यात मार्क्सवादातील तत्वज्ञानानुसार खाजगी संपत्ती आणि उत्पादनाच्या साधनांवरील मालकी हक्कामुळे समाजात 'आहे रे' आणि 'नाही रे' असे परस्परविरोधी हितसंबंध असणारे दोन वर्ग तयार होतात. समाजात 'आहे रे' वर्गाचे वर्चस्व जास्त असल्यामुळे निवडणुकीचे निकाल या वर्गाच्या मतानुसार किंवा हितानुसार लागतात. त्यामुळे लोकशाही जनतेचे किंवा बहुमताचे शासन असते, हे केवळ थोतांड आहे, असे कार्लमार्क्स म्हणतो. त्यामुळे अशा बहुमताच्या उदारमतवादी किंवा अभिजनवादी लोकशाहीऐवजी पीपल्स डेमोक्रॅटिक रिपब्लिक हा लोकशाहीचा प्रकार अस्तित्वात आणल्यास लोकशाहीमध्ये खऱ्या अर्थाने बहुसंख्य लोकांना राजकीय प्रक्रियेत सहभागी होता येईल, असे लोकशाहीच्या मार्क्सवादी सिद्धांतात स्पष्ट केलेले आहे. थोडक्यात लोकशाहीच्या मार्क्सवादी सिद्धांतानुसार अभिजनवादी किंवा उदारमतवादी लोकशाही ही फक्त भांडवलदार वर्गाच्या हितासाठीच कार्य करते.

**२) उदारमतवादी किंवा अभिजनवादी लोकशाहीमुळे समाजात आर्थिक विषमता:-**

लोकशाहीच्या मार्क्सवादी सिद्धांतानुसार उदारमतवादी किंवा अभिजनवादी लोकशाहीमध्ये जनतेला प्राप्त झालेला सार्वत्रिक मताधिकार, विशिष्ट कालखंडानंतर होणाऱ्या निवडणुका, विचार आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य या बाबी जरी महत्त्वाच्या असल्या तरीदेखील यामधून सर्वसामान्यांच्या हितासाठी कार्य करणारी कोणतीही आर्थिक यंत्रणा निर्माण होत नाही किंवा आर्थिक समता निर्माण होत नाही. याउलट अभिजनवादी लोकशाहीमधून श्रीमंतांचा 'आहे रे' वर्ग आणि गरिबांचा 'नाही रे' वर्ग निर्माण होऊन समाजात प्रचंड आर्थिक विषमता निर्माण होते.

**३) अभिजनवादी किंवा उदारमतवादी लोकशाहीने चुकीच्या आणि आदर्शवादी संकल्पना निर्माण केलेल्या आहेत:-**

लोकशाहीच्या अभिजनवादी किंवा उदारमतवादी सिद्धांतानुसार लोकशाहीत प्रातिनिधिक स्वरूपाच्या राजकीय संस्था, त्यांचे राजकीय अधिकार आणि समतेच्या

संदर्भात लोकशाही प्रक्रियेचा विचार केला जातो. या प्रक्रियेमध्ये गरीब आणि श्रीमंत या दोघांचाही सहभाग असतो, परंतु लोकशाहीच्या मार्क्सवादी सिद्धांतानुसार समाजातील गरिबांना जरी मतदान करण्याचा अधिकार असला तरीदेखील राजकीय प्रक्रियेमध्ये त्यांना समान स्वरूपाचा वाटा किंवा सहभाग मिळत नाही. कारण जो वर्ग प्रभावशाली वा प्रतिष्ठित असतो, तोच वर्ग सत्तेतील जास्तीत-जास्त वाटा आपल्या पदरात पाडून घेण्याचा प्रयत्न करतो आणि असा 'आहे रे' वर्ग सत्ताधारी बनतो. म्हणजेच लोकशाहीत बहुसंख्याकांच्या नावाखाली अल्पसंख्यांकांची सत्ता निर्माण होते. त्यामुळे लोकशाहीतील बहुसंख्यांकांचे शासन ही संकल्पना चुकीची आणि केवळ आदर्शवादी संकल्पना ठरते, असे मार्क्सवादी तत्त्वज्ञानामध्ये स्पष्ट केलेले आहे.

**४) 'नाही रे' वर्गाच्या हुकूमशाहीतुन लोकशाहीची निर्मिती:-**

लोकशाहीच्या मार्क्सवादी सिद्धांतानुसार काही काळ निर्माण होणाऱ्या 'नाही रे' वर्गाच्या हुकूमशाहीमुळे 'नाहि रे' वर्गावर असणारे 'आहे रे' वर्गाचे वर्चस्व तसेच नियंत्रण समाप्त होईल. तसेच समाजात 'नाही रे' या बहुसंख्य वर्गाचे वर्चस्व प्रस्थापित होईल. 'नाही रे' वर्गाच्या हुकुमशाहीच्या कालावधीमध्ये समाजात संपत्तीचे समान वितरण करणे शक्य होईल. अशा समाजव्यवस्थेत कोणीही वंचित राहणार नाही, कोणीही श्रेष्ठ किंवा कनिष्ठ राहणार नाही. म्हणून लोकशाहीचा हा प्रकार सर्वश्रेष्ठ आहे, असे लोकशाहीच्या मार्क्सवादी सिद्धांतामध्ये स्पष्ट केलेले आहे.

**५) 'नाही रे' वर्गाची हुकूमशाही केवळ संक्रमण काळापुरती:-**

लोकशाहीच्या मार्क्सवादी सिद्धांतानुसार भांडवलशाही समाजव्यवस्थेच्या समाप्तीनंतर समाजवादी समाजरचना निर्माण होईपर्यंतचा काळ हा 'संक्रमण काळ' असेल. कामगार वर्गाची अर्थात 'नाही रे' वर्गाची हुकुमशाही केवळ संक्रमण काळापुरतीच मर्यादित असेल. या संक्रमण काळात उत्पादनाची साधने आणि संपत्तीचे समान वितरण करण्यात येईल. प्रत्येकाच्या गरजा पूर्ण होईल अशी व्यवस्था, प्रत्येकाच्या हाताला काम आणि सामाजिक प्रक्रियेमध्ये प्रत्येकाला सहभागी होण्याची समान संधी देण्याच्या दिशेने प्रयत्न केले जातील. अशाप्रकारच्या प्रयत्नानंतर समाजवादी समाजरचना अस्तित्वात येईल की, ज्या समाजरचनेमध्ये वर्ग, वर्गसंघर्ष, खाजगी संपत्ती असणार नाही. अशा समाजव्यवस्थेत कोणीही कोणाचे शोषण करणार नाही, अर्थात शोषण पूर्णपणे समाप्त होईल. अशाप्रकारे निर्माण झालेल्या समाजवादी समाजरचनेत वर्गविरहित व शोषणविरहित व्यवस्था निर्माण होईल, हीच खऱ्या अर्थाने लोकशाही असेल, असे कार्लमार्क्स यांनी लोकशाहीवादी सिद्धांतात स्पष्ट केलेले आहे. निर्माण झालेल्या समाजवादी समाजरचनेत वर्ग आणि शोषण नष्ट झाल्यामुळे शासन यंत्रणेची किंवा राज्याची गरज उरणार नसल्यामुळे हळूहळू राज्य विलयास जाईल, असेही शेवटी कालमार्क्स यांनी या सिद्धांतात स्पष्ट केलेले आहे.

**सारांश:-**

लोकशाहीच्या अभिजनवादी किंवा श्रेष्ठिजनवादी सिद्धांतानुसार आधुनिक काळातील गुंतागुंतीच्या झालेल्या शासनयंत्रणेचे नेतृत्व करण्यासाठी किंवा निर्णय घेण्यासाठी तज्ञ

लोकांची गरज असते आणि असे तज्ञ अभिजन वर्गामध्ये असतात. त्याचप्रमाणे लोकशाहीत सहभाग घेणारे सर्वसामान्य नागरिक राज्यकर्त्यांवर नियंत्रण ठेवू शकत नाहीत. त्याचप्रमाणे सामान्य लोकांकडे राज्यकर्त्यांवर नियंत्रण ठेवण्याची पात्रता, कौशल्य, प्रगल्भता आणि वेळही नसतो, त्यामुळे हे कार्य समाजातील अभिजन करू शकतात. अभिजनांची निवड करण्याचा सामान्य लोकांचा अधिकार, अभिजनांचे शासनावर नियंत्रण आणि केवळ सैद्धांतिक पातळीवर जनसहभागाला मान्यता ही अभिजनवादी लोकशाही सिद्धांताची काही ठळक वैशिष्ट्ये आहेत.

लोकशाहीच्या मार्क्सवादी सिद्धांताची मांडणी करून लोकशाहीच्या अभिजनवादी सिद्धांतावर प्रचंड टीका केलेली आहे. लोकशाहीच्या मार्क्सवादी सिद्धांतानुसार अभिजनवादी लोकशाही ही केवळ भांडवलदारांसाठी किंवा श्रीमंतांसाठी असणारी लोकशाही आहे. ही लोकशाही फक्त भांडवलदार वर्गाच्या हितासाठीच कार्य करते. या लोकशाहीमध्ये सर्वसामान्यांच्या हिताचा विचार केला जात नाही. लोकशाहीच्या मार्क्सवादी सिद्धांतानुसार भांडवलवाद आणि लोकशाही एकत्र राहू शकत नाही. भांडवलवादामध्ये अंतर्भूत असणाऱ्या अंगभूत दोषांमुळे लोकशाहीची मूल्य कधीही प्रत्यक्षात आणता येत नाहीत.

**आपली प्रगती तपासा.**

१ ) लोकशाहीचा अभिजनवादी सिद्धांत स्पष्ट करा.

२) लोकशाहीचा मार्क्सवादी सिद्धांत सविस्तर लिहा.

३) लोकशाहीच्या अभिजनवादी सिद्धांताची वैशिष्ट्ये थोडक्यात स्पष्ट करा.

## ३.२ उदारमतवादी लोकशाहीची तत्वे (Principles of Liberal Democracy):-

लोकशाही ही एक केवळ शासनपद्धती नसून, ती एक जीवनपद्धती तसेच एक व्यापक संकल्पना आहे. उदारमतवादी विचारसरणीनुसार लोकशाहीची व्यापक संकल्पना प्रत्यक्षपणे अंमलात आणण्यासाठी संपूर्ण समाज, राज्य आणि लोकशाहीची मूल्य यांचा ताळमेळ घालणे आवश्यक असते. त्यासाठी या उदारमतवादी लोकशाहीची काही आधारभूत तत्त्वे महत्त्वपूर्ण ठरतात. उदारमतवादी लोकशाहीच्या या आधारभूत तत्त्वामुळे राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि नैतिक स्वरुपाची एक परिपूर्ण लोकशाही निर्माण होण्यास मदत होत असते. उदारमतवादी लोकशाहीची काही आधारभूत तत्वे पुढीलप्रमाणे आहेत;

### १) स्वातंत्र्य:-

स्वातंत्र्य हे उदारमतवादी लोकशाहीचे एक महत्त्वपूर्ण आधारभूत तत्त्व आणि मुल्य असल्यामुळे लोकशाहीत प्रत्येक व्यक्तीला स्वतंत्र मानले जाते. उदारमतवादी लोकशाहीत व्यक्तिस्वातंत्र्याला महत्त्वपूर्ण स्थान आहे. यामध्ये व्यक्तीच्या विचार, उच्चार, कृती, अभिव्यक्ती आणि मत स्वातंत्र्याचा समावेश होतो. उदारमतवादी लोकशाहीत नागरिकांना प्राप्त झालेल्या मतदान स्वातंत्र्यामुळे नागरिक आपल्या इच्छा आणि पसंतीनुसार शासनाची नियुक्ती तसेच शासनाची गच्छंती करू शकतात. थोडक्यात उदारमतवादी लोकशाहीमध्ये स्वातंत्र्याच्या तत्त्वामुळे कट-कारस्थान, क्रांती न करता शांततामय मार्गाने परिवर्तन करणे शक्य होते. नागरिकांना प्राप्त असणाऱ्या कृती स्वातंत्र्यामुळे शासनाच्या धोरणास विरोध दर्शविण्यासाठी राजकीय संघटन, प्रचार, घेराव, संप, मोर्चा, निदर्शने, निवेदन इत्यादी मार्गांचा अवलंब नागरिकांकडून केला जातो.

### २) समता:-

उदारमतवादी लोकशाहीमध्ये स्वातंत्र्य या तत्वानंतर दुसरे महत्वाचे तत्व समता हे आहे. कारण लोकशाहीत प्रत्येक व्यक्तीला समान मानले जाते. प्रत्येक व्यक्तीला शासनामध्ये सहभागी होण्याचा समान अधिकार तसेच स्वकर्तृत्वाच्या बळावर कोणतेही पद पात्रतेनुसार प्राप्त करून घेण्याचा समान अधिकार असतो. समाजामध्ये सर्वत्र विषमता असल्यास लोकशाही स्थिर होऊ शकणार नाही, म्हणून उदारमतवादी लोकशाहीमध्ये समता या तत्वाला महत्त्व प्राप्त झालेले आहे. समता या मूल्यांची प्रस्थापना करणे म्हणजे मानवनिर्मित विषमता दूर करून सर्व मानवांना समान प्रतिष्ठा, समान दर्जा आणि समान सामाजिक स्थान प्राप्त करून देणे होय. समता या तत्त्वामुळे सर्वांना विकासाची समान संधी प्राप्त करून दिली जाते, तसेच धर्म, जात, पंथ किंवा इतर कारणामुळे कोणालाही विकासाची समान संधी नाकारली जात नाही. समता या तत्त्वामुळे काहींना विशेष हक्क किंवा सवलती देणे लोकशाहीला अभिप्रेत नाही, परंतु समतेची प्रस्थापना करण्यासाठी ज्यांना दुर्बलतेमुळे भूतकाळात समान संधी नाकारली गेलेली आहे, अशा विशिष्ट घटकांना अग्रक्रमाने समता प्राप्त करून देण्यासाठी काही विशेष सवलती किंवा हक्क दिले जातात.

### ३) बंधुता:-

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते," बंधुभाव अस्तित्वात नसेल तर समता आणि स्वातंत्र्याच्या अस्तित्वाला काहीही अर्थ राहत नाही." म्हणून उदारमतवादी लोकशाहीचे एक महत्त्वाचे तत्त्व म्हणून बंधूतेकडे पाहिले जाते. नागरिकांमध्ये परस्पर प्रेम, सद्भाव, आदर आणि सहकार्य असणे लोकशाहीचा महत्त्वपूर्ण आधार मानला जातो. लोकशाहीत वंशवाद, वर्णवाद, भाषावाद, प्रांतवाद तसेच वर्गवाद निर्माण होऊ नये यासाठी बंधुता हे तत्व अत्यंत आवश्यक आहे.

### ४) जनतेचे सार्वभौमत्व:-

उदारमतवादी लोकशाहीची संकल्पना जनतेच्या सार्वभौमत्वाच्या तत्वावर आधारलेली आहे. जनतेचे सार्वभौमत्व म्हणजे जनता स्वतःच्या हक्क आणि स्वातंत्र्याविषयी पूर्णपणे जागृत असून जनतेवर कोणताही अनिष्ट वैचारिक प्रभाव पडत नाही. तसेच जनता व्यक्तीपूजा करीत नाही. कोणत्याही भ्रामक किंवा विषारी प्रचाराला बळी पडत नाही. तसेच जनता प्रत्येक घटनेचा वस्तुनिष्ठ आणि विवेकनिष्ठ पद्धतीने विचार करते. ब्रिटिश विचारवंत टि. एच. ग्रीन यांच्या मते," जनशक्ती हाच राज्याचा खरा आधार आहे." तसेच जीन जॅक रुसो यांच्या मते," सामूहिक ईहा हाच राज्याचा आधार आहे." ग्रीन आणि रुसो यांच्या वरील मतावरून स्पष्ट होते की, जनतेचा निर्णय किंवा इच्छा ही सर्वश्रेष्ठ किंवा अंतिम असते. जनतेची इच्छा म्हणजेच जनतेचे सार्वभौमत्व होय. सार्वभौम सत्तेच्या आधारावरच जनता शासन नियुक्त करत असते, तसेच शासनावर नियंत्रणदेखील ठेवत असते. त्यामुळे उदारमतवादी लोकशाहीमध्ये जनतेच्या इच्छेनुसार राज्यकर्त्यांना आणि शासनास आपले धोरण, कायदे, योजना किंवा निर्णय घ्यावे लागतात अथवा त्यामध्ये परिवर्तन करावे लागते.

### ५) बहुमताचे शासन:-

उदारमतवादी लोकशाहीमध्ये बहुमताला महत्त्वाचे स्थान असते. कारण या लोकशाहीमध्ये घेण्यात येणारे निर्णय हे जनसंमतीने आणि बहुमताच्या आधारावरच घेतले जातात. लोकशाहीमध्ये सर्व लोक समान असले तसेच सर्व लोकांना समान अधिकार असले तरीदेखील लोकशाहीचे संचलन करीत असताना प्रत्येक वेळी सर्वांचे एकमत होऊ शकत नाही. त्यामुळे अशाप्रसंगी विशिष्ट प्रश्न किंवा समस्येच्या संदर्भामध्ये समाजातील बहुसंख्याकांनी जो कल दर्शविला असेल त्यानुसार निर्णय घेतला जातो. लोकशाहीत होणाऱ्या निवडणुकीमध्ये ज्या उमेदवारास बहुमत प्राप्त होते, त्यास बहुमताच्या आधारे विजयी म्हणून घोषित केले जाते. लोकशाहीमध्ये कायदा निर्मिती, मंत्रिमंडळातील निर्णय हे बहुमताच्या तत्वानुसार घेतले जातात. तसेच लोकशाहीमध्ये बहुमताने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी होत असते. लोकशाहीतील बहुमत याचा अर्थ केवळ निवडणुकीतील किंवा कायदेमंडळातील बहुमत असा होत नाही, तर सार्वजनिक क्षेत्रात प्रातिनिधिक स्वरूपाचे निर्णय घेत असताना शक्य असेल तर एकमत (Unanimity) किंवा मतैक्य (Consensus) आणि तेही शक्य नसल्यास बहुमत (Majority) या तत्वाचा अवलंब केला जातो.

### ६) अधिकार:-

उदारमतवादी लोकशाहीमध्ये प्रत्येक व्यक्तीला स्वइच्छा व अपेक्षेप्रमाणे सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि धार्मिक जीवन जगता यावे, यासाठी विविध प्रकारचे अधिकार देण्यात येतात. कारण लोकशाहीमध्ये अधिकार किंवा हक्क दिल्यामुळेच नागरिकांना त्यांच्या स्वातंत्र्याची हमी प्राप्त होते. लोकशाहीमध्ये जीविताचा अधिकार महत्त्वपूर्ण ठरतो. त्याचप्रमाणे प्रत्येक व्यक्तीला लोकशाहीमध्ये राजकीय सहभाग घेता यावा यासाठी काही राजकीय अधिकार देण्यात आलेले आहेत. उदा. मतदान करणे, निवडणूक लढवणे, सत्तापद भूषणे, शासनास विनंती करणे, शासनास विरोध करणे, राजकीय संघटना निर्माण करणे तसेच राजकीय पक्षाचा प्रचार करणे इत्यादी. लास्की यांच्या मते," सुदृढ लोकशाहीच्या निर्मितीसाठी नागरिकांना आर्थिक अधिकार मिळणे आवश्यक आहे." प्रत्येक व्यक्तीला किमान आर्थिक जीवनमानाचा, आर्थिक सुरक्षिततेचा, व्यवसाय किंवा रोजगार निवडीचा, किमान वेतन प्राप्त करण्याचा तसेच व्यवस्थापनात कामगारांना सहभागी होण्याचा आर्थिक अधिकार लोकशाहीमध्ये महत्त्वाचा मानला जातो. उदारमतवादी लोकशाहीमध्ये प्रत्येक नागरिकांना सामाजिक व नागरी जीवन जगता यावे यासाठी नागरी आणि सामाजिक अधिकार प्राप्त करून दिले जातात. उदारमतवादी लोकशाहीमध्ये विविध प्रकारचे अधिकार नागरिकांना देण्यात आलेले असले तरीदेखील अधिकारावर काही मर्यादा घालून देण्यात आलेल्या आहेत.

### ७) कायद्याचे राज्य:-

उदारमतवादी लोकशाहीचे संचलन हे राज्यघटना आणि कायद्यानुसार होत असते. त्यामुळे लोकशाही 'कायद्याचे राज्य' या संकल्पनेवर आधारीत कार्य करते. उदारमतवादी लोकशाहीमध्ये कोणत्याही एका व्यक्तीच्या किंवा गटाच्या मतानुसार किंवा लहरीपणानुसार निर्णय घेतले जात नाहीत. लोकशाहीत 'कायद्याचे राज्य' असल्यामुळे तेथे राज्यघटना आणि कायदा सर्वश्रेष्ठ असतो. लोकशाहीच्या सर्व घटक अंगांना किंवा सत्ता केंद्रांना राज्यघटनेने दिलेल्या अधिकारांच्या मर्यादेत कार्य सुरू असते.

लोकशाहीमध्ये नागरिकांच्या स्वातंत्र्य तसेच अधिकारांना संरक्षण प्राप्त करून दिले जाते. एखादी व्यक्ती, संस्था, गट किंवा सरकारकडून नागरिकांवर अन्याय होत असल्यास त्याविरोधात संबंधित व्यक्ती न्यायालयात दाद मागू शकते. थोडक्यात उदारमतवादी लोकशाही 'कायद्याचे राज्य' या तत्वावर आधारित आहे.

### ८) राजकीय जाणीव-जागृती:-

उदारमतवादी लोकशाहीमध्ये प्रत्येक नागरिक राजकीय बाबतीत जागरूक असणे अत्यंत आवश्यक मानले जाते. नागरिकांमध्ये असणारी राजकीय जाणीव-जागृती उदारमतवादी लोकशाहीचे महत्त्वाचा आधारभूत तत्व मानले जाते. कारण लोकशाहीमध्ये राज्यकारभार हा लोकमतानुसार चालत असतो. म्हणून लोकशाहीतील नागरिक आपल्या विविध प्रकारच्या समस्या, प्रश्न किंवा घटनांबाबत

जागृत असणे अत्यंत आवश्यक असते. लोकशाहीमध्ये क्रियाशील आणि राजकीय सहभाग येणाऱ्या नागरिकांना महत्त्वाचे स्थान असते. शासनाने नागरिक व समाजाच्या संदर्भात केलेल्या विधायक आणि कल्याणकारी धोरणाचे स्वागत करणे किंवा याउलट शासनाने एखादी कृती अन्यायकारकपणे केलेली असल्यास तिचा प्रतिकार करणे किंवा अन्यायकारक धोरण किंवा कायद्याचा विरोध करणे, हे जागृत नागरिकाचे लक्षण मानले जाते, परंतु त्यासाठी नागरिक राजकीयदृष्ट्या जागरूक असणे लोकशाहीमध्ये अत्यंत आवश्यक आहे. लॉर्ड ॲक्टन यांच्या मते," सतत जागृतता हे लोकशाहीचे मूल्य आहे." म्हणून उदारमतवादी लोकशाहीमध्ये नागरिकात राजकीय जाणीव-जागृती असणे अत्यंत आवश्यक आहे.

## ९) परमतसहिष्णुता:-

परमतसहिष्णुता हे उदारमतवादी लोकशाहीचे महत्त्वाचे आधारभूत तत्त्व आहे. उदारमतवादी लोकशाहीमध्ये व्यक्तिमत्व विकास, व्यक्तीस्वातंत्र्य, अधिकार यांना महत्त्वाचे स्थान असते. लोकशाहीत नागरिकांना प्राप्त असणाऱ्या विचार आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्यामुळे नागरिकांकडून भिन्न-भिन्न मतांची मांडणी होत असते, परंतु अशा परिस्थितीत प्रत्येक व्यक्तीचे विचार आणि मताची कदर करण्यासाठी परमत सहिष्णुता हे तत्व अत्यंत आवश्यक आहे. यातून लोकशाहीतील मतभिन्नता कमी करून मतैक्य साधण्याचा प्रयत्न केला जातो. प्रसिद्ध विचारवंत जे.एस. मिल यांच्या मते," बहुसंख्य लोकांना शासन करण्याचा लोकशाहीत जसा हक्क आहे, तसाच हक्क अल्पसंख्यांकांना आपले मत मांडण्याच्या यासंदर्भात हक्क आहे. तसे न केल्यास लोकशाहीला बहुसंख्याकांच्या दडपशाहीचे स्वरूप प्राप्त होईल." मिल यांच्या मतावरूनदेखील लोकशाहीमध्ये परमत सहिष्णुता अत्यंत आवश्यक असल्याचे स्पष्ट होते. कारण लोकशाहीत नागरिकांमध्ये असणारे मतभेद हे हिंसक मार्गाने नव्हे, तर अहिंसक, सहिष्णू आणि शांततामय मार्गाने दूर करणे आवश्यक आहे आणि त्यासाठी परमत सहिष्णुता गरजेची आहे. म्हणून उदारमतवादी लोकशाहीमध्ये शासक आणि शासित, सत्ताधारी आणि विरोधक, बहुसंख्यांक आणि अल्पसंख्यांक यांच्यामध्ये परस्पर विश्वास आणि परमत सहिष्णुता निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. थोडक्यात उदारमतवादी लोकशाही परमत सहिष्णुतेचा आधारावर कार्य करीत असते.

## १०) विवेकी व्यक्ती:-

विवेकी व्यक्ती हा उदारमतवादी लोकशाहीचा आधारभूत घटक आहे. विवेकी व्यक्तीमध्ये योग्य-अयोग्य, चांगले-वाईट, विधायक- विघातक यामधील फरक ओळखण्याची क्षमता असते किंवा त्याला या बाबींची जाणीव असते. त्याचप्रमाणे अशा विवेकी व्यक्तीला विविध सामाजिक आणि राष्ट्रीय समस्यांची तसेच त्यावर करण्यात येणाऱ्या विविध उपाययोजनांची जाणीव असते.

**११) विधायक विरोध:-**

उदारमतवादी लोकशाही विधायक विरोधाच्या तत्त्वानुसार कार्यरत असते. लोकशाही शासनव्यवस्थेतील जागृत नागरिक, वर्तमानपत्र आणि जबाबदार विरोधी पक्षांना सत्ताधारी पक्षाच्या शासनाच्या चुकीच्या धोरणाला विधायकपणे विरोध किंवा टीका करण्याचा अधिकार असतो. विधायकपणे करण्यात येणाऱ्या विरोधाची किंवा टीकेची दखल घेऊन शासनाला जनमतानुसार आपल्या धोरणात योग्य ते परिवर्तन करावे लागते. उदारमतवादी लोकशाहीमध्ये विधायक विरोधाच्या तत्त्वानुसार कार्य होत असल्यामुळे जबाबदार शासनपद्धती निर्माण होत असते.

**१२) लोकशाही संस्था:-**

उदारमतवादी लोकशाहीमध्ये जनता सार्वभौम असते. लोकशाहीमध्ये जनतेचे सार्वभौमत्व प्रस्थापित करण्यासाठी लोकशाही स्वरूपाच्या विविध संस्था निर्माण केल्या जातात. यामध्ये कायदेमंडळ, कार्यकारीमंडळ, न्यायमंडळ, निवडणूक यंत्रणा, राजकीय संघटना, स्थानिक स्वराज्य संस्था, प्रशासकीय यंत्रणा इत्यादी लोकशाही संस्थांचा समावेश असतो. उदारमतवादी लोकशाहीमध्ये या सर्व संस्था लोकशाहीच्या संकेतानुसार तसेच तत्त्वानुसार कार्य करीत असतात. त्याचप्रमाणे उदारमतवादी लोकशाहीमध्ये या लोकशाही संस्थांचे स्वरूप आणि अस्तित्व टिकविण्यासाठी प्रभावी जनमत, विरोधी पक्ष आणि जनसंचार माध्यमे प्रयत्नशील असतात.

**१३) न्याय:-**

'न्याय' हे उदारमतवादी लोकशाहीचे एक प्रमुख आधारभूत तत्त्व आहे. लोकशाहीत नागरिकांचे अधिकार आणि व्यक्तीस्वातंत्र्य यावर कोणीही अन्याय करणार नाही किंवा गदा आणणार नाही याची खबरदारी घेतली जाते. लोकशाही समाजव्यवस्थेत समाजातील कोणत्याही घटकावर अन्याय होणार नाही, यासाठी सर्व स्तरावरून प्रयत्न केले जातात. उदारमतवादी लोकशाहीमध्ये प्रत्येक नागरिकांना राजकीय, सामाजिक आणि आर्थिक न्यायाची हमी देण्यात आलेली आहे.

**१४) स्वतंत्र न्यायसंस्था:-**

उदारमतवादी लोकशाही 'न्याय' या तत्वावर आधारलेली असते, म्हणून न्याय हे तत्त्व लोकशाहीमध्ये महत्त्वपूर्ण मानले जाते. उदारमतवादी लोकशाहीमध्ये नागरिकांना देण्यात आलेले अधिकार आणि व्यक्तीस्वातंत्र्य यांना संरक्षण प्राप्त करून देण्यासाठी निरपेक्ष, नि:पक्षपाती, निर्भीड आणि स्वतंत्र न्यायसंस्थेची निर्मिती केली जाते. उदारमतवादी लोकशाहीमध्ये न्यायसंस्थेला जनता, कायदेमंडळ आणि कार्यकारीमंडळ यांच्या दबावापासून मुक्त ठेवून स्वतंत्रपणे कार्य करू दिले जाते. न्यायसंस्थेला स्वतंत्रपणे न्यायदान करता यावे, नागरिकांच्या हक्काचे संरक्षण आणि राज्यघटनेचे संरक्षण करता यावे, यासाठी स्वतंत्र न्यायसंस्थेची उभारणी केलेली आहे.

### १५) जबाबदार राजकीय पक्ष:-

उदारमतवादी लोकशाहीमध्ये जबाबदार राजकीय पक्षांचे अस्तित्व महत्त्वपूर्ण मानले जाते. कारण लोकशाही यशस्वी करण्यासाठी प्रत्येक राजकीय पक्ष जबाबदारीने वागणे आवश्यक असते. राजकीय पक्षाने पक्षीय स्वार्थापेक्षा राष्ट्रीय हिताला प्राधान्य देणे आवश्यक असते. म्हणून स्वार्थी राजकीय पक्षापेक्षा जबाबदार राजकीय पक्ष उदारमतवादी लोकशाहीमध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडत असतात. लोकशाहीमध्ये सत्ताधारी असणाऱ्या राजकीय पक्षाने विरोधी पक्षाला विश्वासात घेऊन राज्यकारभार करणे आवश्यक असते.

### १६) विकेंद्रीकरण आणि सत्ता विभाजन:-

उदारमतवादी लोकशाहीमध्ये सत्तेच्या विकेंद्रीकरणाचे तत्व अंगिकारले जाते. केंद्रीय स्तरापासून ते स्थानिक स्तरापर्यंत सत्तेचे विकेंद्रिकरण वेगवेगळ्या घटकांमध्ये केले जात असल्यामुळे सत्तेत समाजाच्या अंतिम घटकातील व्यक्तींना सहभाग घेता येतो. पर्यायाने जनसामान्यांना सत्तेत सहभाग घेण्याची संधी प्राप्त झाल्यामुळे लोकशाहीचा पाया भक्कम आणि विस्तृत होतो. सत्तेच्या विकेंद्रीकरणाबरोबरच उदारमतवादी लोकशाहीमध्ये सत्ता विभाजनाच्या तत्वाचाही स्विकार केला जातो. सत्ता विभाजनाचा तत्त्वानुसार शासनाच्या कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ यांची सत्ता एक व्यक्ती किंवा व्यक्ती समूहाच्या हाती केंद्रित न करता ती तीनही घटकांमध्ये विभागून दिली जाते. थोडक्यात लोकशाहीमध्ये विकेंद्रीकरण आणि सत्ता विभाजनाच्या तत्त्वामुळे नियंत्रण आणि समतोल निर्माण होऊन सत्तासमन्वयाचे तत्वदेखील स्विकारले जाते.

### १७) सार्वत्रिक प्रौढ मताधिकार आणि निवडणुकीचे सातत्य:-

सार्वत्रिक प्रौढ मताधिकार हे उदारमतवादी लोकशाहीचे एक महत्त्वाचे तत्त्व आहे. लोकशाहीमध्ये जनतेचा व्यापक सहभाग असावा त्यासाठी सर्व पात्र नागरिकांना सार्वत्रिक प्रौढ मताधिकार देण्यात आलेला आहे. धर्म, जात, पंथ, वर्ण, भाषा, संपत्ती, शिक्षण, लिंग असा कोणताही भेदभाव न करता वयोमर्यादेच्या पात्रतेनुसार सर्व नागरिकांना सार्वत्रिक प्रौढ मताधिकार दिल्यामुळे भारतीय लोकशाहीचा आधार अधिक व्यापक आणि भक्कम झालेला आहे. लोकशाहीमध्ये बदलत्या जनमतानुसार सत्ताधारी राजकीय पक्षामध्ये किंवा राजकीय नेतृत्वामध्ये शांततामय आणि सनदशीर मार्गाने वेळोवेळी बदल होत असतो. हा बदल विशिष्ट काळाने होणाऱ्या निवडणुकीच्या माध्यमातून केला जातो. लोकशाहीच्या स्थिरतेसाठी आणि यशस्वीतेसाठी ठराविक कालखंडानंतर मुक्त व न्याय वातावरणात निवडणुकांचे सातत्य असणे महत्त्वपूर्ण मानले जाते. उदा. भारत आणि इंग्लंडमध्ये दर पाच वर्षांनी सार्वत्रिक निवडणुका होतात, तर अमेरिकेमध्ये दर चार वर्षांनी सार्वत्रिक निवडणूक होत असते.

**१८) धोरण निर्धारकाचे लोकशाही नियंत्रण:-**

आधुनिक काळात राज्याचे कार्यक्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे राज्याच्या सत्ता आणि निर्णय क्षेत्रात सतत वाढ होत आहे. पर्यायाने राजकीय निर्णय घेणाऱ्या सर्व सत्ताकेंद्रांचे लोकशाही पद्धतीने नियंत्रण करणे आवश्यक आहे. उदारमतवादी लोकशाहीमध्ये संविधानाची श्रेष्ठता, समान प्रतिनिधित्व, स्वतंत्र न्यायसंस्था, निर्भय वर्तमानपत्रे, जबाबदार राजकीय पक्ष आणि जनमत, अभिव्यक्तिस्वातंत्र्य, गुप्त मतदान, विशिष्ट काळाने होणाऱ्या निवडणुका इत्यादी साधनाद्वारे शासनाचे धोरण निर्धारण करणाऱ्या सर्व सत्ता केंद्रांवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला जातो.

अशाप्रकारे उदारमतवादी लोकशाहीची ही काही ठळक आधारभूत तत्त्वे आहेत. या तत्त्वानुसार उदारमतवादी लोकशाहीची वाटचाल सुरू आहे.

**सारांश:-**

उदारमतवादी लोकशाही ही एक अतिव्यापक संकल्पना असून ती यशस्वीपणे अंमलात आणण्यासाठी काही आवश्यक तत्त्वांची अंमलबजावणी करणे आवश्यक असते. कारण त्याशिवाय राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि नैतिक स्वरूपाची परिपूर्ण लोकशाही निर्माण करणे शक्य नाही. म्हणून उदारमतवादी लोकशाहीची वाटचाल यशस्वीतेच्या दिशेने होण्यासाठी स्वातंत्र्य, समता, बंधुता, बहुमताचे शासन, नागरिकांमध्ये असणारी राजकीय जागृती, जनतेचे सार्वभौमत्व, जनतेला प्राप्त असणारे अधिकार, नागरिकांमधील राजकीय जागरूकता आणि जबाबदारपणा, लोकशाही संस्थांचे अस्तित्व, लोकशाहीतील विविधतेमध्ये असणारी परमत सहिष्णुता, सत्तेचे विकेंद्रीकरण आणि सत्ता विभाजन तसेच सत्ता संतुलन, धोरण निर्धारकाचे लोकशाही पद्धतीचे नियंत्रण, कायद्याचे राज्य, स्वतंत्र न्यायसंस्था, राष्ट्रहित जपणाऱ्या राजकीय पक्षांचे अस्तित्व, प्रौढ मताधिकाराची सार्वत्रिकता, निवडणुकीचे सातत्य आणि विधायकपणे केला जाणारा विरोध अत्यंत आवश्यक आहे.

**आपली प्रगती तपासा.**

१) उदारमतवादी लोकशाहीची तत्वे सविस्तर लिहा.

## ३.३ लोकशाहीच्या यशस्वी कार्यासाठी अटी/आवश्यक परिस्थिती (Condition for the successful working of Democracy):-

लोकशाहीचे अस्तित्व आणि यशापयश हे विशिष्ट परिस्थितीवर अवलंबून असते. आयव्हर ब्राऊन यांच्या मते," लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी जनतेच्या मनात लोकशाही भावना राहणे आवश्यक असते." थोडक्यात ब्राऊन यांच्या मतानुसार सुदृढ लोकशाहीच्या निर्मितीसाठी जनतेच्या मनात लोकशाही भावना असणे आवश्यक आहे. लोकशाही 'यथा प्रजा तथा राजा' या सिद्धांतावर आधारित असते. लोकशाहीमध्ये निर्माण झालेले दोष दूर करण्यासाठी आणि लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी आवश्यक परिस्थिती निर्माण करणे गरजेचे असते. राजकीय सामाजिकरणाच्या माध्यमातून लोकांमध्ये राजकीय जागृती घडवून आणल्यास लोकशाहीची यशस्विता साध्य करता येऊ शकते. त्याचप्रमाणे लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी लोकशाहीशी सुसंगत ठरणारी मानसिकता जनतेमध्ये निर्माण करणे आवश्यक असते. लोकशाहीच्या यशस्वितेसाठी आवश्यक असणाऱ्या काही अटी किंवा आवश्यक परिस्थिती पुढीलप्रमाणे आहे;

### १) न्यायमंडळाचे स्वातंत्र्य:-

लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी स्वतंत्र न्यायमंडळाची आवश्यकता असते. नागरिकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण, त्याचबरोबर संविधानाचे संरक्षण करण्याची जबाबदारी न्यायमंडळाची असते. याशिवाय शासनाच्या कार्यावर नियंत्रण ठेवण्याचे महत्त्वपूर्ण कार्यदेखील न्यायमंडळ करीत असते. तसेच देशातील विविध राजकीय पक्ष किंवा दबाव गटांच्या स्वार्थी कृतीपासून नागरिकांचे त्याचप्रमाणे संपूर्ण राष्ट्राचे हित सुरक्षित ठेवण्यासाठी न्यायमंडळाचे स्वातंत्र्य अत्यंत आवश्यक ठरते. म्हणून लोकशाहीच्या यशासाठी स्वतंत्र न्यायमंडळ गरजेचे आहे.

### २) शिक्षणाची व्यवस्था:-

लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी लोकशाहीत शिक्षणाची व्यापक व्यवस्था असणे आणि त्यातून प्रत्येक व्यक्तीला सुशिक्षित करणे आवश्यक असते. कारण नागरिक सुशिक्षित असतील तरच त्यांच्यामध्ये समाज व देशासमोरील विविध समस्या किंवा कार्याबाबत जागरुकता निर्माण झालेली असते. त्याचप्रमाणे लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी नागरिकांना त्यांच्या अधिकार आणि कर्तव्याची जाणीव निर्माण करून देणे आणि त्यांच्यात राजकीय सहभागाविषयी जागरूकता निर्माण करणे आवश्यक असते. त्याचबरोबर सुशिक्षित आणि जागरूक नागरिकच राष्ट्रासमोरील विविध प्रश्न किंवा समस्या समजू शकतात, मतदानाद्वारे योग्य प्रतिनिधींची निवड करू शकतात. त्याचप्रमाणे शासनावर योग्य पद्धतीने नियंत्रणदेखील ठेऊ शकतात, परंतु यासाठी प्रत्येक नागरिक सुशिक्षित असणे आणि असे नागरिक घडवण्यासाठी शिक्षणाची व्यापक व्यवस्था करणे आवश्यक आहे.

### ३) बंधुत्वाची भावना:-

बंधुत्व हे लोकशाहीचे एक मुख्य आधारभूत तत्त्व आहे. नागरिकांच्या विचारांमध्ये विविधता असली तसेच वेगवेगळ्या बाबतीमध्ये मतभेद असले तरीदेखील बंधुत्वाच्या

भावनेमुळे समाजाची एकात्मता टिकून राहते. बंधुत्वाचा भावनेमुळे 'आपण सर्व एक आहोत' ही भावना प्रत्येक व्यक्तीमध्ये निर्माण होते आणि यातून 'विविधतेमध्ये एकता' निर्माण होऊन लोकशाहीच्या यशासाठी आवश्यक परिस्थिती निर्माण होते.

**४) समता:-**

समता लोकशाहीचे एक महत्त्वाचे आधारभूत तत्त्व आहे. लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी केवळ राजकीय क्षेत्रात समता प्रस्थापित करून लोकशाही भक्कम होऊ शकणार नाही, तर त्यासाठी सामाजिक आणि आर्थिक क्षेत्रातदेखील समता निर्माण करणे आवश्यक आहे. आर्थिक विषमतेमुळे व्यक्ती स्वतःच्या मूलभूत गरजा पूर्ण करू शकत नाही. या गरजा पूर्ण करण्यातच त्या व्यक्तीची संपूर्ण शक्ती खर्च होते. त्यामुळे इच्छा असूनही अशी व्यक्ती राजकीय सहभाग घेऊ शकत नाही, पर्यायाने लोकशाही यशस्वी होऊ शकत नाही. सामाजिक समता प्रस्थापित करून लोकशाही यशस्वी करण्यासाठी विशेषाधिकार आणि नागरिकांमध्ये कृत्रिम भेदभाव नष्ट करणे आवश्यक आहे.

**५) परमत सहिष्णुता:-**

लोकशाही व्यवस्थेमध्ये व्यक्तिस्वातंत्र्य आणि अधिकार प्राप्तीमुळे प्रत्येक व्यक्ती स्वतंत्रपणे विचार व्यक्त करत असते. त्यामुळे विचारात विविधता आढळून येते. अशा परिस्थितीत स्वतःच्या मताचा आदर करीत असतांना इतरांनी व्यक्त केलेल्या मताचा आदर करण्याची सहिष्णू वृत्ती लोकशाहीच्या यशासाठी आवश्यक आहे. लोकशाहीमध्ये विविध धर्म, जाती, पंथ, भाषा, संप्रदाय, विचारप्रणाली यांचा स्विकार करणारी जनता सहजीवन व्यतीत करीत असते. लोकशाहीत बहुमताच्या तत्त्वामुळे बहुसंख्य आणि अल्पसंख्य अशा गटांमध्ये समाजाची विभागणी होत असते, म्हणून लोकशाहीतील अशा विविध समाज गटामध्ये शांतता आणि सलोखा राखण्यासाठी परमत सहिष्णुता विकसित होणे अत्यंत आवश्यक आहे.

**६) कृतिशील इच्छाशक्ती:-**

ब्राईस यांच्या मते," जागृती लोकशाहीची किंमत आहे.' ब्राईस यांच्या या मतावरून लोकशाहीच्या रक्षणासाठी नागरिकांनी जागरूक आणि कृतिशील राहणे अत्यंत आवश्यक असते. जागरूक नागरिक शासनावर नियंत्रण ठेवत असतात. जागरूक नागरिक शासनाच्या अयोग्य किंवा चुकीच्या धोरणावर योग्य वेळी टीका करून शासनाला अयोग्य धोरण रद्द करण्यास भाग पाडतात. थोडक्यात लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी नागरिक जागरूक आणि कृतिशील राहणे अत्यंत आवश्यक आहे.

**७) सत्तेचे विकेंद्रीकरण:-**

सत्तेच्या विकेंद्रीकरणातून लोकशाही अधिक भक्कम होत असते. कारण सत्तेचे विकेंद्रीकरण ही लोकशाहीची मुलभूत प्रवृत्ती आहे. स्थानिक स्तरावर कार्य करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून जास्तीत-जास्त जनतेला राजकीय सहभाग घेण्याची संधी मिळत असते. स्थानिक स्वराज्य संस्थेतील राजकीय सहभागातून

जनतेला राजकीय शिक्षण मिळते. तसेच त्यांच्यामध्ये नेतृत्व गुणांचा विकास होत असतो. थोडक्यात लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून सत्तेचे विकेंद्रीकरण होत असल्यामुळे लोकशाहीचा पाया अधिक मजबूत होत असतो.

**८) वृत्तपत्र स्वातंत्र्य:-**

लोकशाहीच्या सक्षमीकरणामध्ये कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ यांच्याबरोबर जनसंचार माध्यमांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरलेली आहे. म्हणून वृत्तपत्रांना 'लोकशाहीचा चौथा स्तंभ' असे म्हटले जाते. लोकशाहीमध्ये जनतेला अभिव्यक्ती स्वातंत्र्य प्राप्त झालेले असते. या स्वातंत्र्याच्या माध्यमातून जनता वृत्तपत्रांमध्ये लिखाण करून अभिव्यक्त होत असतात. लोकमत निर्माण करण्यामध्ये वृत्तपत्र स्वातंत्र्याची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. जनतेला राजकीय शिक्षण देण्याचे कार्य लोकशाही व्यवस्थेमध्ये वृत्तपत्र करीत असतात. त्याचप्रमाणे जनतेच्या विविध समस्या, प्रश्न इत्यादींकडे शासनाचे लक्ष वेधून घेण्याचे कार्य वृत्तपत्रे करतात. लोकमताची निर्मिती करणे आणि जनतेला राजकीय शिक्षण देण्यामध्ये वृत्तपत्रांची भूमिका महत्त्वाची ठरली आहे. त्यामुळे वृत्तपत्रांनी नि:पक्षपातीपणे आणि स्वतंत्रपणे कार्य करणे लोकशाहीच्या यशस्वितेसाठी आवश्यक आहे.

**९) व्यक्तिमत्व विकासास संधी:-**

लोकशाही व्यवस्थेमध्ये नागरिकांच्या व्यक्तिमत्व विकासास योग्य संधी आवश्यक असते. नागरिकांच्या राहणीमानाचा दर्जा, सर्वांना समान संधी, कार्यकर्तृत्वानुसार मिळणारे सामाजिक स्थान, भेदभावरहित प्रतिष्ठा हे लोकशाहीचा आधार असतात. या आधारावर लोकशाहीमध्ये नागरिकांचा व्यक्तिमत्व विकास होण्यासाठी आवश्यक परिस्थिती निर्माण करणे गरजेचे आहे.

**१०) राष्ट्रहित जपणारे सुदृढ व निकोप राजकीय पक्ष:-**

लोकशाहीचे यशापयश हे त्या लोकशाहीमध्ये असणाऱ्या राजकीय पक्षाच्या दृष्टिकोनावर अवलंबून असते. लोकशाहीमध्ये राजकीय पक्ष जनमत निर्मितीचे कार्य करीत असतात. राजकीय पक्षाची निर्मिती सामाजिक, आर्थिक आणि राजकीय स्वरूपाच्या व्यापक कार्यक्रमावर आधारित झालेली असावी. मात्र निकोप आणि सुदृढ लोकशाहीसाठी राजकीय पक्षाची निर्मिती जात, धर्म, पंथ, भाषा, प्रांत, वर्ग किंवा एखाद्या विशिष्ट हितसंबंधाच्या आधारावर झालेली नसावी. लोकशाहीमध्ये बहुपक्ष पद्धती असली तरीदेखील राजकीय पक्षांची संख्या खूप जास्त प्रमाणात असू नये. लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी राजकीय पक्षांच्या कार्यपद्धतीत आणि दृष्टिकोनात सुधारणा घडवून आणणे आवश्यक आहे. थोडक्यात लोकशाही यशस्वी होण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावणारा राजकीय पक्ष राष्ट्रहित जपणारा, सुदृढ आणि निकोप असणे आवश्यक आहे.

### ११) कर्तव्यदक्ष, जागृत आणि विचारशील नागरिक:-

नागरिकांच्या सहभागाशिवाय लोकशाही यशस्वी होऊ शकत नाही. म्हणून लोकशाहीमध्ये सहभाग घेणाऱ्या नागरिकांचा दर्जा कसा आहे, यावर लोकशाहीचे यशापयश अवलंबून असते. म्हणून लोकशाहीतील नागरिक कर्तव्यनिष्ठ, विचारशील, चारित्र्यसंपन्न, जागृत, लोकशाहीवर अढळ निष्ठा असणारे तसेच स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी सदैव सिद्ध असणे आवश्यक आहे, नव्हे ते लोकशाहीचे बलस्थान आहे.

### १२) उत्क्रांतीवादी परिवर्तन:-

लिप्सेट यांच्या मते," लोकशाहीची प्रक्रिया टप्प्याटप्प्याने उत्क्रांत होत गेल्यास समाज नवीन मूल्यांशी समरस होतो, परंतु हेच परिवर्तन अचानक किंवा अतिवेगाने झाल्यास समाज मानसिकदृष्ट्या या परिवर्तनाला समरस होत नसल्यामुळे तेथे जहालवाद उदयाला येण्याचा धोका असतो. थोडक्यात लोकशाही अधिक स्थिर आणि यशस्वी होण्यासाठी परिवर्तन उत्क्रांतिवादाच्या मार्गाने होणे आवश्यक आहे.

अशाप्रकारे लोकशाही यशस्वी करण्यासाठी विविध विचारवंतांनी काही आवश्यक परिस्थिती अथवा अटी सांगितलेल्या आहेत.

### सारांश:-

लोकशाहीच्या अंमलबजावणीतून काही दोष निर्माण होत असतात, असे दोष दूर करून लोकशाहीला अधिक सुदृढ आणि निकोप करण्यासाठी जाणीवपूर्वक आवश्यक परिस्थिती निर्माण करावी लागते. लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी राजकीय व सामाजिक समता, शिक्षणाची व्यापक व्यवस्था, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून सत्तेचे अधिकाधिक विकेंद्रीकरण, सुदृढ, राष्ट्रहित जपणारे निकोप राजकीय पक्ष, वृत्तपत्र माध्यमांना अधिकाधिक स्वातंत्र्य, न्यायमंडळाचे स्वातंत्र्य, परमत सहिष्णुता, नागरिकांमध्ये बंधुत्वाची भावना, नागरिकांची कृतिशील इच्छाशक्ती, चारित्र्यसंपन्न व कर्तव्यदक्ष नागरिक, नागरिकांच्या व्यक्तिमत्व विकासाला अनुकूल परिस्थिती, जागरूक व दक्ष नागरिक इत्यादी बाबी उपलब्ध असणे अत्यंत आवश्यक आहे. लोकशाहीमध्ये जनमताला अधिकाधिक महत्त्व असल्यामुळे जनतेच्या मनात लोकशाही भावना उत्पन्न करणे ही बाबदेखील लोकशाहीसाठी आवश्यक परिस्थिती निर्माण करणारी ठरते.

### आपली प्रगती तपासा.

१) लोकशाहीसाठी आवश्यक असणारी परिस्थिती किंवा अटी स्पष्ट करा.

___

___

___

२) लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी आवश्यक परिस्थितीविषयी सविस्तर लिहा.

---

---

---

**अधिक वाचनासाठी उपयुक्त संदर्भग्रंथ:-**


१ ) मावळकर पु. ग.- लोकशाहीचे स्वरूप

२) कुंभार नागोराव (संपा.)- लोकशाही समस्या व स्वरूप

३) चंद्रशेखर, दिवाण- राजकीय सिद्धांत आणि राजकीय विश्लेषण

४) वकील ना. र. ,इनामदार- आधुनिक राजकीय विश्लेषण

५) गर्दे दि. का., बाचल वि. मा.- आधुनिक राजकीय विश्लेषण-भाग एक व दोन

६) भोगले शांताराम- आधुनिक राजकीय सिद्धांत

७) वर्मा श्यामलाल- आधुनिक राजनीतिक सिद्धांत

८) नारायण इक्बाल- राजनीति शास्त्र के मूल सिद्धांत


❄❄❄❄❄❄❄

४

# राजकीय विचारप्रणाली

## (Politica Idiology)

**घटक रचना**

४.१ मार्क्सवाद

४.२ फॅसिझम

४.३ स्त्रीवाद

## ४.१ मार्क्सवाद

४.१.० उद्दिष्टे

४.१.१ प्रास्ताविक

४.१.२ विषय-विवेचन

४.१.२.१ मार्क्सवाद

४.१.२.२ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.१.३ सारांश

४.१.४ सरावासाठी स्वाध्याय

## ४.१.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला-

मार्क्सपूर्व समाजवादाची पूर्वपीठिका सांगता येईल.

- समाजवादाचा नेमका अर्थ सांगता येईल.
- मार्क्सवाद शास्त्रीय स्वरूपात सांगता येईल.
- मार्क्सवादाची सविस्तर माहिती लिहिता येईल.

## ४.१.१ प्रास्ताविक

मनुष्य वगळता इतर सर्व प्राणिमात्र निसर्गाच्या कृपेवर जिवंत राहत असतात; पण मनुष्य मात्र कधी परिस्थितीनुरूप स्वतःत व स्वतःनुरूप परिस्थितीत परिवर्तन करण्यास सक्षम आहे; आणि ही गोष्ट त्याला इतर प्राणिमात्रांपासून वेगळे करीत असते. प्राचीन काळापासून माणूस आपल्या जीवनाला नियंत्रित करणाऱ्या बाह्य सत्तेविषयी सदोदित विचार

करीत आला आहे. यातूनच राजकीय चिंतनाचा उदय झाला. राजकीय सिद्धांत जन्माला आले. ह्या घटकात आपण माक्सपूर्व समाजवाद व मार्क्सवाद यांचा विचार करणार आहोत. समाजवाद अथवा साम्यवाद हे शब्द आधुनिक असले तरी या विचारांच्या खाणाखुणा आपल्याला समाजपूर्व अवस्थेतही आढळतात.

समाजपूर्व अवस्था हा एक समाजवादाचाच आविष्कार होता. प्लेटो या ग्रीक विचारवंताच्या तत्त्वचिंतनातही आपणांस साम्यवादाचे प्रगटीकरण सापडते. त्याचे तत्त्वज्ञान एका विशिष्ट वर्गासाठीच होते. समाजातल्या अभिजनवर्गासाठीचाच तो साम्यवाद होता. आपण ‘आधुनिक काळातील पाश्चिमात्य राजकीय विचारप्रवाह’ हे पुस्तक अभ्यासणार असल्यामुळे प्राचीन साम्यवादाविषयीच्या विश्लेषणावर फारसा भर देण्यात आलेला नाही. या ठिकाणी आणखी एक गोष्ट ध्यानात ठेवणे अगत्याचे ठरेल. प्लेटोचा साम्यवाद हा पूर्णतः आध्यात्मिक स्वरूपाचा आहे, तर मार्क्सवाद हा मूलतः आर्थिक स्वरूपाचा आहे.

## ४.१.२. विषय विवेचन

मार्क्सवादाचे विवेचन करण्यापूर्वी आपल्यासमोर स्पष्ट झाली पाहिजे कि लोकतांत्रिक समाजवाद आणि मार्क्सप्रणीत समाजवाद यात काही मुलभूत भेद आहे. मार्क्स, लेनिन, स्टालिन यांच्या अनुयायांद्वारे प्रस्थापित केलेला साम्यवाद क्रांतिकारी तथा सत्तावादी आहे. थोडक्यात आपण मार्क्सावादाला साम्यवाद तरीही काही हरकत नाही.

### ४.१.२.१ मार्क्सवाद

“एक भूत युरोपखंडात वावरत आहे. या भुताचे नाव आहे ‘कम्युनिझम’, जुन्या युरोपचे सारे सत्ताधारी पोष व झार मढेरनिक व गीझो फ्रेंच जहालवादी व जर्मन पोलीस ह्या भुताला गाडण्यासाठी जुन्या युरोपच्या साऱ्या शक्ती एक झाल्या आहेत. असा कोणता विरोधी पक्ष आहे की ज्याची सत्तारूढ पक्षाने नालस्ती केली नाही? ह्या वस्तुस्थितीवरून दोन निष्कर्ष काढता येतील : कम्युनिस्ट ही एक बलिष्ठ शक्ती आहे, हे युरोपच्या सर्व सत्ताधाऱ्यांना आता मान्यच करावे लागेल; दुसरे असे की कम्युनिस्टांनी आता आपले विचार, आपले उद्देश, आपले प्रश्न जगापुढे उघडपणे प्रसिद्ध केले पाहिजेत आणि आपला जाहीरनामा काढून कम्युनिझमच्या भुतासंबंधीच्या दंतकथांना प्रत्युत्तर दिले पाहिजे."

उपर्युक्त विधाने ही आहे मार्क्सच्या ‘कम्युनिस्ट मनिफॅस्टो’ ची सुरुवात, ज्यात आपल्याला दिसतो कम्युनिझम-विषयीचा दुर्दम्य विश्वास आणि आपल्या सिद्धांताच्या मांडणीची. ओघवती शैली.

शास्त्रीय समाजवादाचा जनक कार्ल मार्क्स याचा जन्म जर्मनीतील एका ज्यू कुटुंबात १८१८ मध्ये झाला. त्याचे वडील वकील आणि प्रशियन राष्ट्रवादी होते. मार्क्सने बॉन विद्यापीठात न्यायशास्त्राचा अभ्यास केला. मार्क्स असामान्य प्रतिभेचा विद्यार्थी होता. त्याने विद्यापीठातच नोकरी मिळविण्याचा प्रयत्न केला; पण त्याच्या जहाल व परस्परांविरोधी विचारांमुळे त्याला नोकरी मिळू शकली नाही. मार्क्स 'रिनिश टाइम्सचा' संपादक झाला

## (अ) मार्क्सचा शास्त्रीय समाजवाद

द्वंद्वात्मक भौतिकवाद : मार्क्सच्या शास्त्रीय समाजवादाची सुरुवात द्वंद्वात्मक भौतिकवादापासून होते. द्वंद्वात्मक भौतिकवाद, ऐतिहासिक भौतिकवाद, अतिरिक्त मूल्य सिद्धांत, वर्गसंघर्ष, राज्यविहीन व वर्गविहीन समाज या साऱ्यांचा समावेश मार्क्सच्या शास्त्रीय समाजवादात करता येईल.

द्वंद्वात्मक भौतिकवादाद्वारे परिवर्तनाच्या व विकासाच्या प्रक्रियेमागे विरोधविकासवादाचे तत्त्व कार्य करते, हा मानवी समाजाच्या विकासाचा मूलभूत नियम मांडण्याचा प्रयत्न केला. विरोधविकासवादापासूनच मार्क्सच्या विचारांची सुरुवात होते. हेगेलच्या आध्यात्मिक द्वंद्ववादाच्या सिद्धांताचे द्वंद्वात्मक भौतिकवादात परिवर्तन करून त्याने भौतिक विश्वाच्या विकासाचे तत्त्वज्ञान सांगण्याचा प्रयत्न केला. हेगेलने आपल्या तत्त्वज्ञानात चैतन्य किंवा विचारांना अग्रक्रम दिला तर मार्क्सने 'वस्तू'किंवा भौतिक पदार्थाला अग्रक्रम दिला. मार्क्सचा द्वद्वात्मक भौतिकवाद समजून घेण्यासाठी हेगेलच्या भौतिकवादाचा धावता आढावा घेणे अगत्याचे ठरेल.

हेगेलच्या मते, मानवी विचार कधीच स्थिर नसतात. मानवी मनात एक विचार निर्माण होतो, त्यालाच हेगेल 'वाद' म्हणतो (Thesis). यात काही उणिवा असतात किंवा या विचारातच काही अंतर्विरोध निर्माण होतात, त्याला हेगेलने प्रतिवाद (Antithesis) असे संबोधले. वाद व प्रतिवादाच्या संघर्षात्मक समन्वयातून सुसंवाद (Synthesis) निर्माण होतो आणि ही प्रक्रिया अव्याहतपणे चालू राहते.

मार्क्सने हेगेलच्या विकासवादातील संघर्षाचे तत्त्व स्वीकारले; पण 'चैतन्या'ऐवजी 'पदार्थ' महत्त्वाचा मानला. पदार्थ हेच अंतिम सत्य मार्क्सने मानले. माणसाने आधी भूमी पाहिली मगच त्याच्या मनात पेरण्याचा, उगविण्याचा विचार निर्माण झाला. आधी त्याच्या मनात पेरण्याचा विचार आला मग त्याने भूमीचा शोध घेतला असे घडले नाही. आपल्या सिद्धांताच्या पुष्ट्यर्थ मार्क्स बीजाचे उदाहरण देतो. बीज म्हणजे वाद (Thesis). या बीजाच्या अंतर्गत संघर्ष होणे म्हणजेच बीजाचा ऊर फुटणे हे विकासासाठी अपरिहार्य ठरते. त्या फुटण्याच्या प्रक्रियेलाच तो प्रतिवाद (Antithesis) असे म्हणतो. यातून निर्माण होणारा वृक्ष हे सुसंवादाचे हे (Synthesis) उत्कृष्ट उदाहरण म्हणावे लागेल.

मार्क्स आपल्या भांडवल या ग्रंथात म्हणतो की, 'मी हेगेलच्या तत्त्वज्ञानाला डोक्यावर उभे असलेले पाहिले आणि मी त्याला पायावर उभे केले'. पदार्थ अस्तित्वात येतो, विकसित होतो, कालांतराने नष्ट होतो व त्यातून नवीन पदार्थ निर्माण होतो. द्वंद-परिवर्तन-विनाशनिर्मिती अशी प्रक्रिया सदोदित चालू राहते. लुडविग फेयरबाखच्या (१८०४ ते १८७२) भौतिकवादाचा मार्क्सच्या दृष्टिकोनावर महत्त्वाचा परिणाम झाला. फेअरबाख हा मार्क्सच्या काळातील महान भौतिकवादी होता. जडवस्तू प्रथम का जाणिवा व बुद्धी प्रथम? या प्रश्नाचे उत्तर भौतिकवादी जडवस्तू प्रथम असेच देतात. पृथ्वीवर मानवप्राणी व इतर सजीव प्राणी, वनस्पती अस्तित्वात येण्यापूर्वी अनेक दशलक्ष वर्षे आधी पृथ्वी निर्माण झाली, 'जाणीवबुद्धी' ही भौतिक जगाच्या प्रदीर्थ उत्क्रांतीची केवळ एक निर्मिती मात्र आहे. विश्व आणि विश्वातील सर्व वस्तू गतिमान आहेत. गती ही जडवस्तूच्या अस्तित्वाचे लक्षण मात्र आहे. 'गती' अबाधित आहे; तर 'विश्रांती' सापेक्ष आहे.

मानवाची जाणीवबुद्धी ही अत्यंत सुसंघटित जडवस्तूचा-मेंदूचा खास गुणधर्म आहे आणि ती भौतिक वास्तविकतेचे प्रतिबिंब घडविते. 'द्वंद्ववाद' हे निसर्ग' मानवी समाज' विचार व गतीच्या विकासाचे सर्वसाधारण नियमांचे शास्त्र आहे. भौतिग जग हे केवळ विकसनशील नाही तर ते संपूर्ण जोडलेले आणि एकसंध असे आहे. विरोधी गोष्टींच्या ऐक्याचा आणि संघर्षाचा नियम म्हणजे द्वंद्ववादाचा गाभा आहे. विरोधी गोष्टीतील परस्परसंघर्ष हा बदलाचे किंवा विकासाचे उगमस्थान आहे. जुने आणि नवे, उदयमान आणि कालबाह्य यांच्यात विरोध झालाच पाहिजे, संघर्ष झालाच पाहिजे असे जडवाद मानतो म्हणून लेनिन असे म्हणतो, 'विकास म्हणजे विरोधी गोष्टींचा झगडा होय'. विरोधी गोष्टीतील समतोल हा सापेक्ष असतो. तो चिरंजीवी असता तर विकास झालाच नसता. संघर्ष हेच विकासाचे उगमस्थान आहे. अंतर्गत विरोध, बाह्य विरोध, विरोधात्मक विरोध अविरोधी विरोध, मूलभूत नसलेले विरोध असे विरोधाचे विविध प्रकार असतात. द्वंद्वात्मक पद्धतीने होणाऱ्या विकासाचे मार्क्सने तीन नियम सांगितले आहेत.

(अ) विकास हा केवळ द्वंद्वात्मक प्रक्रियेमुळे होत असतो.

(आ) द्वंद्वात्मक प्रक्रियेत मालात्मक बदलामुळे गुणात्मक बदल होतो.

(इ) विश्वातील वस्तूंमध्ये तत्त्वात्मक एकता असते.

माणूस मृत्यूची बीजे घेऊन जन्माला येतो व संतानरूपाने विकसित होतो. आपला उपर्युक्त द्वंद्वात्मक भौतिकवाद मांडून आध्यात्मिक, काल्पनिक, ईश्वरीय या सर्व दृष्टिकोनांचे मार्क्सने खंडन केले.

**(आ) मार्क्सचा ऐतिहासिक भौतिकवाद**

कार्ल मार्क्सने प्रथम द्वंद्वात्मक भौतिकवादाचा सिद्धांत मांडून त्यावर आधारित अशा ऐतिहासिक भौतिकवादाच्या सिद्धांतांची मांडणी केली आहे. कार्ल मार्क्स आणि फ्रेडरिक एंगल्स या कामकरी वर्गाच्या महान नेत्यांनी शास्त्रीय समाजवादाची निर्मिती केली. मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचा उदय ही ऐतिहासिक विकासाची स्वाभाविक उत्पत्ती होती. मार्स-एंगल्स यांनी कामगार लढ्यात प्रत्यक्ष सहभाग घेतल्यामुळे त्यांच्या तत्त्वज्ञानाला एक लढाऊ धार आली. या लढाऊपणाला एक शास्त्रीय बैठक असल्यामुळे याची सैद्धांतिक बाजू अधिकच मजबूत बनत गेली. मानवी विकासप्रक्रियेचे सूत्र गवसताना वरकरणी विसंगत वाटणाऱ्या संर्घषाच्या तत्त्वात विकासाची बीजे शोधण्याचे धाडस मार्क्सने केले. यातूनच सामाजिक विकासाच्या विरोध-विकासवादी भौतिकवादाचा म्हणजेच ऐतिहासिक भौतिकवादाचा सिद्धांत मांडला.

लोककल्याणाची मनस्वी आस असणाऱ्यांसाठी मानवाचा आर्थिक व सांस्कृतिक विकास घडविण्याची इच्छा असलेल्या समाजातील प्रगत बुद्धिवादी वर्गाला ऐतिहासिक भौतिकवादाचे प्रचंड आकर्षण वाटणे स्वाभाविक होते. गुलामांना आपली संपत्ती मानणाऱ्या समाजव्यवस्थेत, उमरावशाहीविरुद्धच्या लढाईत लोकशाही मार्गावर विश्वास असणाऱ्यांनी ऐतिहासिक भौतिकवादाचा शस्त्र म्हणून सर्रास वापर केला.

तत्कालीन तथाकथित प्रतिगामी, धार्मिक, आध्यात्मिक विचारकांनी शोषक वर्गाचीच बाजू घेऊन शोषणाचे अविवेकी समर्थन केले व परिवर्तनाला जमेल तेथे जमेल तसा विरोधच केला.

जगाच्या दैवी निर्मितीबद्दलच्या धार्मिक दंतकथेला कल्पनावाद एक प्रकारचा तात्त्विक बुरखा घालतो; म्हणून कल्पनावाद अस्तनीतील निखारा होय. म्हणूनच तो अधिक धोकादायक देखील आहे, असे मार्क्सला वाटते. कारण तो धर्माप्रमाणे अंधश्रद्धेपुरतेचे स्वतःला मर्यादित ठेवत नाही; तर शास्त्रीयतेचा आव आणून माणसांच्या तर्कशक्तीवर झडप घालू पाहतो. कष्टकरी जनतेला गुलाम बनविण्यासाठी व आपले वर्चस्व न्याय्य ठरविण्यासाठी शोषकांनी नेहमीच अध्यात्मवादाचा, कल्पनावादाचा, धर्माचा वापर केलेला आहे. नम्र व अधीन राहण्याचे वरकरणी सोज्ज्वळ वाटणारे असे धर्माचे तत्त्वज्ञान असते. माणसाचे वस्तुनिष्ठ अस्तित्व नाकरण्याचे कारस्थान पिढोनपिढी पासून धर्माने अत्यंत यशस्वीपणे पार पाडले आहे.

धर्म व कल्पनावाद लोकांना साम्राज्यवादी, प्रतिगामी शक्तीविरुद्ध लढण्यापासून परावृत्त करतो. या साऱ्या प्राप्त परिस्थितीच्या आकलनातून मार्क्सने आपला ऐतिहासिक भौतिकवाद मांडला. मार्क्सने उभे केलेले तत्त्वज्ञान भांडवलशाही विरोधी लढ्यात कष्टकरी वर्गासाठी आत्मिक बळाची प्रेरणा ठरले. आपल्या तत्त्वज्ञानाच्या संदर्भात मार्क्स एके ठिकाणी असे म्हणतो की, “तत्त्वज्ञांनी वेगवेगळ्या तहांनी जगाचा केवळ अर्थ लावावा; पण मुख्य मुद्दा आहे तो जग बदलण्याचा” उत्पादन-साधनांवरील मालकी हक्कानुसार ‘आहे रे’ आणि ‘नाही रे’ असे प्रमुख दोन वर्ग असतात. आहे रे वर्गाकडून नाही रे वर्गाचे अमानवी शोषण होत असते. हा बहुसंख्य शोषित वर्ग संपत्तीहीन असतो; तर मूठभरांकडे संपत्तीचे केंद्रीकरण झालेले असते. आपले म्हणणे स्पष्ट करताना कम्युनिस्ट मॅनिफेस्टोमध्ये मार्क्स म्हणतो, “मानवी समाजाचा आजवरचा इतिहास हा वर्गसंघर्षाचा इतिहास आहे. “पुढे कष्टकरी वर्गाला तो असे आव्हान करतो की, ‘तुम्हांला गमाविण्यासाठी हातातल्या शृंखलांशिवाय काहीही नाही आणि जिंकण्यासाठी मात्र उभे जग पडलेले आहे. मानवाने उपजीविकेकरिता उत्पादन पद्धती शोधून काढली. उत्पादन पद्धतीत, उत्पादन साधनांत संशोधन व विकास होत गेला. उत्पादन साधनांत झालेल्या बदलांनुसार समाजाचा जो विकास होत गेला त्या विकासाचे टप्पे त्याने पुढीलप्रमाणे सांगितले.

### (१) आदिम साम्यवादी व्यवस्था

जेव्हा खाजगी मालमत्तेचा उदय झालेला नव्हता त्या काळात मनुष्य पशु-पक्ष्यांची शिकार करून आणि कंदमुळे, फुले, फळे खाऊन आपला उदरनिर्वाह करीत असे. खाजगी संपत्ती नसल्यामुळे समाजात आहे रे’ आणि ‘नाही रे’ असे वर्ग आस्तित्वात नव्हते. हा समाज भटका’ टोळी समाज होता. सामूहिक शिकार करणे आणि निसर्गातील मुबलक साधनसामग्रीचा उपभोग घेणे असे ते जीवन होते. या समाजात समता होती. शोषक व शोषित वर्ग नव्हते; त्यामुळे ते परस्परांशी प्रेमाने वागत. ही अवस्था प्राथमिक साम्यवादी व्यवस्थाच होती. याच युगात लोकसंख्येतील भरमसाठ वाढीमुळे कंदमुळे, फळे, फुले, शिकार सहज उपलब्ध होणे अशक्य होऊ लागले; तेव्हा मानवाला जगण्याचा प्रश्न भेडसावू लागला. यातून साधन-सामग्रीच्या संचयाची प्रवृत्ती वाढीस लागली. यातूनच समाजात माझे-तुझे असा वाद निर्माण झाला. खाजगी मालमत्तेचा शोध हा निकोप समाजव्यवस्थेला लागलेला सुरुंग होता.

### (२) गुलामगिरीचा काळ

मानवाच्या वाढत्या लोकसंख्येनुसार शेती व पशुपालनाचा आविष्कार झाला. काही व्यक्तींनी जमिनीवर मालकी हक्क प्रस्थापित केला आणि इतरांच्या श्रमांवर उत्पन्न घ्यायला सुरुवात केली. भटका समाज स्थिर झाला. कुटुंबसंस्था व विवाहसंस्था या काळात आस्तित्वात आल्या. शेतीचा मालकीहक्क असलेल्याच्या शेतात श्रम करून उत्पन्न वाढवणारा वर्ग निर्धन होता. संपत्तिधारक मालकवर्ग शोषक बनला; तर निर्धन हा गुलाम; शोषित बनला. अशा प्रकारे समाजात दोन प्रमुख वर्ग निर्माण झाले. एक श्रम न करताही संपत्तिमान झालेला जमीनदारवर्ग व दुसरा सदोदित कष्ट करूनही उपासमार कपाळी आलेला गुलामांचा वर्ग. यातून गुलाम व जमीनदार यांच्यात संर्घष निर्माण झाला. याच अवस्थेत छोट्या कारागिरांचा आपल्या उत्पादन-साधनांवर मालकी असलेला वर्ग निर्माण झाला, त्यांच्यात उत्पादन वाढविण्याची तसेच व्यापार विस्तारासाठी स्पर्धा निर्माण झाली. विविध क्रय वस्तूंची मागणी वाढली. आंतरराष्ट्रीय बाजारपेठा अस्तित्वात येऊ लागल्या. वाढत्या मागणीच्या पूर्ततेसाठी छोट्या उद्योगाची मोठ्या उद्योगात, व्यापारात वाढ होत गेली. या अवस्थेत शासनव्यवस्थेवर सामंतांचे, संरजामंदारांचे प्रभुत्व होते आणि यातून ही अवस्था संर्घषप्रवण बनली. छोटे उद्योगपती हळूहळू मोठे उद्योगपतीही बनले. संरजामदार नव्या उद्योगपतींना व्यापार विस्ताराला विरोध करतात. त्यातून त्यांच्यात तीव्र संघर्ष निर्माण झाला. नव्या उद्योगपतींच्या वर्गाने भूदासांना, शेत-मजुरांना हाताशी धरून संरजामदारांशी लढा देऊन सरंजामदारी उलथून टाकली आणि भांडवलशाही प्रस्थापित केली.

### (४) भांडवलशाही व्यवस्था

मार्क्स आजच्या युगाला भांडवलशाहीचे युग संबोधतो. इंग्लडमधील औद्योगिक क्रांतीमुळे युरोपीय राष्ट्रांत झालेल्या बदलावर आधारित असे हे विचार मार्क्सने मांडले आहेत. भांडवलदारवर्ग हळूहळू कारखान्यांच्या यांत्रिकीकरणाकडे वाटचाल सुरू करेल. यातून अधिकाधिक कामगार बेकार होणार, यातून भांडवलदार वर्गाविरुद्ध होणारी संतापाची भावना टिपेला पोचेल व अंतिमतः या व्यवस्थेची मान कामगारवर्ग स्वतःच्या हातांनीच मुरगाळेल.

### (५) समाजवाद

मार्क्सच्या द्वंद्वात्मक भौतिकवादातील अंतिम टप्पा म्हणून आपणांस समाजवादाकडे पाहावे लागेल. मार्क्सच्याच शब्दांत भांडवलशाही हा 'संवाद' तर संघटित श्रमजीवी वर्ग हा 'विसंवाद' आहे. यातून वर्गविहीन समाज म्हणजे 'सुसंवाद' अस्तित्वात येईल. यालाच तो समाजवाद असे संबोधतो. अर्थात याच्या प्रतिष्ठापने पूर्वी संक्रमणकाळात कामगारवर्गाची हुकूमशाही प्रस्थापित झालेली असेल व हळूहळू हा वर्ग व राज्यही लयाला जाईल. यातून वर्गविहीन व राज्यविहीन समाजाची निर्मिती होईल व हीच मार्क्सच्या दृष्टीने आदर्श समाजवादी अवस्था होय.प

### (इ) मार्क्सचे राज्यविषयक विचार

मार्क्सने आपल्या साम्यवादी जाहीरनामा या पुस्तकात राज्यविषयक सिद्धांत मांडला आहे. राज्य हे जुलमाचे यंत्र आहे, याविषयी मार्क्सच्या मनात अजिबात साशंकता नव्हती. सद्यःस्थितीत राज्य भांडवलदार व्यक्तींचे संघटन असून त्यांचा उद्देश कष्टकरी वर्गाचे शोषण करणे, नफा कमावणे हा असतो. आपल्या उद्देशपूर्तीसाठी भांडवलदारवर्ग हा शासन व कायद्याची निर्मिती करीत असतो. कायद्याच्या आधारे आपल्या संपत्तीचे रक्षण व श्रमिकांची पिळवणूक करून आपल्या संपत्तीत वाढ करीत असतो. मार्क्सला राज्य ही वर्गसंघर्षाची उत्पत्ती वाटते. अगदी नैसर्गिक अवस्थेत राज्य अस्तित्वात नव्हते, त्या अवस्थेस साम्यवादी व्यवस्था असे तो म्हणतो. मानवी विकासाच्या दुसऱ्या टप्प्यावर मालकवर्गाने गुलामांवर वर्चस्व गाजविण्यासाठी, मध्ययुगात संरजामदारांच्या हितसंबंधांचे संरक्षण करण्यासाठी तर आधुनिक काळात भांडवलदारीवर्गाने कष्टकऱ्यांचे शोषण करण्यासाठी राज्यसंस्थेचा साधन म्हणून वापर केला.

थोडक्यात, मार्क्सच्या मते, राज्यसंस्था विलयाला गेली पाहिजे. वर्गविहीन, राज्यविहीन समाज है, मार्क्सचे स्वप्न होते.

### वैशिष्ट्ये

(१) राज्याचा आधार पाशवी शक्ती हाच असतो.

(२) वर्गीय हितसंवर्धनाच्या गरजेतून शोषकांनी राज्याची निर्मिती केली.

(३) सर्वांचे कल्याण हा कधीच राज्यांचा हेतू नसतो.

(४) राज्ये सर्वांच्या कल्याणासाठी नसल्यामुळे ती विलयाला गेलीच पाहिजेत.

### आक्षेप

(१) राज्य ही मार्क्स म्हणतो त्याप्रमाणे कृत्रिम संस्था नसून स्वाभाविक संस्था आहे.

(२) राज्य केवळ पिळवणुकीचे कार्य करीत नाही; तर ते कल्याणकारी कार्यदेखील काते.

(३) राज्याविना समाज ही संकल्पना भयावह आहे.

(४) राज्य विलयाला जाईल ही कविकल्पना वाटते.

### (ई) वर्गसंघर्ष

प्रत्येक एका वर्गसंघर्षाबरोबर मानवी समाज विकासाची एक एक पायरी चढत गेला, असे मानणाचा मार्क्सच्या चिंतनात वर्गसंघर्ष हा अपरिहार्य असाच होता. प्राचीन काळापासून समाजात नेहमीच दोन वर्गांचे अस्तित्व राहत आले आहे. कधी संरजामदार-गुलाम कधी मालक-मजूर; पण एकत्रितपणे विचार केल्यास समाजात शोषक व शोषित हे दोन वर्ग नेहमीच संघर्षरत राहिले आहेत. आधुनिक भांडवलशाही व्यवस्था ही क्रौर्याची परिसीमा आहे आणि यातून निर्माण झालेला सर्वहरा वर्ग ही कारुण्याची परिसीमा आहे. असे कार्ल मार्क्सला वाटते. वर्तमान भांडवलशाही व्यवस्था ही संरजामशाही समाजाच्या भग्न अवशेषांवर उभी आहे. जी

अस्त्रे भाडवलदार-वर्गान श्रमिकवर्गाच्या दमनासाठी निर्माण केली आहेत, ती आता त्यांच्या विरोधातच प्रयुक्त झालेली आहेत.

मार्क्सच्या मते, १७व्या शतकापासून १९व्या शतकापर्यंत जेवढ्या लोकशाही क्रांती झाल्या त्या शोषक आणि शोषित यांच्यातील पर्गसंघर्षाच्याच घटना होत. वास्तविक पाहता भांडवलदार व श्रमजीवी वर्ग हे परस्परपूरक आहेत. भांडवलदारांच्या कारखान्यांशिवाय मजुरांना श्रममूल्य मिळणार नाही; तर भांडवलदारांना मजुरांच्या श्रमांशिवाय आपले कारखाने चालविता येणार नाहीत; पण तरीही त्यांच्यात टोकाचा संघर्ष असतो, हे ऐतिहासिक वास्तव होय.

भांडवलदारवर्गाने आपल्या विनाशासाठी केवळ शस्त्राचीच निर्मिती केली नाही तर त्यांचा उपयोग करण्यासाठी श्रमजीवी वर्गाला हा जन्म दिला. भांडवलदार व मजुरांच्या या अनिवार्य संघर्षात अंतिमतः विजय होणार आहे तो मजूरवर्गाचाच. भांडवलशाहीच्या विकासाच्या प्रक्रियेत मोठे भांडवलदार लहान भांडवलदारांना गिळंकृत करीत जातात. यातून भांडवलदारांची संख्या कमी कमी होत जाते व कामगारांच्या संख्येत वाढ होत जाते. भांडवलशाही राष्ट्रांमध्ये मोठ्या प्रमाणात उत्पादन झाल्यामुळे भांडवलदारांमध्ये जागतिक बाजारपेठा काबीज करण्यासाठी अहमहमिका लागते. यातून दळणवळणाच्या सोयींची वाढ होते व जगातील श्रमिकवर्गही एकमेकाजवळ येऊ लागतो. यातून जागतिक कामगारांच्या एकतेची शक्ती निर्माण होते. ही शक्ती भांडवलदारवर्गासाठी मारक ठरते.

भांडवल-शाहीतील आणखी एक शोकांतिका म्हणजे श्रमजीवी वर्गाच्या दुःखात, दारिद्र्यांत व पराकोटीच्या पराधीनतेच्या भावनेत तीव्रतेने वाढ होत राहते. यातून कामगारवर्ग एकत्र येईल व क्रांतिलढ्यास उद्युक्त होईल. या लढ्यात गमाविण्यासाठी त्याच्याकडे शृंखलांशिवाय काहीही असणार नाही. या लढ्यातून भांडवलदारवर्ग नेस्तनाबूत होईल तर कामगारवर्गाची हुकूमशाही प्रस्थापित होईल आणि अंतिमतः वर्गविहीन व राज्यविहीन समाजाची निर्मिती होईल. अशा प्रकारे वर्गसंघर्षाचा सिद्धांत मार्क्सने प्रतिपादन केला असला तरी यात काही मर्यादा आहेत. जसे की, समाजाची विभागणी केवळ दोनच वर्गांत झालेली आहे हे मार्क्सचे म्हणणे सत्याचे दिग्दर्शक वाटत नाही. मध्यमवर्गाच्या अस्तित्वाकडे तो पूर्णतः दुर्लक्ष करतो. जागतिक कामगारांच्या एकतेचे मॉर्क्सने केलेले भाकितही तोंडघशी पडल्याचे आपण पाहतो. मार्क्सच्या वर्गसंर्घषाच्या सिद्धांतातून केवळ घृणेलाच जन्म दिला जातो. अर्थात वरील मर्यादा या सिद्धांतात असल्या तरी मार्क्सच्या या सिद्धांताने जागतिक कामगारांच्या जगण्याला अर्थ दिला, तर लढ्याला आशय व प्रेरणा दिल्या हे नाकारून चालणार नाही. आजही श्रम जीवीवर्गाची दुर्दशा पाहून मार्क्सवादाच्या प्रभावात येणाऱ्यांची संख्या वाढते आहे, हेच मार्क्सवादाचे अतुलनीय

**(उ) अतिरिक्त मूल्य सिद्धांत**

मार्क्सच्या एकदर राजकीय आर्थिक विचारांची कोनशिला म्हणून ना. य. डोळे अतिरिक्त मूल्य किंवा वरकड मूल्याच्या सिद्धांताकडे पाहतात. वस्तूचे मूल्य कसे निश्चित होते याविषयी

अर्थशास्त्राच्या दोन मान्यता आहेत :

(१) वस्तूची उपयुक्तता व उपलब्धी.

(२) वस्तूच्या निर्मितीवर खर्ची झालेले श्रम.

मार्क्स श्रममूल्य या विचारांचा समर्थक आहे. तो म्हणतो, 'वस्तूवर झालेले श्रमांचे संस्कार वस्तूचे मूल्य निर्धारित करीत असतात.वस्तूला आलेली किंमत हे श्रमिक वर्गाच्या घामाचे मोल आहे.असेच त्याला वाटते. म्हणूनच वस्तूची किंमत हि त्यावर खर्ची घातलेल्या श्रामावर निर्धारित होत असते असे तो मानतो आणि या ठिकाणीच भांडवलदार वर्गाकडून मजूर वर्गाचे अपरिमित असे शोषण होत असते. भांडवलदार वर्गाचे समर्थक असा दावा करतील कि या बदल्यात भांडवदारवर्ग श्रमिकांना वेतनही देत असतो. पण हे वेतन किती असते? तर कामगारांना किमान जिवंत राहून पुन्हा श्रमास तयार राहावे एवढे ते नाममात्र असते. त्यांच्या शर्माच्या तुलनेत हे मूल्य अगदीच नगण्य असते.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न –**

१) मार्क्सने हेगेलच्या कोणत्या द्वंद्ववादाच्या सिद्धांताचे द्वंद्वात्मक भौतिकवादात परिवर्तन केले?

२) वाद व प्रतीवादातून होणाऱ्या संघर्षात्मक समन्वयातून काय निर्माण होते.?

३) उत्पादन-साधनांवरील मालकी हक्कानुसार असणारे दोन प्रमुख वर्ग कोणते?

❄❄❄❄❄❄❄

## ४.२ फॅसिझम

४.२.० उदिष्टे
४.२.१ प्रास्ताविक
४.२.२ विषय-विवेचन
४.२.२.१ फॅसिझम
४.२.२.२ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे
४.२.२.३ सारांश
४.२.२.४ सरावासाठी स्वाध्याय

## ४.२.० उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला

- फॅसिझमची ऐतिहासिक पार्श्वभूमी व बेनिटो मुसोलिनीचा उदय कसा झाला हे सांगता येईल.
- फॅसिझम म्हणजे काय? आणि त्याची वैशिष्ट्ये - लोकशाहीला विरोध, अतिरेकी राष्ट्रवाद, राष्ट्राची सर्वोच्चता, साम्यवाद विरोध, बुद्धिवादाला विरोध, संघप्रधान राज्यव्यवस्था- या घटकांचे स्पष्टीकरण करता येईल.

## ४.२.१ प्रास्ताविक

११ नोव्हेंबर १९१८ रोजी पहिले महायुद्ध संपले. मात्र युरोपातील फार मोठी भूमी बेचिराख झाली होती. त्यामुळे अन्नधान्याचे उत्पादन घटले होते. जीवनावश्यक वस्तूंची टंचाई निर्माण झाली. युद्धभूमीच्या परिसरातील कारखानदारी उद्ध्वस्त झाल्यामुळे पक्क्या मालाचा पुरवठा होईना. बेरोजगारी वाढली. आपली ही स्थिती युद्धखोर राज्यकर्त्यांनी केली याची जनतेला खात्री पटली, म्हणून आता राजेशाही नको तर आपल्या मर्जीप्रमाणे चालणारे सरकार पाहिजे; या विचारातून इटली, जर्मनी, स्पेन इत्यादी देशांमध्ये लोकशाही सरकारांची स्थापना

करण्यात आली. पण या सरकारांपुढे अनंत अडचणी होत्या. लोकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करणे, शांतता प्रस्थापित करणे, विस्कळीत झालेल्या देशाची पुनर्रचना करून अर्थव्यवस्था सुधारणे, इत्यादी कामे त्यांना करावी लागणार होती. लोकशाही सरकारांनी त्यासाठी अटोकाट प्रयत्नही केला. पण त्यांना म्हणावे तितके यश मिळाले नाही. याचा परिणाम असा झाला की, लोकांचा लोकशाहीवरील विश्वास उडाला. ही लोकशाही काही कामाची नाही. म्हणून आपले प्रश्न सोडविणारी शासनव्यवस्था पाहिजे, अशी मागणी जनतेकडून होऊ लागली. त्याचा बरोबर फायदा काही संधिसाधू लोकांनी घेतला. लोकांच्या भावनेला हात घालून आपली लोकप्रियता वाढविली. याच संधिसाधू लोकांनी लोकप्रियतेचा फायदा घेऊन लोकशाहीचा गळा घोटून आपली हुकूमशाही स्थापन केली. जर्मनीत हिटलर, इटलीत मुसोलिनी तसेच स्पेनमध्ये जनरल फ्रँको यांच्या हुकूमशाही उदयास आल्या. राज्याला

सर्वोच्चता प्रदान करताना राज्य साध्य व व्यक्ती साधन मानून एक नेता, एक पक्ष, एक राज्य असा विचार या हुकूमशाहींनी मांडला.

लोकशाही व समाजवादाच्या विरोधी अशी ही हुकूमशाही (सर्वंकषवाद) विचारप्रणाली प्रथम इटलीमध्ये फॅसिझमच्या रूपाने व नंतर जर्मनीत नाझीवाद म्हणून उदयास आली. याचा सविस्तर अभ्यास आपण या घटकात करणार आहोत.

## ४.२.२ विषय-विवेचन

### ४.२.२.१ फॅसिझम

फॅसिझम (Fascism) ही पहिल्या महायुद्धानंतरच्या काळात इटलीतील विशिष्ट परिस्थितीमुळे उदयास आलेली एक सर्वंकष राजसत्तावादी आधुनिक राजकीय विचारप्रणाली आहे. इ.स. १९२०पर्यंत समाजवादी विचाराच्या बेनिटो मुसोलिनीने या समाजवाद विरोधी फॅसिस्ट तत्त्वज्ञानाचे प्रवर्तन केले. ह्या तत्त्वज्ञानाचा नंतर जर्मनी, जपान, स्पेन, पोर्तुगाल, अर्जेंटिना वगैरे देशांत झपाट्याने प्रचार व प्रसार झाला. मात्र इतर कोणत्याही देशांपेक्षा तीव्रता व व्याप्ती या दोन्ही दृष्टींनी फॅसिस्टवादाचा प्रभाव इटली व जर्मनी या देशांत अधिक होता. जर्मनीत त्याला 'नाझीवाद' हे नाव प्रचलित होते. एक नेता, एक राष्ट्र, एक पक्ष या प्रमुख त्रिसूत्रीवर आधारलेली ही विचारसरणी आजही वेगवेगळ्या स्वरूपांत, कमीअधिक प्रमाणात आव्हान देताना दिसते.

युरोपात त्या वेळी लोकशाही उदारमतवादी विचारप्रणालीचे प्राबल्य होते. उदारमतवादी विचारसरणीत व्यक्ती ही केंद्र मानून तिच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास हे राज्याचे प्रधान कर्तव्य मानले जाते. समाजवादी विचारसरणीत व्यक्तीच्या उत्कर्षापेक्षा सामाजिक विकासाला, व्यक्तिस्वातंत्र्यापेक्षा सामाजिक समतेला प्राधान्य दिले जाते. मात्र या दोन्ही विचार-प्रणालींहून वेगळी अशी सर्वंकषवादी विचारसरणी फॅसिझम -नाझिझमच्या रूपाने अनुक्रमे इटली व जर्मनीत उदयास आली. ही विचारप्रणाली राज्य हेच सर्व काही, राज्याचे व्यक्ती आणि समाजजीवनावर सर्वंकष नियंत्रण असले पाहिजे, राज्य हे सर्वसत्ताधीश असले पाहिजे असे मानते.

फॅसिझम या शब्दाची उत्पत्ती मूळ लॅटिन भाषेतील Fasces या शब्दापासून झाली. लाकडांची एकजूट अथवा मोळी (A bundle of sticks) असा या शब्दाचा अर्थ आहे. फॅसिस्टांनी 'लाकडांच्या जुडीमध्ये बांधलेली कुऱ्हाड' हे आपल्या पक्षाचे चिन्ह म्हणून निश्चित केले. हे प्राचीन रोमन साम्राज्याच्या संघशक्तीचे आणि सामर्थ्याचे प्रतीक मानले जात असे. यावरून फॅसिझमचा अर्थ सर्वसत्तावाद किंवा सर्वंकष सत्तावाद असा घेतला जातो. युद्धखोरवृत्ती, साम्राज्यतृष्णा व लोकशाही मूल्यांबद्दल तिरस्कार ही फॅसिझमच्या राज्य-कारभाराची सूत्रे होती.

#### (अ) बेनिटो मुसोलिनी - अल्प परिचय

इटलीच्या या फॅसिस्टवादी नेत्याचा जन्म २९ जुलै १८८३ मध्ये एक सुखवस्तू मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. समाजवादी विचारांच्या वडिलांचा प्रभाव मुसोलिनीवर पडल्यावर तो कट्टर समाजवादी विचारांचा बनला. सरकार उलथून टाकण्यासाठी घटनात्मक मार्गाचा अवलंब न

करता क्रांतीच्या मार्गाने जावे असे त्याला वाटत असे. त्याने त्यासाठी कामगार, मजूर संघटना बांधून या संघटनांमार्फत हरताळ, संप, मोर्चे, इत्यादी कार्यक्रम आखले. सन १९०५ पासूनच युरोपात युद्धजन्य परिस्थिती निर्माण होऊ लागली होती. इटालियन सरकारने म्हणून सक्तीची लष्कर भरतीकेली. मुसोलिनी भितीने स्वित्झर्लंडला पळाला. मात्र त्याच्या क्रांतिकारी विचारांमुळे स्विस सरकारने त्याला देशाबाहेर हाकलून दिले. त्यामुळे १९०६ मध्ये पुन्हा मुसोलिनी इटलीमध्ये आला. याच काळात समाजवादी पक्षाचे मुखपत्र असणाऱ्या 'अवंती' याचा तो प्रमुख संपादक झाला. सन १९१४मध्ये पहिले महायुद्ध सुरू झाले. या युद्धात सहभागी व्हावे किंवा नाही यावरून समाजवादी पक्षात दोन गट पडले. मुसोलिनीने वर्तमानपत्रातून इटलीने युद्धात भाग घ्यावा असा प्रचार केला. त्यामुळे त्याची 'अवंती' वर्तमानपत्राच्या संपादकपदावरून हकालपट्टी झाली. याचा परिणाम असा झाला की, मुसोलिनी समाजवादापासून दूर गेला.

सन १९१५ मध्ये लंडनचा तह करून इटली दोस्त राष्ट्रांच्या बाजूने युद्धात उतरली. मुसोलिनीही सैनिक म्हणून लष्करात भरती झाला. मात्र युद्धात जखमी झाल्याने त्याने लष्करी सेवेतून मुक्तता करून घेतली. याच सुमारास १९१७मध्ये रशियात साम्यवादी क्रांती यशस्वी झाली. इटलीमधील साम्यवादी पक्षाचे कार्यकर्ते. क्रांतीची भाषा बोलू लागले. मात्र मुसोलिनीने साम्यवाद इटलीत पोषक नाही म्हणून विरोध दर्शविला. युद्धानंतरच्या पॅरिसच्या शांतता परिषदेत इटलीचा अपेक्षाभंग झाल्याने मुसोलिनी जहाल राष्ट्रवादी बनला. इटलीने दोस्त राष्ट्रांचा सूड घेऊन न्याय मिळविला पाहिजे असे त्याला वाटू लागले. त्यासाठी त्याने १९१९ मध्ये 'फॅसिओ-द-कंबॅटिमेंटो' या पक्षाची स्थापना केली. या पक्षांतर्गत काळे डगलेवाले (Black Shirts) या नावाने ओळखले जाणारे सशस्त्र स्वयंसेवकांचे एक दल तयार करून पक्षाला लष्करी स्वरूप दिले. मुसोलिनीच्या या पक्षात मुख्य भरणा होता तो बेकार कामगारांचा, मध्यमवर्गातील दिशाहीन तरुणांचा व माजी सैनिकांचा. कडक शिस्त व कठोर प्रशिक्षणामुळे संघटना बळकट झाली. वृत्तपत्रे, सभा, भाषणे, निवडणुका, भित्तिपत्रके, समूहगीत यांसारख्या माध्यमातून पक्षाचा प्रचार व प्रसार तळागाळापर्यंत पोहोचला. समाजवाद्यांचा बंदोबस्त करण्याचे कार्य हा पक्ष करू लागला. मुसोलिनीने आपल्या प्रभावी व अमोघ वक्तृत्वाने लोकांना आकषून घेतले. १९२१च्या निवडणुकीत या पक्षाला चांगले यश प्राप्त झाले.

१९२२ साली फॅसिस्ट पक्षाने इटालियन सरकारच्या (लुईजी फॅक्टा हे पंतप्रधान होते) राजीनाम्याची मागणी केली. अन्यथा रोमवर आक्रमणाची धमकी दिली. या भीतीमुळे राजा व्हिक्टर इमॅन्युअल तिसरा याने पंतप्रधानांचा राजीनामा घेऊन मुसोलिनीला पंतप्रधान केले. ३० ऑक्टोबर १९२२ रोजी मुसोलिनीने नवे मंत्रिमंडळ बनविले. क्रमाक्रमाने सत्तेचे केंद्रीकरण करून शेवटी तो इटलीचा सर्वेसर्वा बनला आणि फॅसिस्ट हुकूमशाहीची इटलीमध्ये सुरुवात झाली.

### (आ) फॅसिझमच्या उदयाची कारणमीमांसा

फॅसिझमच्या उदयाची ऐतिहासिक पार्श्वभूमी बघताना पुढील घटकांचा अभ्यास आवश्यक ठरतो.

### (१) इटलीच्या पदरी पडलेले नैराश्य

पहिल्या महायुद्धात इटली हा दोस्त राष्ट्रांच्या गटात सामील झाला होता. या महायुद्धाच्या परिणामांमुळे इटलीची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट झाली. इटली हा देश जरी युद्ध जिंकणाऱ्या दोस्त राष्ट्रांच्या बाजूने होता तरी युद्धापूर्वी झालेल्या करारानुसार हवे ते मुलूख त्याच्या वाट्याला न आल्यामुळे दुखावला होता. त्यामुळे दोस्त राष्ट्रांनी विश्वासघात केला अशी भावना इटलीत निर्माण झाली. युद्धात जिंकूनही इटलीस विजयासाठी फार मोठी किंमत मोजावी लागली. युद्धात इटलीची जी जीवितहानी व वित्तहानी झाली त्या मानाने त्यांच्या पदरी काहीच पडले नाही. त्याचा प्रचंड ताण इटलीच्या अर्थव्यवस्थेवर पडला. युद्धोत्तर काळात आर्थिक हलाखी, सामाजिक दुरवस्था, राजकीय असंतोष, राष्ट्रीय अपमान, उद्योगधंद्यातील मंदी, त्यातून निर्माण झालेली मजुरांची बेकारी, प्रशासकीय अकार्यक्षमता, युवकांमधील असंतोष, युद्धात लढलेल्या सैनिकांची नाराजी यांमुळे संपूर्ण देशात अस्वस्थता पसरली होती. देशाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी शासनाने केलेल्या उपाययोजनांमुळे जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा, प्रचंड भाववाढ झाली होती. यामुळे त्रस्त झालेली जनता आणि बंडखोरीकडे वळलेला कामगार वर्ग, या सर्व परिस्थितीशी मुकाबला करण्यास असमर्थ ठरलेले तत्कालीन लोकशाही शासन व त्यामुळे शासनावरील उडत चाललेला जनतेचा विश्वास - असे युद्धोत्तर इटलीचे चित्र होते. या एकूण परिस्थितीचा फायदा मुसोलिनीने घेऊन आपला पक्ष प्रभावी व मजबूत केला.

### (२) लोकशाही सरकारचे अपयश

'लोकशाहीसाठी सुरक्षित जग' निर्माण करण्याच्या उद्दिष्टाने लढले गेलेले पहिले महायुद्ध परिणामदृष्ट्या विजेत्या व पराभूत अशा दोन्ही पक्षांना हताश करणारेच होते. युद्धानंतरच्या काळात अधिकारावर असलेल्या लोकशाही सरकारांना जनतेला सुखसोयी पुरविणे अशक्य झाले. कोणत्याही एका राजकीय पक्षास बहुमत नसल्याने राजकीय अस्थिरता निर्माण झाली होती. १९१९ ते १९२२ या काळात सहा मंत्रिमंडळे इटलीत झाली. या राजकीय अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर मुसोलिनीच्या नेतृत्वाखाली फॅसिस्ट पक्षाने देशाला समर्थ आणि एकसंध बनविण्याचे आश्वासन दिले आणि सत्ता हाती घेतली.

### (३) समाजवादी प्रयोगाची असफलता

पहिल्या महायुद्धाच्या काळात साम्यवादी विचारांचा इटलीमध्ये प्रवेश झाला होता. पगार कपात, कामवाढ, नोकर कपात, भाववाढ, इत्यादी स्वरूपाचा भांडवलशाहीचा कामगारांवरील हल्ला, युद्धानंतरच्या आर्थिक परिस्थितीमुळे कामगारांना नवीन सवलती देणे व जुन्या सवलती चालू ठेवणे भांडवलदारांना अशक्य झाले होते. कारण भांडवलशाहीची वाढ खुंटली होती. त्यातूनच अटळ असा तीव्र वर्गसंघर्ष (भांडवलदार विरुद्ध कामगार वर्ग) सुरू झाला होता.

बेकार झालेले सैनिक, वैफल्यग्रस्त कामगार, बुद्धिजीवी वर्ग व विद्यार्थी यांच्यात साम्यवादाचा प्रचार झाला होता. इटलीतील बिकट आर्थिक परिस्थितीचा व राजकीय

अस्थैर्याचा फायदा घेऊन ग्रामीण भागापर्यंत साम्यवाद पोहोचला होता. त्याच सुमारास १९१७ मध्ये लेनिनच्या नेतृत्वाखाली रशियात साम्यवादी क्रांती यशस्वी झालेली होती. त्याचे उदाहरण डोळ्यांसमोर ठेवून आपणही क्रांतीच्या मार्गाने इटलीत कामगारांची हुकूमशाही प्रस्थापित करावी असे साम्यवादी पक्षाला वाटू लागले. इटालियन जनतेला देखील इटलीचे प्रश्न सोडविण्यासाठी साम्यवादी क्रांतीचा मार्ग जवळचा वाटू लागला होता. परिणामी काही ठिकाणी कामगारांनी दंगे केलेत, कारखाने ताब्यात घेतले, शेतमजुरांनी जमीनदारांचे खून करून त्यांच्या जमिनी हिसकावून घेतल्या, सैनिकांनी पडीक जमिनी बळकावल्या, मजुरांनी हरताळ पाळले. दुबळ्या व निष्क्रिय सरकारला यातून कसा मार्ग काढावा हे कळत नव्हते. परंतु ही परिस्थिती फार काळ टिकली नाही.

कारखाना चालविण्यासाठी लागणाऱ्या व्यवस्थापनाचा अनुभव कामगारांना नव्हता; त्यामुळे कारखाने बंद पडले. शेतमजुरांनी जमिनी ताब्यात घेऊन सामूहिक शेतीचा प्रयोग केला; पण प्रत्येक जण कामचुकारपणा करू लागल्याने व भांडवलाअभावी शेतीचे उत्पन्न वाढण्याऐवजी घटू लागले. अन्नधान्याची तीव्र टंचाई जाणवू लागली. तेव्हा साम्यवादाचा मार्ग काही उपयोगाचा नाही असे इटालियन जनतेच्या लक्षात आले. तेव्हा लोकशाही बदनाम झालेली, साम्यवादी प्रयोगाची असफलता, यातून बेनिटो मुसोलिनीने त्यांना तिसरा मार्ग दाखविला - फॅसिस्टवादी हुकूमशाहीचा.

### (४) आर्थिक हलाखी

पहिल्या महायुद्धात झालेल्या बेसुमार खर्चामुळे व त्याच काळात उत्पादन व परराष्ट्र व्यापार थंडावल्यामुळे इटलीच्या अर्थव्यवस्थेवर भयंकर ताण पडला. महागाई बेसुमार वाढली आणि चलनाची किंमत ७०% नी घसरली. अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तूंच्या किमती चौपटीने वाढल्या. तुटीची अंदाजपत्रके, सतत वाढणाऱ्या किमती, आवश्यक वस्तूंचा काळा बाजार, बेकारी, दंगेधोपे या गोष्टी नित्याच्या झाल्या. औद्योगिक क्षेत्रात कच्च्या मालाचा तुटवडा, परदेशी बाजारपेठांचा अभाव, संप, टाळेबंदी या कारणांमुळे उत्पादनावर अनिष्ट परिणाम झाला. राष्ट्रीय कर्ज सहा पटींनी वाढले. पर्यटक व्यापार पूर्णपणे थंडावला. या आर्थिक विस्कळीतपणामुळे इटलीच्या राजकीय क्षेत्रात कमालीची अस्थिरता निर्माण झाली होती. याचा फायदा मुसोलिनीने घेतला आणि पर्याय म्हणून आपला फॅसिस्टवाद पुढे मांडला.

### (५) भांडवलदारवर्गाचा पाठिंबा

इटलीतील साम्यवाद्यांच्या वाढत्या प्रभावामुळे तेथील भांडवलदारवर्ग घाबरून गेला. साम्यवादी क्रांती घडून आली व कामगारांची हुकूमशाही स्थापन झाली तर आपली संपत्ती, प्रतिष्ठा, मालकी हक्क नष्ट होतील अशी भीती भांडवलदार, जमीनदार, उद्योगपती यांना वाटू लागली. याच वेळी मुसोलिनीनेसुद्धा साम्यवाद्यांना विरोध करण्यास सुरुवात केली. यामुळे इटलीतील सर्व भांडवलदार मुसोलिनीच्या पाठीशी उभे राहिले. मुसोलिनीला या वर्गाकडून पैसा मिळाला. तो त्याने बेकारांना काम देण्यासाठी वापरला. त्यामुळे मुसोलिनीच्या अनुयायांची संख्या वाढू लागली. भांडवलदारांना साम्यवादी व समाजवादी विचारांना उत्तर देणारे विचार फॅसिझममध्ये

आढळले आणि कामगारांच्या चळवळी व संघटना दडपून टाकणारी यंत्रणा त्यांना फॅसिस्ट पक्षाने पुरवली म्हणून भांडवलशाहीने फॅसिझमला पाठिंबा दिला.

**(६) अतिरेकी राष्ट्रवादाचा उदय**

पहिल्या महायुद्धाच्या काळातच इटलीत जंटाईल व प्रझोलिनी यांच्या अतिरेकी राष्ट्रवादाचा प्रचार होऊ लागला होता. यामुळे प्रखर देशप्रेमाची भावना वाढीला लागली. "राष्ट्र मोठे, व्यक्ती गौण आहे. राष्ट्राने व्यक्तीसाठी काय केले हे महत्त्वाचे नाही; तर व्यक्तीने राष्ट्रासाठी काय केले हे महत्त्वाचे आहे. राष्ट्रासाठी बलिदान करण्याची तयारी प्रत्येक नागरिकाची असली पाहिजे." या शिकवणुकीमुळे इटालियन जनता देशप्रेमाने" भारावून गेली होती. दोस्त राष्ट्रांनी केलेल्या विश्वासघाताचा बदला घेतला पाहिजे अशी मागणी जनता करू लागली. ही मागणी पूर्ण करण्याचे वचन फॅसिस्टांनी दिले. इटालियन जनतेने फॅसिस्टांना पाठिंबा दिला व फॅसिस्ट नेता मुसोलिनी हुकूमशहा बनला.

अशा प्रकारे तत्कालीन इटलीतील अस्थिर परिस्थितीने मुसोलिनीच्या फॅसिस्टवादी हुकूमशाहीला जन्म दिला.

**(इ) फॅसिझमचे तत्त्वज्ञान**

फॅसिझम हे कोणा विचारवंताने विचारपूर्वक मांडलेले तत्त्वज्ञान नाही. मुसोलिनीने सत्ता हस्तगत केल्यानंतर सहकाऱ्यांना सोयीचे वाटतील असे विचार सांगितले व आपल्या आक्रमक कृत्यांना तात्विक आवरण चढवले. या आवरणाला 'फॅसिझम' हे नाव दिले गेले. फॅसिझम म्हणजे सर्वंकष राज्यवाद असेदेखील म्हटले जाते. इटलीमध्ये पाय रोवल्यानंतर फॅसिझम जर्मनी,जपान, स्पेन, पोर्तुगाल अर्जेंटिना, इत्यादी देशांतही पसरला. प्रत्येक देशात फॅसिझमचे स्वरूप तेथील परिस्थितीनुसार भिन्न होते. कारण त्याला सुस्पष्ट व सुसंगत असे तत्त्वज्ञान नव्हते.

फॅसिझमचे सुसंगत असे राजकीय तत्त्वज्ञान नसले, तरी काही तत्त्वे प्राचीन जगातील प्लेटो व आधुनिक युगातील हेगेल या तत्त्वज्ञान्यांच्या ग्रंथांत आढळतात. याशिवाय मॅकियाव्हेला, हॉब्ज, नीत्शे यांसारख्या विचारवंताच्या विचारांचाही फॅसिझमच्या विचारसरणीवर परिणाम झाला आहे. राजकारणात आपले ध्येय साध्य करण्यासाठी कोणत्याही भल्याबुऱ्या मार्गांचा व साधनांचा अवलंब केला तरी चालतो; राजकारणात नीती, की, अनीती असे काहीही नसते; ह्या मॅकियाव्हेलीच्या विचारांचा फॅसिझमवर जास्त प्रभाव होता. फॅसिझमवर सर्वांत जास्त प्रभाव जॉर्ज सॉरेल याच्या 'हिंसक क्रांतिवादा' चा झालेला आहे. जेव्हानी जेतीले व आल्फ्रेडो रॉक्को हे दोघे फॅसिझमचे तत्त्वचिंतक म्हणून प्रसिद्ध आहेत. मुसोलिनीने १९३३ साली इटालियन विश्वकोशात फॅसिझमवर जो लेख लिहिला तो जेंतीलेने तयार करून दिला होता. म्हणून फॅसिझमची तत्त्वे व कार्यक्रम यांचा विचार करताना तो लेख व मुसोलिनीच्या कृती यांचाच आधार घेतला जातो.

मुसोलिनी स्वतःच असे म्हणतो की, "फॅसिस्टवादाच्या प्रमुख विचारप्रणालीत मॅकियाव्हेलीचा संधिसाधूपणाचा सिद्धांत, हेगेलचा राजकीय निरंकुशतेचा सिद्धांत, सोरेलचा हिंसक क्रांतिवाद आणि विल्यम जेम्सचा फलप्रामाण्यवाद (पॅग्मॅटिझम) यांचा संयोग झाला आहे'. रॉक्कोच्या

मते, 'फॅसिस्टवादात इतर काहीही असण्यापेक्षा कृती आणि भावनाच अधिक असतात. विवेकाशी व बौद्धिक व्यवहारांशी फॅसिस्टवादाचा छत्तीसचा आकडा होता. म्हणूनच त्यांच्या विश्वविषयक कल्पना आणि राजकीय संकल्पना गोधळ आणि परस्परविसंगतीने परिपूर्ण होत्या. राज्यसंस्थेची कल्पना मांडताना ते चिद्वाद (आयडियालिझम) प्रमाण मानतात, तर प्रत्यक्ष कृतींचे समर्थन स्पष्टीकरण देताना खालच्या दर्जाच्या जडवादाचा, भौतिकवादाचा आधार घेतात. फॅसिस्टवाद्यांनी बुद्धिगम्य विचारप्रणालीऐवजी मिथक निर्मितीवरच जास्त भर दिला. मुसोलिनीने प्राचीन रोमची थोरवी' हे राजकीय मिथक वापरले होते. मुसोलिनीच्या मते मिथक हे सत्याधिष्ठित असलेच पाहिजे असे नाही तर त्यातून श्रद्धा निर्माण झाली पाहिजे. १९३२ साली मुसोलिनीचा 'Doctrine of Fascism' हा ग्रंथ प्रकाशित झाला. या ग्रंथात मांडलेल्या विचारांवरून फॅसिस्ट तत्त्वज्ञानाची पुढील वैशिष्ट्ये सांगितली जातात.

### (१) लोकशाहीला विरोध

फॅसिस्टांचा लोकशाही विरोध हा फ्रेंच तत्त्वज्ञ सोरेल याच्या तत्त्वज्ञानावर आधारित होता. लोकशाही म्हणजे समाज संस्थेच्या अनियंत्रित व विस्कळीत अशा अवस्थेचे लक्षण असे फॅसिस्ट मानतात. मुसोलिनी म्हणतो, 'लोकशाही व्यवस्थेत जनतेला प्रगतीची आणि सौख्याची संधी असते, असा जो आभास निर्माण केला जातो तो मूर्खपणाचा आहे. सामाजिक समता ही कल्पनाही चुकीची आहे. फॅसिस्टवाद्यांनी नीत्शेच्या विचारांचा आधार घेऊन आपले विषमतावादी व निरंकुश वर्चस्ववादी विचार मांडले. विषमता ही निसर्गदत्त असून ती कधीच नाहीशी होणार नाही. काही व्यक्ती ह्या अधिकार गाजविण्यासाठी तर अनेक लोक हे फक्त आज्ञापालनासाठीच जन्मलेले असतात. आज्ञापालनातच त्यांचे स्वातंत्र्य, सुरक्षितता व जीवनाचे साफल्य सामावलेले असते. त्यांच्या मते, सर्वसामान्य लोकांचा बुद्धिवाद हा हीन दर्जाचा असतो. राज्य-कारभाराचे प्रश्न सर्वसामान्यांच्या आकलनाबाहेरचे असतात. त्यामुळे शहाण्या व सुज्ञ माणसांनी अज्ञानी व कनिष्ठ माणसांना शिस्त लावणे हेच प्रगतीचे साधन होय. या तत्त्वावरून फॅसिस्टांचा अभिजनवाद (इलिटीजम) सिद्ध होतो. लोकशाहीत शासन जनतेला जबाबदार असते; तर फॅसिझममध्ये जनता शासनाला जबाबदार असते. व्यक्तीचे स्वातंत्र्य व व्यक्तीची समानता फॅसिझमला मान्य नाही. त्यांच्या मते, समतेचे तत्त्व जीवनशास्त्राला धरून नाही निसर्गालाच समतेचे तत्त्व मान्य नसल्याने राजकारणाच्या क्षेत्रात ते लागू करणे म्हणजे मूर्खपणा आहे.

फॅसिस्टवाद लोकशाहीला त्याज्य ठरवून मूठभर श्रेष्ठींची निरंकुश सत्ता प्रस्थापित करतो. लोकशाहीमध्ये विविध पक्ष व पंथ माजतात व देश विस्कळीत होतो असा युक्तिवाद फॅसिस्ट करतात. सर्व फॅसिस्ट पुढारी आपला दरारा, दहशत निर्माण करून आपले अनुयायी तयार करतात. हे अनुयायी या पुढाऱ्यांना देवत्व देऊन टाकतात. अशा प्रकारे आपल्या सर्वोच्च नेत्याप्रती अंधश्रद्धा, निमूटपणे आज्ञापालन व सदैव युद्धसज्जता या त्रिसूत्रीत सामान्य माणसांकरिता फॅसिझमची शिकवण होती. या सर्व गोष्टी लोकशाहीविरोधी आहेत, ज्या फॅसिझमचे वैशिष्ट्य आहेत.

## (२) अतिरेकी राष्ट्रवाद

फॅसिस्टांचा मूलभूत सिद्धांत म्हणजे आत्यंतिक, जहाल व आक्रमक स्वरूपाचा राष्ट्रवाद. फॅसिस्टांच्या दृष्टीने प्रत्येक व्यक्तीतील सुप्त शौर्याला व प्राचीन रोमन साम्राज्याच्या विशालतेच्या, वैभवाच्या व प्रतिष्ठेच्या आदर्शाला फॅसिझम म्हणजे एक प्रकारचे आव्हान होते. त्यांच्या मते, इटलीची अस्मिता व प्रतिष्ठा परत मिळवून देण्यास केवळ फॅसिस्टवादीच समर्थ होते. या अतिरेकी राष्ट्रवादाचा वापर त्यांनी कम्युनिस्टांच्या विरोधात केला. या तत्त्वामुळे फॅसिस्टांना मध्यमवर्गातून मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळाला. या अतिरेकी राष्ट्रवादाचा किंवा उग्र राष्ट्रवादाचा वापर फॅसिस्ट एखाद्या शस्त्रासारखा करतात व हे शस्त्र वापरूनच हा फॅसिझम लोकप्रिय झाला होता.

## (३) हुकूमशाहीचा स्वीकार

सोरेल या विचारवंताने हुकूमशाहीचे समर्थन केले. हुकूमशाहीमुळे देशाची लवकर प्रगती होते. ‘शंभर शेळ्यांपेक्षा एका सिंहाचे राज्य चांगले’ असे तो म्हणत असे. हुकूमशाहीत निर्णय घेणारा एकच असल्यामुळे लवकर निर्णय घेऊन भ्रष्टाचार कमी होतो, गोंधळ माजत नाही म्हणून देशाच्या कल्याणासाठी व वेगाने प्रगती होण्यासाठी एकमेव शासनप्रणाली म्हणजे हुकूमशाही. हे सोरेलचे विचार मुसोलिनीने आपले तत्त्वज्ञान म्हणून जगासमोर मांडले

## (४) राज्याला सर्वश्रेष्ठ स्थान

फॅसिस्टवाद हे समूहवादी तत्त्वज्ञान आहे. राज्यसंस्था आपल्या कार्याद्वारे समुदायाचा सामाजिक, आर्थिक, नैतिक व बौद्धिक विकास घडवून आणू शकते, असा समूहवादाचा विश्वास आहे. समूहवादी तत्त्वज्ञान राज्यसंस्थेला सर्व अधिकार देते. समाजजीवनाचा कोणताही भाग राज्यसंस्थेच्या नियंत्रणापासून मुक्त नसतो. म्हणूनच मुसोलिनी म्हणतो, ‘सर्व काही राज्यासाठी, राज्याविरोधी काहीही नाही, राज्याबाहेर काहीही नाही’. आपल्या या मताच्या आधारासाठी फॅसिस्टवादी राज्यसंस्थेचा जैविक सिद्धांत (Organic Theory) मांडतात. या सिद्धांतानुसार राज्यसंस्था ही एक सजीव असून व्यक्ती हे तिचे अवयव आहेत. राज्यसंस्थेच्या हितातच व्यक्तीचे हित आणि राज्यसंस्थेच्या सामर्थ्यातच व्यक्तीचे स्वातंत्र्य सामावलेले आहे. या तत्त्वानुसार व्यक्तीचे स्वातंत्र्य हा तिचा हक्क नसून तिचे राज्यसंस्थेप्रती कर्तव्य असते. म्हणून व्यक्तीने राज्यसंस्थेसाठी सर्व प्रकारच्या हक्कांचे समर्पण केले पाहिजे. राज्यसंस्था ही साध्य असते आणि व्यक्ती हे तिचे साधन असते, अशा प्रकारे राज्यसंस्थेचे सर्वश्रेष्ठत्व फॅसिस्टवादी मांडतात. राज्यसंस्थेचे दैवीकरण करणारी चिद्वादी संकल्पना सर्वप्रथम हेगेलने मांडली. त्यानुसार राज्यसंस्था ही सर्वश्रेष्ठ व व्यक्ती हा तिचा भाग या नात्याने व्यक्तीला दुय्यम स्थान देऊन भागापेक्षा पूर्णत्वाला’ महत्त्व दिले. हेगेल म्हणतो, राज्य म्हणजे पृथ्वीवरील परमेश्वराचे आगमन आहे (The state is the march of God on the Earth) आणि राजा हा ईश्वराचा अंश असतो. फॅसिस्टांनी हेगेलचा हा चिद्वादी सिद्धांत स्वीकारला व आपल्या राजवटीचे समर्थन केले; परंतु बारकाईने पाहता फॅसिस्टांनी हेगेलच्या विचारांचा स्वतःच्या सोयीनुसार वापर करून विपर्यास केला.

फॅसिस्टांनी राष्ट्र व राज्यसंस्था यांना सर्वोच्चता प्रदान करताना, राष्ट्रहित कशात आहे हे फक्त राज्यसंस्थेलाच चांगले कळते. राज्याच्या परवानगीशिवाय राजकीय पक्ष, वेगवेगळ्या संघटना उदाहरणार्थ, कामगार संघटना, वेगवेगळ्या संस्था यांपैकी कशाचेही अस्तित्व संभवत नाही. राष्ट्रात शांतता व राष्ट्राबाहेर संघर्ष असे दुटप्पी धोरण फॅसिस्टांचे होते. राष्ट्रात एकजूट राहून शांतता नांदावी म्हणून फॅसिस्टवादी वर्गसंघर्ष अमान्य करतात. तसेच आंतरराष्ट्रीय शांततावाद हा भेकडपणा आहे, युद्ध हाच खरा पुरुषार्थ आहे; जसे स्त्रीला मातृत्व हे नैसर्गिक असते तसेच राज्याला युद्ध आवश्यक असते; म्हणून नेहमीच युद्धसज्जता पाहिजे असे प्रतिपादन फॅसिस्टवादी करतात.

## (५) साम्यवादाला विरोध

फॅसिझमचा साम्यवादाला विरोध होता. साम्यवादाच्या विरोधात खाजगी मालमत्तेचे व खाजगी व्यापाराचे तत्त्व फॅसिझमला मान्य होते. उत्पादनक्षेत्रात खाजगी मालमत्ता व नफा ही कल्पना जास्त कष्ट करण्यास प्रेरक ठरत असल्याने राष्ट्राच्या अभ्युदयास ती पोषक ठरते असा फॅसिस्टांचा दावा होता. साम्यवादामुळे वर्गकलह निर्माण होतात व समाजात दुही माजते व त्यामुळे समाज दुर्बल होतो असे त्यांचे मत होते. इतिहास आर्थिक कारणांमुळे घडत नाही; तो घडतो पराक्रमी पुरुषांच्या पराक्रमामुळे असे मुसोलिनी म्हणतो. मुसोलिनीच्या मते, विषमता नैसर्गिक असून ती समाजाला उपकारक आहे. त्याला सामाजिक समतेचे तत्त्व मान्य नव्हते. फॅसिस्टांच्या मते, स्त्रियांपेक्षा पुरुष श्रेष्ठ आहेत; त्यामुळे स्त्रियांनी 'चूल आणि मूल' ही पारंपरिक भूमिका निभवावी. त्यांनी शिक्षणसंस्थांत, शासनात, पक्षात सहभागी होऊ नये.

मार्क्सवादातील कामगार व भांडवलदार हा संघर्ष फॅसिस्टांना मान्य नाही. त्यांच्या मते, मजूर, शेतकरी, कामगार, भांडवलदार या सर्व वर्गांनी परस्पर-सहकार्याने उत्पादनात वाढ घडवून आणावी व राष्ट्राच्या प्रगतीत हातभार लावावा. मॅकियाव्हेलीप्रमाणे मुसोलिनीलाही राजकीय क्षेत्रात क्रौर्य, हिंसा या गोष्टी अपरिहार्य व आवश्यक वाटत होत्या. सारांश समाजवाद, लोकशाही, उदारमतवाद, व्यक्तिस्वातंत्र्य, समता, शांतता या सर्व गोष्टींना फॅसिझमचा कट्टर विरोध होता. एक व्यक्ती, एक राष्ट्र, एक पक्ष एक ध्येय असा नारा फॅसिस्टांनी दिला होता.

## (६) बुद्धिवादाला विरोध

१९व्या शतकापासूनच बुद्धिवादविरोधी विचारप्रवाह युरोपियन राजकीय विचारात दिसून येतात. बुद्धिवादविरोधी विचारधारेचे जनक शॉपेन हॉवर व नीत्शे हे विचारवंत होते. फॅसिस्टवाद्यांनी यांच्या लिखाणाचा आपल्या सोयीने अर्थ लावला. फॅसिस्टांच्या मते, जीवन बुद्धीवर नियंत्रण ठेवते, बुद्धी जीवनावर नाही. बुद्धीपेक्षा हृदयाच्या प्रेरणा प्रगतीला उपकारक ठरतात. व्यक्तिपूजा, स्वार्थत्याग, कर्तव्य यांना महत्त्व आहे. स्वातंत्र्य, समता, प्रातिनिधिक लोकशाही, मतदानाचा हक्क या बुद्धिवादी कल्पनांची हकालपट्टी झाली व बुद्धिवाद वांझ असतो अशी घोषणा करण्यात आली. फॅसिस्टवाद्यांनी वैभवाचे प्रतीक असणारी रोमन संस्कृती ही आपल्या विचारांची व पक्षाची अस्मिता बनवली आणि जेव्हा प्रतीकांचे अस्मितीकरण केले जाते तेव्हा

अतिरेकी राष्ट्रवाद निर्माण होतो. बुद्धिवादाने निर्माण केलेल्या मूल्यांचे 'मूल्यपरिवर्तन' करण्यात आले. भावना व प्रेरणा यांच्या आधारे नवी मूल्ये ठरविण्यात आली.

### (७) संघप्रधान राज्य

सर्वांग परिपूर्ण व स्वयंपूर्ण राज्य (Corporate) हे फॅसिझमचे अंतिम उद्दिष्ट होते. अशा सर्वांग परिपूर्ण राज्यात साऱ्या अर्थव्यवस्थेचे नियंत्रण फॅसिस्ट शासनामार्फत व फॅसिस्ट कल्पनांनुसार होते. या राज्यात शासन नियंत्रित अशा भांडवलदारांच्या व कामगारांच्या संस्था असतात. प्रत्येक संस्थेत एकाधिकार असतो; परंतु कोणत्याही संस्थेला राज्याच्या पूर्व संमतीविना स्वतंत्र धोरण ठरविताच येत नाही. इ.स. १९३४च्या चा कायद्याद्वारे फॅसिस्ट कल्पनांची अंमलबजावणी करण्यात आली. त्यानुसार प्रत्येक जिल्ह्यासाठी उद्योजकांचे व कामगारांचे असे चे मंडळ नेमण्यात आले. देशातील मंडळांचा संघ बनत असे. तो अनेक संघांचा मिळून महासंघ तयार होई. असे एकूण नऊ महासंघ होते. भांडवलदारांचे चार, कामगारांचे चार व व्यावसायिकांचा एक. उद्योग, कृषी, व्यापार आणि पतपेढ्या व विमा या क्षेत्रांत त्यांचे कार्य चाले. प्रत्येक व्यवसायासाठी नी कामगार व कारखानदार यांचे मिळून एक मंडळ असे. इटलीत नी अशी बावीस मंडळे होती. त्यांचे प्रमुख सत्ताधाऱ्यांकडून नेमले जात. सर्व मंडळातील प्रमुख अशा पाचशे सदस्यांचे मिळून र्ष एक राष्ट्रीय मंडळ होते. या सर्व संस्थांद्वारे राज्याला देशाच्या आर्थिक, औद्योगिक व व्यापारी व्यवहारांवर नियंत्रण ठेवता येई. आर्थिक क्षेत्रातील हुकूमशाहीची ही परिसीमा होती.

इ.स. १९३८ मध्ये मुसोलिनीने चेंबर ऑफ डेप्युटीज खालसा करून 'चेंबर ऑफ फॅसेस अँड कॉर्पोरेशन्स' निर्माण केले. या सभागृहात डॉक्टर, वकील, कलाकार, इत्यादी व्यावसायिकांनाही प्रतिनिधित्व दिले. या सभागृहाचे सर्व सभासद म्हणजे ५०० सभासद मुसोलिनीमार्फत निवडले गेले. अशा रितीने अर्थव्यवस्था व राज्ययंत्रणेवर मुसोलिनीने ताबा मिळविला. 'कार्पोरेटिव्ह स्टेट' कल्पनेत फॅसिझममधील सहकार्य, नियंत्रण, प्रगती, इत्यादी मेळ घातलेला आढळतो.

### (ई) फॅसिझमचे मूल्यमापन

जगातील सर्व हुकूमशाहीचे तंत्र व मंत्र समजण्यासाठी फॅसिझम व नाझीझम या दोन विचारप्रणालींचा उपयोग होतो. तसेच काही वेळा फॅसिस्ट' या शब्दाचा वापर राजकीय शिवी म्हणूनही केला जातो. प्रसिद्ध भारतीय तत्त्वज्ञ मानवेंद्रनाथ रॉय यांनी फॅसिझमच्या तत्त्वज्ञानाचे अचूक मूल्यमापन केले आहे. ते म्हणतात, 'जराजीर्ण भांडवलशाहीच्या रक्षणार्थ केलेला निर्वाणीचा अत्याचारी प्रयत्न म्हणजे फॅसिझम होय'. महायुद्धाच्या वातावरणात सूड भावनेपोटी फॅसिझमचे बीज अंकुरले. नीतिमत्ता आणि स्वातंत्र्य ही मानवी मूल्ये नाकारून फॅसिझमने दैवी सामर्थ्याचा पाठिंबा मिळविण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नात फॅसिस्टांचे मानवतावादाकडे दुर्लक्ष झाले. बऱ्याचदा फॅसिझमला समाजाच्या सर्वच घटकांकडून पाठिंबा मिळतो. यात राजकीय दृष्ट्या जागृत व भयभयीत मध्यमवर्ग पुढे असतो. फॅसिस्टांची प्रक्षोभक भाषणशैली व मायावी विचारप्रणाली सर्वसामान्यांची दिशाभूल करतात. लोकांच्या भावनेला हात घालून धर्म, वंश, मातृभूमी, संस्कृती व इतिहास यांचा प्रतीक म्हणून वापर करतात व आपल्या विचारांचा प्रसार करतात. दुसऱ्या महायुद्धात जरी इटलीच्या फॅसिस्ट राजवटीचा

अस्त झाला असला तरी आजही जगामध्ये कमीअधिक प्रमाणात वेगवेगळ्या स्वरूपात फॅसिस्ट प्रवृत्ती दिसून येते.

थोडक्यात, फॅसिस्ट राजवट जरी नामशेष झाली असली तरी फॅसिस्ट मनोवृत्ती अद्यापही टिकून आहे. लोकशाहीतील जनतेच्या उदासीनता व शिथिलता या दोषांतून फॅसिझम फोफावतो. अपेक्षाभंग, असुरक्षितता आणि अस्थिरता ही फॅसिस्ट तत्त्वप्रणालीची मानसिक बीजे आहेत. म्हणून व्यक्तीला या कारणांमुळे अगतिक बनावे लागू नये अशी राजकीय परिस्थिती व राजवट हाच फॅसिस्टशाहीला उपाय ठरू शकतो.

**स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - १**

**पुढील प्रश्नांची उत्तरे द्या.**

(१) फॅसिझमची व्याख्या सांगा.

(२) फॅसिझमचे तत्त्वज्ञान कशाकशाला विरोध करते?

(३) फॅसिझमच्या तत्त्वज्ञानाची त्रिसूत्री कोणती?

(४) कामगारांची हुकूमशाही कोणत्या क्रांतीतून निर्माण होते?

(५) फॅसिझमचे तत्त्वज्ञान राज्याच्या सर्वश्रेष्ठतेबद्दल कोणते विचार मांडते?

(६) राज्यसंस्थेचे दैवीकरण करणारी चिद्वादी कल्पना फॅसिस्टांनी कोणाकडून घेतली?

(७) फॅसिझमचे लोकशाहीबद्दलचे महत्त्वाचे विचार कोणते?

(८) मुसोलिनीचे युद्धासंबंधीचे विचार कोणते?

❄❄❄❄❄❄❄

## ४.३ स्त्रीवाद (Feminism)

४.३.० उद्दिष्टे
४.३.१ प्रास्ताविक
४.३.२ विषय-विवेचन
४.३.२.१ स्त्रीवाद
४.३.२.२ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे
४.३.३ सारांश
४.३.४ सरावासाठी स्वाध्याय

## ४.३.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला-

- स्त्रीवादाची पीठिका सांगता येईल.
- स्त्रीवादाचा नेमका अर्थ सांगता येईल.
- स्त्रीवाद शास्त्रीय स्वरूपात सांगता येईल.
- स्त्रीवादाची सविस्तर माहिती लिहिता येईल.

## ४.३.१ प्रास्ताविक

आधुनिक राजकीय विचारप्रणालीत स्त्रीवादाला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. या विचारप्रणालीचा मुख्य उद्देश सामाजिक, आर्थिक तसेच राजकीय क्षेत्रात स्त्री पुरुष समानता निर्माण करणे होय. त्यासाठी शोषणमुक्त असा समाज त्यांना अभिप्रेत आहे. अधिकारवादाचा लिंगभेदावर आधारित पितृसत्ताक व्यवस्थेला विरोध आहे. म्हणून त्यांनी पुरुषप्रधान व्यवस्थेला विरोध केला आहे. स्त्रियांच्या हक्कासाठी आवाज उठवणे हे या चळवळीचे ध्येय आहे. स्त्री मग कोणत्याही देशाची, वर्गाची जातीधर्माची असो, त्यांच्यात भगिनी वृत्ती निर्माण करणे, सर्व स्त्रियांनी संघटित होऊन अन्यायाविरुद्ध लढा उभारणे, स्त्रियांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या वातावरणाची निर्मिती करणे हे ध्येय होते.

## ४.३.२. विषय विवेचन

आधुनिक राजकीय विचारप्रणालीत स्त्रीवादाद्वारे नवीन परिभाषा मांडली जात आहे. स्त्रियांचे शोषण केवळ सार्वजनिक क्षेत्रातच होत नाही. कौटुंबिक तथा संसारिक जीवनातही होताना दिसते. या पुरुषांच्या शोषणांपासून स्त्रियांची मुक्तता करणे, स्त्रियांना पुरुषांप्रमाणेच समानतेचा अधिकार प्रदान करणे, परंपरागत पारतंत्र्यापासून स्त्रियांची मुक्तता करणे, अनिष्ट चालीरीतींच्या गर्तेतून स्त्रियांची सुटका करणे ही स्त्रीवादाची नवीन परिभाषा आहे. त्यामुळे स्त्रीवाद ही एक विचारसरणी किंवा विचारप्रणाली नसून ती स्त्रीमुक्तीची चळवळ आहे.

## स्त्रीवादाची ऐतिहासिक पार्श्वभूमी :-

### प्राचीन कालखंड :-

मानवी इतिहासाच्या प्राचीन कालखंडांचा अभ्यास केल्यास प्राचीन कालखंडात स्त्री पुरुष समानता होती असे आढळून येते. प्राथमिक अवस्थेत म्हणजे आदिम अवस्थेत स्त्री-पुरुष समानता होती. मातृत्वाच्या अधिकारामुळे स्त्रीचे काही प्रमाणात पुरुषांवर प्राबल्य होते. स्त्रीने कृषी संस्कृती व पारंपारीक संस्कृती जन्माला घातली, ही बाब सर्वश्रूत व सर्वमान्य केली जाते. प्राचीन इतिहासात स्त्रीप्रधान व्यवस्था तसेच स्त्री राज्याचे अनेक दाखले आढळतात. वेद आणि उपनिषद काळातही स्त्रियांवर फारशी बंधने नव्हती याचे अनेक ऐतिहासिक पुरावे सापडतात.

प्राचीन कालखंडात स्त्री स्वतंत्र असली तरी कालांतराने स्त्रियांच्या परिस्थितीत बदल झाला. वारंवार होणारी युद्धे, आक्रमण, अन्नासाठीची भटकंती इत्यादीमुळे श्रम विभागणीची नवीन व्यवस्था अस्तित्वात आली. स्त्रियांकडे 'चूल आणि मूल' तर पुरुषांकडे बाह्य क्षेत्रातील कामे आली. त्यातून स्त्रियांचे जीवन बंदिस्त होत गेले. त्यास 'मनुस्मृतीसारख्या' ग्रंथास मान्यता मिळाली. त्यामुळे सर्वत्र अशीच व्यवस्था निर्माण होऊन समाजात स्त्रीचे स्थान दुय्यम बनले.

### मध्ययुगीन कालखंड:-

मध्ययुगीन कालखंडात स्त्रीचे अस्तित्व केवळ उपभोग्य वस्तूसमान बनले. त्यामुळे स्त्रियांची खरेदी-विक्री होऊ लागली. मध्ययुगातील अस्थिरता संरजामशाही व्यवस्था, धर्माचे वाढलेले प्राबल्य, राजेशाही व्यवस्थेचा उदय यामुळे स्त्रियांचे जीवन असुरक्षित बनले. तिच्यावर अन्याय व अत्याचार होऊ लागले. अनेक जाचक बंधने तिच्यावर लादण्यात आली. या दुष्ट प्रकारांना समाजप्रमुखांनी व धर्ममार्तंडांनी मान्यता दिली. त्यांच्या वर्चस्वामुळे राज्यव्यवस्थेने स्त्रियांवर अन्याय जुलूम करणाऱ्या कायद्याला मान्यता दिली. म्हणून मध्ययुगीन कालखंड हा स्त्रियांसाठी 'अंधारयुग' ठरला.

### वसाहतीचा कालखंड :-

मध्ययुगातून वाटचाल करीत असताना विज्ञानाच्या क्षेत्रात नवनवीन शोध लागले. ज्ञानाच्या पुनरोदयाने औद्योगिक क्रांती घडून आली व प्रबोधन काळाची सुरुवात झाली. विज्ञान क्षेत्राप्रमाणेच वैचारिक क्षेत्रातही नवे बदल घडून आले. औद्योगिक क्रांतीमुळे उद्योगधंद्यांचा विकास झाला. त्यातून व्यापारी वृत्ती विकसित होऊन वसाहतवादाचा उदय झाला. नवीन विचाराच्या प्रवाहातून १७८९ मध्ये फ्रान्समध्ये फ्रेंच राज्यक्रांती घडून आली. या क्रांतीचा पाया स्वातंत्र्य समता, बंधुता व न्याय हा होता. या क्रांती घोषाने स्त्रीवर्गात जागृती आणण्यासाठी अनेक समाजसुधारक पुढे आलेत, त्यांची स्त्रीमुक्तीसंबंधी विचार मांडून, स्त्रियांमध्ये जागती घडवून आणली. एवढेच नव्हे तर त्यांनी आंदोलनेही केली.

**आधुनिक कालखंड:-**

**समाजसुधारकांचे प्रयत्न :-**

फ्रेंच राज्यक्रांतीतून प्रेरणा घेऊन १७९२ मध्ये मेरी वॉलस्टोन क्राफ्ट या महिलेने इंग्लंडमध्ये "ए व्हिडिकेहान ऑफ द राईटस् ऑफ" या ग्रंथाद्वारे महिलांच्या अधिकारांसाठी आवाज उठविला. हीच स्त्री मुक्ती आंदोलनाची प्रेरणा ठरली, औद्योगिक क्रांतीमुळे श्रमविभागणीचे तत्त्व बदलले होते. वसाहतवादामुळे नवीन व्यवस्था जन्माला आली. फ्रेंच राज्यक्रांतीतून कल्याणकारी राज्यव्यवस्था आकार घेत होती. याच वेळी मानवी हक्काची कल्पना मान्यता पावत होती. त्याच्या प्रभावाने भारतातील समाजसुधारक प्रभावित झाले. राजा राजमोहन रॉय यासारखे समाजसुधारक प्रभावित झाला. राजा राममोहन रॉय यासारख्या समाजसुधारकांनी स्त्रियांच्या शिक्षणावर भर दिला. समाजातील अनिष्ट रूढी, परंपरा व चालीरीतीला विरोध केला. स्त्रियांमध्ये जागृती घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर महात्मा ज्योतिबा फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, आगरकर, न्या. रानडे, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा अनेक समाजसुधारकांनी स्त्रियांच्या स्वातंत्र्यासाठी आपले योगदान दिले.

भारताप्रमाणेच युरोपातही स्त्री मुक्ती आंदोलनासाठी अनेकांनी आपले योगदान दिले. १८४४ मध्ये फ्रान्सची पलोरा ट्रिस्टन हिने महिला अधिकारांची मागणी करण्यासाठी एका महिला संघटनेची स्थापना केली. त्याच सुमारास इंग्लंडमध्ये कैरोलिन गार्टन हिने स्त्रियांच्या हक्कांसाठी आंदोलन उभारले. त्यामुळे तिचा खूप छळ झाला. त्यापूर्वी गॉडविनने स्त्री स्वातंत्र्याचा विचार मांडला होता. तोच विचार जॉन स्टुअर्ट मिल यांनी मांडला. ८ मार्च १८५७ रोजी कापड मिल कामगार स्त्रियांनी रस्त्यावर येऊन आंदोलन पुकारले. कामाचे तास कमी करण्यात यावेत, अधिक वेतन देण्यात यावे अशी त्यांची मागणी होती. त्यातूनच पुढे महिला कर्मचारी युनियनची स्थापना झाली. म्हणूनच ८ मार्च हा महिला संघर्ष दिवस आज आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून ओळखला जातो. १८६५ मध्ये अमेरिकेत लुसी स्टीन यांनी महिला आंदोलन सुरू केले होते. एंजेल्सने स्त्री मुक्तीचा विचार दिला.

लेनिनने रशियन क्रांतीनंतर स्त्री मुक्तीचा विचार दिला. या बरोबर सिमेन दी बुवाचे ही सेकंड सेक्स' व बेट्टा फ्राइडचे 'दी फेमिनिन मिस्टिक' (नारी रहस्य कथा) याद्वारे मानसशास्त्रीय विश्लेषण करून स्त्री विचारांना नवा आधार देण्यात आला होता. अशा प्रकारे १९ व्या शतकाच्या मध्यकाळानंतर स्त्रीमुक्ती कार्याला चांगली सुरुवात झाली. विसाव्या शतकाच्या सुरवातीला प्रामुख्याने पहिल्या महायुद्धानंतर या चळवळीला गती मिळाली. युद्धाच्या काळात स्त्रियांनी दिलेल्या योगदानामुळे दोस्त राष्ट्रांनी त्यांना मतदानाचा हक्क बहाल केला. त्यातून स्त्रियांच्या राजकीय सहभागास सुरुवात झाली. रशियन राज्यक्रांतीने स्त्रीला संपूर्ण समानता बहाल केली. त्याचा परिणाम जगातील वेगवेगळ्या देशांत दिसून आला. त्यानंतर फॅसिस्ट बाकण नाझी चळवळीने स्त्रियांवर बंधने घातली. तिचे क्षेत्र केवळ चूल आणि मूल असे सीमित केले. श्रमाची अनेक कामे सीमित स्त्रियांकडून करवून तिचे शोषण करण्यात आले.

बदलत्या परिस्थितीनुसार दुसऱ्या महायुद्धानंतर मानवी हक्काच्या जाणीवेची सर्वत्र चर्चा सुरू झाली. १९४८ च्या १० डिसेंबर रोजी युनोने मानवी हक्काच्या जाहीरनाम्यास संमती दिली. या जाहीरनाम्याच्या प्रस्तावनेत, संयुक्त राष्ट्रसंघातील जनतेने जाहीरनाम्याद्वारे मानवाच्या

मूलभूत हक्कांवरील आपल्या श्रद्धेस मानव म्हणून त्यांचे हक्क व योग्यता यांना तसेच स्त्री-पुरुषांच्या समान हक्कांना मान्यता प्रदान करून वंश, वर्ण, लिंग, भाषा, धर्म, प्रदेश इत्यादीमधील भेद अमान्य करण्यात आला. तसेच सर्वांना हक्क व स्वातंत्र्य उपभोगण्याचा हक्क बहाल करण्यात आला.

या सर्व ऐतिहासिक घडामोडीचा प्रभाव भारताच्या राज्यघटनेवर पडल्याशिवाय राहिला नाही. भारतीय संविधानाने सर्व नागरिकांना समता, स्वातंत्र्य, न्याय व शोषणमुक्त व्यवस्थेची हमी दिली. अशा प्रकारे वसाहतवादाचा अंत झाल्यानंतर वैज्ञानिक क्षेत्रातील प्रगतीने आज स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने अनेक क्षेत्रांत काम करीत आहेत. १९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला दशक म्हणून घोषित करण्यात आले होते. त्यामुळे स्त्रियांच्या प्रगती, विकासाच्या व सशक्तीकरणाच्या दृष्टीने सवलती, आरक्षण, संरक्षण इ. बाबीसंबंधी सुविधा पुरविण्यात आल्या. कायदेविषयक तरतुदी करण्यात आल्या, जागतिकीकरणाच्या वातावरणात स्त्री स्वातंत्र्यवादी चळवळ अधिक गतिशील बनली.

अशा प्रकारे स्त्रीवाद ही केवळ विचारसरणी नसून ती अखंडपणे सुरू असलेली चळवळ आहे. गेल्या तीन दशकांपासून या स्त्रीवादी चळवळीने जोम धरला असला तरी अद्यापही ग्रामीण भागात, काही पारंपरिक समाजात स्त्रियांना अद्यापही म्हणावे तसे स्वातंत्र्य नाही. स्त्रियांचे वेगवेगळ्या मार्गांनी शोषण होतांना दिसते. तेंव्हा स्त्रीमुक्तीसाठी करण्यात आलेल्या प्रयत्नात शुलागिथ फायरस्टोन यांनी केलेले कार्यही महत्त्वपूर्ण आहे.

- **स्त्रीवादाची उद्दिष्टे :-**

स्त्रियांना सामाजिक, आर्थिक तसेच राजकीय क्षेत्रात पुरुषांप्रमाणे अधिकार असावेत. म्हणजेच स्त्री - पुरुष समानतेची मागणी करणे हे या विचारसरणीचे ध्येय आहे. त्यासाठी प्रस्थापित व्यवस्थेला विरोध करणे, शोषणमुक्त नवीन व्यवस्थेची आखणी करणे. स्त्रियांचे शोषण करणाऱ्या कुटुंबसंस्था, विवाह संस्था, सामाजिक मूल्ये, सांस्कृतिक मूल्ये नाकारणे, मध्ययुगीन भ्रामक कल्पना नाकारणे, या शोषणाला बळ देणाऱ्या संस्थांना विरोध करणे. स्त्रियांना सामाजिक, आर्थिक,राजकीय क्षेत्रांत समाविष्ट करून घेणे. निर्णय प्रक्रियेत त्यांना सामविष्ट करून घेण्यासाठी विविध क्षेत्रात स्त्रियांना सहभागी करून घेणे हे या स्त्रीवादी चळवळीचे उद्दिष्ट आहे.

- **स्त्रीवादाची वैशिष्ट्ये :-**

वेगवेगळ्या कालखंडात व विविध परिस्थितीत समाजसुधारक व स्त्रीमुक्तिवादी विचारवंत व कार्यकर्त्यांनी त्या त्या काळातील परिस्थितीनुसार स्त्रीवादाची मांडणी केलेली आहे. त्यामुळे त्याची निश्चित व्याख्या सांगता येत नाही, मात्र स्त्रीवादासंबंधी मांडलेल्या विचारावरून त्याची खालील वैशिष्ट्ये सांगता येतात.

१) स्त्रीवाद ही चळचळ आणि एक विचारसरणी आहे.

२) स्त्रीवादी चळवळीचा इतिहास पाहता त्यात एकवाक्यतेचा अभाव आढळतो.

३) स्त्रीवादांत मूल्य, दृष्टिकोन आणि आंदोलनाची दिशा याबाबत परस्परांत मतभेद आढळतात.

४) स्त्रीवादी चळवळीचा विकास प्रामुख्याने फ्रेंच राज्यक्रांतीनंतर झालेला आहे.

५) स्वा पुरुष समानता हा या चळवळीचा मुख्य आधार होय.

६) जागतिक आणि राष्ट्रीय चळवळीसाठी घोषणापत्राद्वारे स्त्री हक्कांना मान्यता

७) स्त्रीवादी चळवळीत जातिभेद, वर्णभेद, भाषाभेद, प्रदेशभेदाला महत्त्व नव्हते,

८) १९७५ ते १९८५ या आंतरराष्ट्रीय महिला दशकानंतर स्त्री चळवळीला गती मिळाली.

९) लोकशाही शासनव्यवस्थेने स्त्रियांचा सर्व क्षेत्रांत सहभाग वाढला.

१०) शारीरिक रचना सोडल्यास बुद्धी, धाडस, क्षमता इत्यादी बाबतीत स्त्री पुरुष समानता आहे अशी यांची विचारसरणी आहे.

**स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे**

१) स्त्रीवाद म्हणजे काय?

२) स्त्रीवादाचे वैशिष्ट्ये सांगा?

३) स्त्रीवाचे उद्देश सांगा?

❄❄❄❄❄❄❄